म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कथा
दा. क्र. १७२०

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १७२०

IRBK-0101720

IRBK-0101720

दि. २५.१९७०

दा. क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

14 JUL 1971

5 JUL 1975

24 MAY 1977

2 SEP 1977

19 APR 1978

12 OCT 1978

29 APR 1979

5 AUG 1981

18 SEP 1982

# श्रावणांतल्या विजा

लेखक

बालशंकर देशपांडे

IRBK-0101720

IRBK-0101720

प्रकाशक

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें.

प्रकाशक
**गो. रा. पाटणकर**
कॉंटिनेंटल बुकसर्व्हिस,
टिळक रोड, पुणें २.
**प्रकाशन १२ वें**
ता. ७।१०।४१

सर्व हक्क सौ. पद्मा देशपांडे ( उमरखेड–वऱ्हाड ) यांच्या स्वाधीन

मुद्रक
**बाळकृष्ण भाऊ जोशी**
ज्ञानविलास प्रेस, पुणें २.

स्वर्गस्थ वडिलांच्या स्मृतीस

CHADILDAS ROAD.

# ओझरतें दर्शन

श्री. बालशंकर देशपांडे यांनीं आपल्या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहि-
ण्याविषयीं मला विनंति केली. तेव्हां मी नेहमींप्रमाणें विचारांत पडलों.
कुठल्याहि पुस्तकावर प्रकाश पाडणारी प्रस्तावना हवी असेल, तर ती
खुद्द लेखकानेंच लिहिली पाहिजे असें मला मनःपूर्वक वाटतें. इतरांच्या
प्रस्तावनांत विद्वत्ता भरपूर असूं शकेल, आणि रसिकताही विपुल आढ-
ळेल. पण लेखकाला आपल्या निर्मितीचें अंतरंग जसें विशद करून सांगतां
येईल, तसें तें परक्यांना साधणार नाहीं. मुलांचें कौतुक असो अथवा
काळजी असो, आईच्या डोळ्यांत त्या त्या भावनेचें प्रतिबिंब जितक्या
चटकन् पडेल, तितकें तें इतरांच्या दृष्टींत स्पष्टपणें उमटणार नाहीं. लिखा-
णाचें रसदर्शन असो अथवा समर्थन असो, ज्याचें त्यालाच तें अधिक
कुशलपणानें करतां येतें. शॉची How he lied to her husband
ही छोटी नाटिकाच पहाना, लेखकानें तिला लिहिलेली प्रस्तावना पुरी
पंचवीस ओळींची सुद्धां नाहीं. पण शेवटच्या दहा ओळींतच शॉनें
आपली बाजू किती परिणामकारक रितीनें मांडली आहे! कायम ठशाचा
प्रेमाचा त्रिकोण हा आपल्या नाटिकेचा विषय अगदीं शिळा झाला आहे,
हें तो मुळींच नाकबूल करीत नाहीं. पण त्यावर तो म्हणतो,

Trifling as it is, I paint it as a sample of what can be done with even the most hackneyed stage frame work by filling it in with an observed touch of actual humanity instead of with doctrinaire romanticism. Nothing in the theatre is staler than the situation of husband, wife and lover or the fun of knock about farce. I have taken both, and got an original play out of them, as anybody else can if only he will look about him for his material instead of plagiarizing Othello and the thousand plays that have proceeded on Othello's romantic assumptions and false point of honour.'

या उताऱ्यांत शॉनें केलेली स्वतःची वकिली सर्वांना पटेलच असें नाहीं. पण स्वतः लेखकानेंच आपलें प्रास्ताविक लिहिलें कीं, त्याच्या दृष्टिकोनाविषयीं रसिकांचें मत सहजासहजीं अनुकूल होण्याचा किती संभव असतो हें या गोष्टीवरून दिसून येईल. शॉसारख्या नामांकित साहित्यिकाइतकेच होतकरू लेखकांनाहि निर्मितीच्या बाबतींत स्वतःचे म्हणून कांहीं विशिष्ट अनुभव असतात. प्रस्तावनाकार कितीहि सहृदय असला तरी त्या अनुभवांचें अथवा निर्मितीच्या मुळाशीं असलेल्या विशिष्ट परिस्थितीचें त्याला पूर्णपणें आकलन करतां येत नाहीं.

हें लक्षांत घेऊन श्री. देशपांडे यांना प्रस्तावनेच्या बाबतींत नकार देण्याचा विचार माझ्या मनांत प्रथम आला. पण तो तीन कारणांमुळें मला अंमलांत आणणें अशक्य झालें. पहिलें कारण, प्रस्तावना दुसऱ्याकडूनच लिहून घेण्याची प्रचलित रूढि! नामांकित लेखकसुद्धां याच रूढीचे गुलाम झालेले दिसतात. स्त्री कितीही शिकली सवरली तरी प्रवासाला तिनें एकटीनें जाण्यापेक्षां कुणाच्या तरी सोबतीनें जाणें बरें, हा अलिखित सामाजिक संकेत पाळण्याचा अद्यापिहि आपण अट्टाहास करीत आहोंतच कीं नाहीं? प्रस्तावनेच्या बाबतींतही तसाच अनुल्लंघनीय

संकेत अजून रूढ आहे. श्री. देशपांडे यांचें हें पहिलेंच पुस्तक असल्या-मुळें या वेळीं तरी ही रूढि मोडण्याइतके ते बंडखोर होतील, हें शक्य नव्हतें.

प्रस्तावना लिहिण्याचें दुसरें कारण त्यांचा 'ज्योत्स्ने' शीं लेखक म्हणून आलेला संबंध. मासिक आणि शाळा यांची कुणी विनोदी लेखकानें तुलना केली आहे कीं काय हें मला ठाऊक नाहीं. पण आपल्या शाळेशीं संबंध आलेल्या मुलाविषयीं शिक्षकाला जसा जिव्हाळा वाटतो, तसा मासिकाच्या लेखकाविषयीं संपादकाला आपलेपणा वाटूं लागतो, हें कांहीं खोटें नाहीं. पण या दोन कारणांना तिसऱ्याची जोड मिळाली नसती तर ही प्रस्तावना लिहिण्याच्या बाबतींत मी कदाचित् हात आंखडता घेतला असता ! तें कारण म्हणजे आजच्या मराठी लघु-कथेची विशिष्ट परिस्थिति. निर्मितीच्या विपुलतेच्या दृष्टीनें पाहिलें तर सध्यां लघुकथायुग सुरू आहे यांत शंका नाहीं. कुठल्याही विषयाला वाहिलेलें नियतकालिक असो ! त्यांत बरीवाईट लघुकथा ही हटकून असायचीच ! कॉलेजच्या त्रैमासिकापासून किर्लोस्करसारख्या प्रसाराच्या दृष्टीनें पहिला नंबर पटकावणाऱ्या मासिकापर्यंत सर्व नियतकालिकांच्या संपादकांना हल्लीं एकच अनुभव येतो—त्यांच्याकडे येणाऱ्या लिखाणांत सर्वांत मोठा भाग लघुकथांचा असतो.

पण विपुलता व गुणवत्ता या मैत्रिणी असतात असें थोडेंच आहे ! कित्येक वेळां तर त्या सवतीसवतीप्रमाणें वागूं लागतात. आजच्या मराठी लघुकथेसंबंधानें वाचकांची हीच मुख्य तक्रार आहे. सात वर्षांनीं शरीरां-तला कणन् कण बदलतो असें म्हणतात ना ? वाङ्मयीन अभिरुचींतहि दर दशकाला एवढा नसला तरी बराच पालट होत असतो. १९३० चे कथाविषय १९४० च्या वाचकांना शिळे वाटूं लागले तर त्यांत त्यांचा काय दोष आहे ? तंत्र, भाषाशैली इत्यादिकांतलें नावीन्यही असेंच आहे. त्यांची मोहिनी वर्षानुवर्षें टिकूं शकत नाहीं. अनुकरण हा बाळपणांतला अभिनंदनीय गुण असला तरी तारुण्यांत तोच हास्यास्पद दोष ठरतो.

मराठी लघुकथा कालदृष्ट्या आतां यौवनांत पदार्पण करीत असल्यामुळें जुन्या वाङ्मयगुणांचें यशस्वी अनुकरण करणारे कलावंत सुद्धां रसिकांच्या दृष्टीनें असमाधानकारक ठरतात. शिवाय कमळाबाई टिळक, कुमार रघुवीर, दौंडकर प्रभृति पहिल्या दर्जाचे मराठी कथालेखक अकालीं पेन्शनींत गेले आहेत. त्यांच्याच जोडीनें लोकांपुढें आलेले य. गो. जोशी, कृष्णाबाई, लक्ष्मणराव सरदेसाई, खांडेकर वगैरे लेखक अजून जोमानें लिहित असले तरी त्यांच्या लेखनशक्तीच्या मर्यादा लोकांना परिचित झाल्या आहेत. अशा स्थितींत मराठी लघुकथेला मध्यंतरीं मिळालेली लोकप्रियता पुन्हां प्राप्त करून घ्यायची असेल तर जुन्या कथालेखकांप्रमाणें नव्या कथालेखकांच्या गुणांचें कौतुक तर झालेंच पाहिजे. पण त्या कौतुका-बरोबरच त्यांच्या लिखाणाची वारंवार चिकित्साही झाली पाहिजे.

या कल्पनेनें प्रेरित होऊनच मी देशपांडे यांच्या या छोट्या संग्रहां-तल्या दहा गोष्टी वाचल्या. त्यांच्या लेखनांत हौशी लेखकाचे गुणावगुण भरपूर असले तरी कलात्मक कथालेखनाकडेहि त्यांचा ओढा आहे यांत शंका नाहीं. त्यांच्या कथांचीं नांवेंच पहा ना ! ‘ आई आणि अफू ’ हें शीर्षक वाचून कुणाचें कुतूहल जागृत होणार नाहीं ? ‘श्रावणांतल्या विजा’ या नांवांतली काव्यमयता कोण नाकबूल करील ?

ही चमत्कृतिजनक कल्पकता हाच भाषेपासून कथानकापर्यंत देश-पांड्यांच्या सर्व लेखनाचा विशेष आहे असें म्हणतां येईल. ही कल्पकता कधीं विनोदी वेष करून वावरते, कधीं काव्यकल्पनेचें तलम पातळ नेसते आणि कधीं कधीं ती सुंदर सुभाषितांचा शृंगार करूनहि मिरवते. त्यांचीं खालील वाक्यें वाचतांना कुणाला मौज वाटणार नाहीं ? ‘ दिगंबर पैगंबर सर्व्हिस ’ ची ती मोटार लॉरी ताशीं दहा मैल, पांच पंक्चर्स आणि पन्नास धक्के या प्रमाणांत धांवत होती !’ ‘ तरुणांना शरीरापेक्षां मनाचींच दुःखें अधिक असतात ! ’ ‘ हिऱ्याला देखील राजाच्या मुगुटांत बसण्या-पूर्वीं जगभर भटकावं लागतं. म्हणून कांहीं मुगुटाची हांव सोडून तो आंगटींत जखडून घ्यायची इच्छा करीत नाहीं ! ’ ‘ स्त्री ही उपजत नटी असते ! ’ ‘ चीनमधें प्रवाहाची दिशा बदलणारी नदी आहे. मनुष्याचा

जीवितप्रवाहही असाच स्वैर आहे का ?' 'कोणतीच सुंदर वस्तु मनुष्याला सांधता येत नाहीं. जीवन, स्वप्न, प्रीति!' 'निःशस्त्र पण प्रभावी युद्ध गांधी आणि स्त्रिया यांनाच खेळतां येतें' 'कुठल्याहि म्हाताऱ्याला तंबाखू, तपकीर आणि तात्पर्य यापैकीं एकाचें तरी जबरदस्त व्यसन जडलेलें असतें!'

या कथासंग्रहांत वाचकांना असलीं अनेक चमकदार वाक्यें आढळतील व आनंदित करतील. मात्र देशपांड्यांच्या कल्पकतेवर कृत्रिमाचा अधिक पगडा असल्यामुळें हीं वाक्यें विलग वाचतांना जरी आनंद झाला तरी कथेच्या ओघांत इष्ट रसपरिपोष करण्याच्या कामीं तीं अनेकदां दुबळीं ठरतात आणि मग—

कांहीं कांहीं देवळांच्या पायऱ्यांमधें रुपये ठोकून बसविलेले असतात ना ? त्यांच्यासारखीं हीं वाक्यें वाटूं लागतात.

पाल्हाळ हें अनेकदां कल्पकतेचें अपत्य असूं शकतें. कथाकाराला जिव्हाळा दर्शविण्याच्या कामीं क्वचित त्याचा उपयोग होतो हें खरें आहे. पण श्री. देशपांडे यांच्या अनेक गोष्टींत पाल्हाळानें रसहानिच झाली आहे. 'निवडुंगाचीं फुलें' या गोष्टीचा त्यांचा आरंभ 'कवींचा कारखाना' या विनोदी लेखासारखा वाटतो. 'काव्यांची किंमत' या गोष्टींत 'जीवन आणि स्वप्न यांचंहि कधीं पटायचं नाहीं. जमीनअस्मानाचं अंतर आहे या दोघांत!' एवढें लिहून ते थांबत नाहींत. जमीनअस्मानावरून त्यांना डोंगरचे आंवळे व समुद्राचें मीठ यांची आठवण होते व ते लिहूं लागतात, 'पण डोंगरावरले आवळे अन् समुद्रांतलें मीठ यांत कितीही अन्तर असले तरी दोहोंची चटणी करणाऱ्या गृहिणीलाच व्यवहार मानपत्र देतो ना ?' एवढें लिहून ते लगेच जीवन आणि स्वप्न यांच्याकडे वळत नाहींत. डोंगरांतल्या आवळ्यांवरून त्यांना पेपरांतल्या आवळ्याची ( म्हणजे भोपळ्याची ) आठवण होते. ते लगेच लिहितात, 'डोंगरावरल्या आवळ्यांचंच कशाला ? पेपरावरले आवळे आणि माणसाची बुद्धिमत्ता यांचीही अशीच फारकत केली आहे आपण!' पेपरा-

वरले आवळे म्हणजे शून्य मार्क ! ताबडतोब ते या शून्याचा विस्तार करतात ' पण जग हें शून्य आहे हें अनेक वर्षांच्या अध्ययनानें तत्वज्ञांना सुचणारें सुंदर तत्वज्ञान विद्यार्थ्याला पेपरावरला आवळा पाहूनच उमगतं ना ? '

असली कल्पनेची क्लिष्ट व कृत्रिम कसरत करण्याचा नाद गडकऱ्यांसारख्या प्रतिभाशाली लेखकालासुद्धां होता हें खरें. पण तो नाद म्हणजे गुलाबाचे कांटे होते. सामान्य लेखकाला हे कांटे पैदा करणें सोपें जातें. पण त्या गुलाबाचा सुवास मात्र त्याला दुःसाध्यच असतो.

रसपरिपोषक कल्पकतेलाच ललित वाङ्मयांत अधिक महत्व आहे, हें श्री. देशपांडे यांनीं ध्यानीं घेतलें तर ' विकास ! विकास ! याच समाधानासाठीं श्री उलतं, ज्योत जळते अन् स्त्री ओकाऱ्या देते ' असलीं वाक्यें त्यांच्या लेखणींतून उतरणारच नाहींत. उलट ' बॅटरीचा प्रकाश टाकून कां कळ्या फुलवितां येतात ? ' असल्या सुंदर वाक्यांचा मात्र ते अधिक समर्पक उपयोग करूं लागतील.

कल्पकतेनें देशपांड्यांच्या भाषेंत जसे विशिष्ट गुणदोष उत्पन्न केले आहेत, तसें त्यांच्या कथांच्या मांडणीलाही एक ठराविक वळण दिलें आहे. हें वळण म्हणजे विस्मयजनक रचना. बहुतेक गोष्टींत वाचकाला शेवटीं आनंदाचा, दुःखाचा किंवा आश्चर्याचा धक्का देण्याचा देशपांडे यांचा पद्धतशीर प्रयत्न आहे. या दृष्टीनें ओ. हेन्री हा त्यांचा आवडता कथालेखक असावा असें वाटतें. मात्र ओ. हेन्रीची नाजुक कला त्यांना साध्य झाली आहे असें म्हणवत नाहीं. उदाहरणार्थ 'निवडुंगांचीं फुलें' ही गोष्ट पहा. अनिरुद्ध हा नुसता बोलघेवडा व प्रदर्शनपटु देशभक्त आहे. पण बाह्यतः त्याच्या देशभक्तींत सामील न होणारी त्याची पत्नी वरदा हीच माणुसकीच्या दृष्टीनें त्याच्यापेक्षां शतपटींनीं श्रेष्ठ आहे, ही या गोष्टीची मध्यवर्ती कल्पना हृदयंगम आहे. पण या मध्यवर्ती कल्पनेचा विकास योग्य रीतीनें झालेला नसल्यामुळें शेवटचा विस्मयाचा धक्का परिणामकारक होत नाहीं.

श्री. देशपांडे गोष्टीचा शेवट अनपेक्षित व विस्मयजनक करण्याकडे जेवढें लक्ष पुरवतात, तेवढेंच त्यांनीं तिचा आरंभ व मध्य यांच्याकडे दिलें तर त्यांच्या कथा निःसंशय सरस होतील. लघुकथेंतली कला म्हणजे नुसती कलाटणी नव्हे. त्या कलाटणीइतकेंच कथानक, भूमिका व तत्त्व यांच्या प्रमाणबद्ध विकसनाच्या बाबतींत लेखकानें दक्ष राहिलें पाहिजे. नाहीं तर साहित्य चांगलें असूनहि पाककौशल्याच्या अभावीं पक्वान्न बिघडून जावें तशी कथेची स्थिति होते.

'आई आणि अफू' या प्रस्तुत संग्रहांतल्या पहिल्या गोष्टींत हेंच घडलें आहे. 'आई लहानपणींच मुलाला अफू देते असं नाहीं. मोठेपणींसुद्धां बडेजावाच्या कल्पनेची उत्तेजक अफू देऊन त्याला भोंवतालच्या परिस्थितीचा विसर पाडायला लावते. अन् पहिल्या अफूपेक्षां ही दुसरी अफू अधिक घातक असते ही या कथेची मूळभूत कल्पना अत्यंत मनोवेधक आहे. जुन्या परंपरेंत वाढलेली आई व नव्या परिस्थितीशीं टक्कर द्यावी लागल्यामुळें तिच्या जीवितविषयक तत्त्वज्ञानाशीं समरस न होऊं शकणारा मुलगा यांच्या मानसिक झगड्याचें हृदयस्पर्शी चित्रण या गोष्टींत आढळेल अशीच अपेक्षा ही कल्पना आपल्या मनांत उत्पन्न करते. त्या दृष्टीनें या कथेचा आदि, मध्य व अंत हे आई आणि मुलगा यांच्या मानसिक कलहाभोंवतींच गुंफायला हवे होते. पण देशपांड्यांनीं गोष्टीचा आरंभ भाई किडक्यांच्या अप्रस्तुत व्याख्यानबाजीनें केला आहे, नंतर नायकाला पत्नीच्या एका प्रेमपत्राची आठवण करून दिली आहे आणि मग मायलेकरांच्या बोलण्यांतून, नोकरीच्या अभावीं त्याचा शेती करण्याचा उद्देश व त्या गोष्टीला असलेला तिचा विरोध या गोष्टीकडे ते वळले आहेत. त्याचा बेत व तिचा विरोध हे महत्त्वाचे भाग नाट्यपूर्ण करण्याकडेही त्यांनीं लक्ष पुरविलेलें नाहीं. उलट शेती सोडून शहरांत जाणाऱ्या एका शेतकऱ्याच्या कहाणीला मधेंच त्यांनीं अवास्तव महत्त्व दिलें असल्यामुळें या लघुकथेची रचना अधिकच शिथिल झाली आहे. कथेंतल्या मध्यवर्ती कल्पनेचा परिणामकारक विकास करण्याच्या कामीं तिचा सहज उपयोग होऊं शकला असता. पुढें पुढें तर कथानकाला गति नाहीं किंवा आईची नि मुलाची गांठही

पडत नाहीं. उलट सुनेचें मोलकरीण ठेवावी कीं नाहीं या बाबतींत सासूशीं भांडण झाल्याचें आणि गच्चीवर फक्त नायकाचा एकच बिछाना घातला गेल्याचें वाचकांना कळून येतें! अशा स्थितींत कथानकाचा शेवट 'संततिनियमनाच्या गोळ्या बोलावल्या आहेत. त्या येईपर्यंत कालच्याप्रमाणंच......अन् पैसा मिळूं लागला कीं प्रथम कोणती वस्तु खरेदी करणार आहे समजलं?......एक सुंदर पाळणा!' या नायिकेच्या शब्दांनीं झाला नसता तरच नवल!

श्री. देशपांडे यांच्या लेखनांत शब्दांची, कल्पनेची व कथानकाची चमत्कृति आहे. जीवनांतल्या सूक्ष्म अनुभूतीचे बोल लेखनांतून निनादित होण्याइतकी प्रगल्भता त्यांना आली नसली तरी अनेक स्थूल अनुभूतींचा आविष्कार करण्याची त्यांना हौस आहे. आपल्या भोंवतालच्या जीवना-विषयीं ते उदासीनही नाहींत. त्यांच्या दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या कथेंत परदेशी कापड न वापरण्याच्या विषयाचा जो उल्लेख आला आहे, तो त्यांना आजकालच्या राष्ट्रीय गोष्टी किती जिव्हाळ्याच्या वाटतात हें सहज दर्शवूं शकेल. 'वहिती'सारख्या शब्दापासून 'बापूजीं'च्या उल्लेखापर्यंतच्या अनेक गोष्टींत त्यांचा 'वऱ्हाडी'पणाही प्रचीत होतो. आज बीजरूपानें त्यांच्या लेखणींत असणाऱ्या या सर्व गुणांचा ते अभ्यासपूर्वक विकास करतील तर उदयोन्मुख कथालेखकांत त्यांना निश्चित स्थान मिळेल. लेखनकलेइतकी भक्ताची कसोटी पाहाणारी उग्र देवता दुसरी कुणीच नाहीं. पण ती प्रसन्न झाली कीं, त्या भक्ताला दुर्लभ किंवा दुर्लंघ्य असें कांहींच नाहीं, हें काय श्री. देशपांडे यांना कुणीं सांगायला हवें?

२९-९-४१
कोल्हापूर.

वि. स. खांडेकर.

# झिम् झिम् !

बापूजी अणे आणि वामनराव जोशी, भविष्यकालाचे उद्गाते बी कवि आणि भूतकाळांत फेरफटका मारून येणारे य. खु. देशपांडे, व्हेरम् कापसाच्या पांढऱ्याशुभ्र बोंडांच्या रूपानं खदखद हंसणारी सुपीक जमीन आणि काळ्या घोंगडीवर जीवन कंठणारा गरीब शेतकरी या उदात्त नि उदासरम्य विरोधाभासाप्रमाणं जत्रा आणि तमाशा अशासारखे कांहीं चमत्कृतिजनक विरोधाभासही आमच्या वऱ्हाडांत दृष्टोत्पत्तीस येतात ! साहित्यशास्त्राच्या आधारानं शृंगार आणि भक्ति हीं एकाच स्थायीभावाचीं जुळीं अपत्यें आहेत असं म्हणून एखादा टीकाकार या प्रकाराचं समर्थन करूं लागला तर, या रसिक राजानं स्वतःच्या लग्नांत मोत्याऐवजीं मिठाच्या खड्यांची तर मुंडावळ बांधली नसेल ना, अशी शंका माझ्या मनांत चमकून जाते !

विरोधाभास हा अलंकार खरा, पण असल्या प्रकारचा विरोधाभास मला मोहनमाळेपेक्षां शृंखलेसारखा भीतिदायक वाटतो !

एकदां मी कांहीं मित्रांबरोबर खेडेगांवची जत्रा पहायला गेलों होतों. पण त्या ठिकाणीं मला कोणतें दृश्य दिसलें ? जत्रेस येणारे ' भाविकजन ' फुलें खरेदी करीत होते पण तीं देवाला वाहण्यासाठीं नव्हे,–तमाशांत नाचणाऱ्या छचोर पोरीच्या चेहऱ्यावर उधळण्यासाठीं !

पावित्र्याचं इतकं क्रूर विडंबन दुसरीकडे कुठं आढळून येऊं शकेल ? असा मीं मनाला प्रश्न केला. अन् काय आश्चर्य ! उत्तराच्या अपेक्षेनं तो प्रश्न विचारला नसतांहि अवखळ मन म्हणालं, सध्या मराठी वाङ्मयाची तरी अशीच स्थिति नाहीं कां ?

होकारार्थी मान हलविल्याशिवाय मला गत्यंतरच नव्हतें.

कुठल्याहि ललितकलेचें स्वरूप जत्रेसारखें असावें असें माझें मत आहे. रंजनाच्याच दृष्टीनें पाहिलें तर जत्रेंत काय कमी गोष्टी असतात ? ताजीं फळं, उसाचा रस, आकाशपाळणा, संसारोपयोगी सुंदर सुंदर वस्तु, भिन्न भिन्न स्वभावाच्या व्यक्तींचं दर्शन...या साऱ्या गोष्टींतून परमेश्वराच्या नितांतमधुर स्वरूपाचीच सूक्ष्म प्रचीति येत नाहीं का ?

जीवनांतल्या उदात्त नि उत्कट प्रसंगाची अनुभूति द्यायला समर्थ असलेल्या कलेलाहि स्वतःच्या सौंदर्याचा नि कौशल्याचा ' तमाशा ' न मांडतां रसिकजनांचं अन्तःकरण आकर्षित करतां येईल असा मला विश्वास वाटतो.

प्रस्तुत कथासंग्रहानें माझा हा विश्वास अल्पस्वल्प जरी खरा करून दाखवला तरी मला कलानिर्मितीचें साफल्य झाल्यासारखें वाटेल.

व्यवहारांत शिस्तीला जें महत्त्व तेंच कलाकृतींत तंत्राला आहे. नुसते स्वर म्हणजे संगीत नव्हे अगर रंग म्हणजे चित्र नव्हे; तसें नुसते विचार किंवा कल्पना म्हणजे ललित वाङ्मय नव्हे. शिस्तीमुळें जीवनांत सौंदर्य आणि सुखसोयीहि निर्माण होतात. तंत्रहि वाङ्मयांत हेंच कार्य करीत असतें.

हें तत्व मनाशीं बाळगूनच प्रस्तुत संग्रहांतील कथा लिहायचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत प्रयत्नांत पाताळांत गंगा नेणाऱ्या भगीरथाचं तपःसामर्थ्य आहे असं मला कधींच वाटणं शक्य नाहीं. मेघांचे भारे वाहून आणून मंद झिमझिमीनें वसुंधरेला पुलकित करणाऱ्या वायुलहरींच्या यशाची मात्र प्रस्तुत लेखकास हांव आहे !

या कथासंग्रहांतील पहिली गोष्ट सोडून बाकीच्या सर्व एक वेळ ज्योत्स्ना, विहंगम, कला, महाराष्ट्रपरिचय वगैरे नियत कालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांना प्रसिद्धि देणाऱ्या संपादकांचा, अनुकूल अभिप्राय देऊन लेखनास उत्तेजन देणाऱ्या टीकाकारांचा व वेळोवेळीं नव्या लेखनाच्या वाचनासाठीं उत्सुकता दाखवणाऱ्या प्रेमळ स्नेह्यांचा मी सदैव ऋणी राहीन.

रसिकांच्या हातीं ही माझी पहिलीवहिली कृति देण्यापूर्वीं तिच्या बाह्य सौंदर्यप्रसाधनाची शक्य ती काळजी घेणारे कॉंटिनेन्टल बुकसर्व्हिसचे चालक श्री. गो. रा. पाटणकर व ज्ञानविलास छापखान्याचे मालक श्री. बा. भा. जोशी, आणि घरांतल्या वडिलधाऱ्या व्यक्तीच्या भूमिकेवरून कथाकन्येस प्रेमळ इषारा देणारे श्री. वि. स. खांडेकर यांचें साहाय्य मला लाभलें नसतें, तर हा शुभ क्षण आणखी एक वर्ष तरी लांबणीवर पडला असता !

विजयादशमी १९४१
पुणें २

बाळशंकर देशपांडे.

# अनुक्रमणिका

आई आणि अफू
निवडुंगाचीं फुलें
स्मशानांतला चांफा
निर्माल्याची शेज
कांट्यांची किंमत
खारा आड
श्रावणांतल्या विजा
रेशमी गांठ
पांढरे ढग
यंत्र

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २.

# आई आणि अश्रू ! : : १

मोटारींतून उतरून वरीं जातांना विनायकाला वाटत होतं, आपण एखाद्या अजस्र तुरुंगाचीच वाट चालत आहोंत ! आई ही त्या तुरुंगाची सुपरिंटेंडेंट, पत्नी ही वॉर्डर, आपण कैदी, बेकारी हा आपला गुन्हा, त्या गुन्ह्याबद्दल शिक्षा–हजारों रुपये दण्ड किंवा जन्मभर सश्रम कारावास ! दण्डासाठीं रक्कम मिळवायला नोकरीचा शोध केला; पण हल्लीं ऑफिसांतल्या खुर्च्यांची उंची गौरीशंकराच्या शिखरापेक्षांहि वाढली आहे. एखाद्याच भाग्यवान् प्राण्याला तिच्यावर आरूढ होतां यायचं. फेटाळलेल्या अर्जांची भेंडोळीं घेऊन परत आलेल्या आपल्यासारख्या कम्नशिबी बेकाराला यापुढें घराच्या कैदखान्यांत सक्त मजुरी करावी लागणार. आईच्या नि इंदिरेच्या दूषणांचीं ओझीं वहायचीं, मनांतलीं सुन्दर सुन्दर स्वप्नं भरडून काढायचीं, ध्येयाचे तुकडे तुकडे–छे, गिट्टी फोडून कालपुरुषाच्या पायदळीं टाकायची...

विनायकाला हसूं आलं. पाहतां पाहतां कवि झालों कीं आपण ! तेंही निव्वळ कल्पनेच्या आकाशांत भराऱ्या घेणारा चंडोलछाप कवि नव्हे; वास्तवतेच्या वाळवंटांत अनुभवाच्या उंटावर बसून—

पण या वेळेस तो पहिल्यापेक्षांही मोठ्यानं हंसला. त्याला वाटलं, उंटावरला शहाणाच आहें मी. मोटारींत भाई किडक्याची ती बड-

वड ऐकून आपण आपल्या आईचं न् इंदिरेचं किती विकृत चित्र रंगाविलं !

त्याच्या दृष्टीसमोर अटकेपूर्वीचा सारा प्रसंग उभा राहिला—

' दिगंबर पैगंबर सर्व्हिस ' ची ती मोटार लॉरी ताशीं दहा मैल, पांच पंक्चर्स आणि पन्नास धक्के या प्रमाणांत धावत होती, आणि भाई किडके ताशीं पांच फिट्स, पंचवीस ठसके आणि पन्नास शिव्या या प्रमाणांत काव्यावर व्याख्यान झोडीत होते. व्याख्यान कसलं ? प्राचीन–अर्वाचीन कवींनाच झोडून काढीत होते. समोर ठेवलेल्या पेट्रोलच्या रिकाम्या डब्याला काव्य कल्पून ते रागारागानं मुठी आवळून म्हणत होते, ' हें काव्य म्हणजे समाजवृक्षावर उगवलेलं बांडगूळ आहे. वृक्षाची सारी विकसनशक्ति बांडगुळाला पोसण्याकडे खर्च होते, अन् स्वतः वृक्ष खुरटून जातो. निकामी बनतो ! समाजाला काव्यसृष्टींत विहार करणं रुचूं लागलं, पण त्याबरोबरच त्याची प्रत्यक्षांत वावरायची ताकद नष्ट झाली. खोट्या कल्पना, खोटे संकेत, खोटं सुख, खोटं प्रेम यांनाच तो आपलं जग मानूं लागला.

नन्तर ते विनायकाकडे बोट करून म्हणाले, ' मी काय म्हणतों, हें या मिस्टरना चांगलं कळून येईल. हे चांगले शिकलेसवरलेले असून, कुठं-तरी नोकरी पहायला गेले होते. पण निराश होऊन आपल्या गांवीं जात आहेत. तसे हे कांहीं माझ्या परिचयाचे नाहींत; पण यांचं लग्न झालं असावसं वाटतं. आईही असेल कदाचित्. आतां पहा अं. कॉलेजांत संस्कृत काव्य वाचून यांची काय कल्पना झाली असेल ? जीवन ही दिवाळी आहे. पत्नीच्या हास्याच्या फुलबाज्या, आईच्या ममतेची चन्द्र-ज्योत, बहिणीच्या प्रेमाचे हवाई नळे, या काल्पनिक आतषबाजींत या मिस्टरचं मन दंग झालं असावं. पण आज ? आज ज्या त्या ऑफिसच्या दाराशीं No vecancy ची पाटी वाचतांना यांना त्या ठिकाणीं अक्षरं दिसत असतील–जीवन ही दिवाळी नाहीं, शिमगा आहे ! फुलबाज्या, चन्द्रज्योत आणि हवाई नळे, यांच्यांतला नयनमनोहर अग्नि आतां

होळीच्या रूपांत आपलं विक्राळ स्वरूप प्रगट करील. नोकरी मिळाली नाहीं म्हणून आई संतापेल, पत्नी रुसेल, बहीण पाय आपटील...तेव्हां आर्थिक पायावर उभारलेली ही समाजरचनाच समूळ बदलायला पाहिजे. माझं तरुण साहित्यिकांना नेहमीं सांगणं असतं, जिवंत खरं वाङ्मय निर्माण करा. समाजाला व्यापक प्रेमाची कल्पना शिकवा. केवळ आप्तेष्टांपुरतीच प्रेमाची मर्यादा सांभाळणं म्हणजे मनाचा संकुचितपणा जाहीर करण्यासारखं आहे!'

भाई किडक्याच्या भाषणांतला शब्द न् शब्द आठवल्यावर विनायकाच्या मनांत आलं, बिचाऱ्याची आई लहानपणींच दगावली असावी, अन् पत्नीच्या सहवासाचा अनुभव नसावा; आणि दोघंहि सहवासाला असतील तर आई म्हाळसाकाकूच्या नि बायको कैकेयीच्या वंशांतली असावी!

उधाणलेली हवा वहात होती. त्याला वाटलं, या आह्या नाहींत. 'मातृदेवो भव' 'प्रियेषु सौभाग्यफलाहि चारुता' वगैरे वचनांनीं मातेची व गृहिणीची थोरवी गाणारे मनु, कालिदासादि कविश्रेष्ठ भाई किडक्याचं अज्ञान पाहून दुःखाचे उच्छ्वास टाकीत आहेत. आकाशवाणीची प्रथा आजही रूढ असती तर भाई किडक्याचं वक्तव्य चालू असतांना, आभाळांत 'शेम! शेम' असा एकच ध्वनि उठला असता. जग हें या प्रखर उन्हासारखं दुष्ट असेल, त्याच्या कढत झळा लागूं नयेत म्हणून, हातीं लक्ष्मीचं छत्र धरणं अवश्य असेल, पण आई? कालिदास उपमा देण्यांत एवढा पटाईत, पण तो सुद्धां आईसाठीं योग्य उपमा सांपडली नाहीं म्हणून खिन्न झाला असेल!

तो नकळत गुणगुणूं लागला—तें हृदय कसें आईचें। मी उगाच सांगत नाहीं। जें आनंदेंहि रडतें—

आनंदानं रडणाऱ्या आणि प्रसूतिवेदनांनीं हंसणाऱ्या नवलकारक हृदयाच्या आईचं दर्शन घेण्यासाठींच कीं काय, तो भरभर चालूं लागला.

एका उपाहारगृहांत ‘ रानारानांत गेली बाई शीळ ’ ही रेकॉर्ड लागली होती. तो मनाशीं म्हणूं लागला. तसं म्हटलं तर या गीतांतल्या रायाला कोणतं ऐश्वर्य होतं ? रहायला बंगला नव्हता, सुटाबुटाची ओळख नाहीं, लक्स, हॅजलीन, पॉपिआ या मंडळीशीं तर उभ्या जन्मांत गांठही पडली नसेल. तरीहि त्याची कारभारीण त्याच्यावरून जीव कुरवंडून टाकते. त्याच्या भुकेची वेळ टळली तर गोरीमोरी होते, ज्वारीच्या पिकांत गोड सळसळ झाली कीं, रायाच्याही मनांत गोड खळबळ सुरूं होते. आपल्या लाडक्या पांखराला पहायला त्याचे पंचप्राण डोळ्यांत गोळा होतात... याचंच नांव सुख नाहीं का ? सुख बंगल्यांत नसतं, हृदयाच्या गाभाऱ्यांत त्याची जागा आहे. इंदिरेपासून याच सुखाची अपेक्षा करणं वेडेपणाचं ठरेल का ?

त्याला तिच्या एका जुन्या पत्राची आठवण झाली. तिनं लिहिलं होतं—

“ इकडच्या भेटीसाठीं किती अधीर झालें आहे म्हणून सांगूं ! तशी इथं कोणत्या गोष्टीची कमतरता आहे ? आईबापाची गाढ माया, बाळपणांतल्या प्रेमळ मैत्रिणी, रेडिओवरलं सुस्वर संगीत, रातराणीचीं सुगंधी फुलं...

‘ सारी सुखं हाताशीं आहेत. पण काय ? देखावा कितीही सुंदर असला, तरी साध्या कांचेवर थोडाच त्याचा ठसा उमटतो ? त्याला ती फोटोग्राफरचीच विशिष्ट कांच हवीना ? माझ्या मनाची संस्कारक्षमता नष्ट होऊन तें साध्या कांचेप्रमाणें ‘ स्थितप्रज्ञ ’ बनलं आहे.

‘ अंगणांतल्या रातराणीवर फुलं उमललीं कीं वाटतं, काय करायचीं हीं तोडून ? हे इथ असते तर हळूच मागून येऊन एखादी कळी वेणींत खोवली असती ! पहाटेचा चहा घेतांना वाटतं, आई किती गोड चहा करते, पण तिकडल्या बरोबर हंसत बोलत घेण्यांत जी मौज आहे, ती कांहीं इथं नाहीं !

‘ पाकांतल्या पुऱ्या मला आवडतात म्हणून मुद्दाम आईनं परवां केल्या होत्या. पण त्या उष्टावण्यापलीकडे कांहीं माझं जेवणांत लक्ष

नव्हतं. कशीबशी पहिली पुरी संपवून मी मागचा भात मागितल्यावर आई म्हणाली, भारी बाई नाजूक पोरं आतांची ! पोट दुखेल म्हणून हात आवरलास ना ?

' भोळी बिचारी आई ! तरुणांना शरीरापेक्षां मनाचींच दुःखं अधिक असतात हें तिच्या कुठून लक्षांत राहायला ? आई जेव्हां जेव्हां गोड पदार्थ करून वाढते, तेव्हां तेव्हां वाटतं, आपण इथं असं मिष्टान्न खात आहों; पण तिकडे मात्र साधी भाकरी खाणं होत असेल. अन् मग कांहीं केल्या जेवण जात नाहीं !

' गरीबींत सुख आणि खडकांत पाणी असत पण केव्हां ? खडकाचे दोन थर एकमेकांना बिलगून असतील तेव्हांच. चांदण्यांत अगदीं जवळ जवळ बसून आपण परस्परांना दिलेले दहीभाकरीचे घांस काय कमी गोड होते ? एका दृष्टीनं गरीबीच बरी वाटते बाई मला तरी...'

इंदिरेच हें पत्र म्हणजे प्रीतीच्या वैकुंठनगरीचं दर्शन घडविणारं पवित्र तुळशीपत्रच नव्हतं कां ? अन् मघाचं भाई किडक्याच तें वक्तृत्व म्हणजे दुसऱ्याच्या खाजगी मालमत्तेवर ठेवलेल तुळशीपत्रच...

त्या कल्पनेला हंसत असतांच तो आपल्या वाड्यांत शिरला. सुभद्राबाई ओसरीवर शेंदरी शिवीत बसल्या होत्या. ती शिवतांना त्यांचं हृदय तिळ-तिळ तुटत होतं. पण तेंही शिवायचा धागा सांपडला या कल्पनेनंच कीं काय, त्या लगबगीनं ओसरीवरून मोहटींत आल्या आणि विनायकाच्या पाठीवरून प्रेमळपणानं हात फिरवीत म्हणाल्या, ' किती उन्हांत आलास ? '

नमस्कार करतां करतां विनायकाच्या जिभेवर शब्द आले, 'आग विझ-वायला निघालेल्या माणसानं उन्हाला भिऊन कसं चालेल ? ' खिशांत एक वेळच्या जेवणापुरतेहि पैसे शिल्लक नव्हते, म्हणूनच तो घाइनं परत आला नव्हता का ? पण तें रहस्य एकदम प्रगट न करतां तो हसत म्हणाला—

' संध्याकाळच्या मोटारनं निघालों असतों, तर आपल्या गांवांतल्या

‘ उपासतापासतोडक मंडळानं ’ मलाच फाडून खाल्लं असतं ! ’

‘ म्हणजे ? त्यांच्या सभेचा अध्यक्ष बिध्यक्ष—’

‘ छेः ! छेः ! संध्याकाळपर्यंत उपाशीं राहिलों असतों तर, एम. ए. मनुष्य नोकरीसाठीं शनिवार करायला लागला असा याचा अर्थ घेऊन सुधारक मंडळी रागावली असती ना माझ्यावर ! ’

विनायक हंसूं लागला. पण आईची माया क्ष किरणासारखी असते. हास्याच्या सुंदर कातडीखालीं लपलेलं दुःख तिच्या नजरेस आल्यावांचून रहात नाहीं. सुभद्राबाई अंगणांतल्या निष्पर्ण कदंबाकडे पाहूं लागल्या. त्यांना वाटलं, परवांपर्यंत कसा पानाफुलांनीं लवला होता हा वृक्ष. आपलं देशमुख घराणंसुद्धां असंच ऐश्वर्यसंपन्न होतं. कदंबावर राघूचिमण्या चिवचिवत होत्या नि घर नोकराचाकरांनीं गजबजून गेलं होतं. पण आज ? आज वृक्षावर कावळे ओरडत आहेत अन् विनू बाळाच्या पोटांतसुद्धां......

त्यांनीं चटकन् तोंड फिरवून डोळ्यांतले अश्रु पुसले.

‘ आई, बेकारीवर रामबाण उपाय सांपडला मला.’

‘ चोवीस तासांत गुण येणार असेल मग ? ’

‘ अंह ! त्याला एक वर्ष लागेल ! ’

‘ अगबाई ! अन् पथ्य ? ’

‘ मराठी कादंबऱ्या मुळींच वाचायच्या नाहींत ! अनुपान कांद्यांची भाजी—’

‘ भलतीच थट्टा असते तुझी विनू ’

‘ थट्टा नाहीं आई ! कादंबऱ्यांतल्या विलासी नायकांच्या वाऱ्यानं आजवर माझी जीवननौका कुठल्याकुठं वाहवली. शिडांत वारं भरून जहाज भडकलं म्हणजे खलाशी काय करतात ठाऊक आहे ? नांगर टाकतात ! वहितीवांचून आपली माणिकमोलाची जमीन कवडी किंमतीची होत आहे. तिच्यांत नांगर टाकून मीहि माझं स्वैर जीवन सावरणार आहे.’

‘ पण शेतीला वाईट दिवस आले आहेत बाळ ! आतांच शिवऱ्याची

बायको शेतीची कर्मकहाणी सांगून गेली. धन्याचा वायदा फेडण्यापुरताही शेतांत माल पिकेना म्हणून शिवऱ्यानं शहरांत जाऊन कोणतीशी नोकरी धरली. त्याबद्दलच शिरणी आणली होती तिनं. पृथ्वीवर पाप फार व्हायला लागलं! कशी प्रसन्न होणार मग धरणी देवी ? असा निराश होऊ नकोस विनू. हिऱ्याला देखील राजाच्या मुगुटांत बसण्यापूर्वी जगभर भटकावं लागतं. म्हणून कांहीं मुगुटाची हाव सोडून तो आंगठींत जखडून घ्यायची इच्छा करीत नाहीं. आज ना उद्यां तूं प्रोफेसर होशील, पगाराला खिसा नि कीर्तीला जग अपुर पडेल......'

सुभद्राबाईंचा प्रत्येक शब्द—छेः, जगांतल्या कर्णकर्कश कोलाहलाची विस्मृति पाडणाऱ्या मधुर अंगाईगीताचा सूर विनायकाला गुंगवीत होता. पण स्वयंपाकाला लागण्यापूर्वी सुभद्राबाईंनीं जी ताजी बातमी सांगितली ती ऐकतांच विनायकाची गुंगी साफ उतरली. एक तासापूर्वी इंदिरा आणि सुभद्राबाई यांच्यांत कडाक्याचं भांडण झाल होतं. विनायक श्रीमंत असता तर, फिरायला बग्गी ठेवावी कीं मोटार ठेवावी या विषयावर दोघींचा मतभेद झाला असता. पण घटकेपूर्वी झालेला वादाचा विषय अगदींच सामान्य होता. कामावरली मोलकरीण काढावी कीं ठेवावी या मुद्यावरून भांडण निघालं. पुरुषांचं भांडण कोर्टापर्यंत आणि स्त्रियांचं अश्रूपर्यंत जातं, या सनातन सिद्धांतावरून इंदिरा खोलींत उशींत डोकं खुपसून निजली असेल असा विनायकानं तर्क बांधला. पण तो चुकीचा ठरला. परसांतून इंदिरेचा आवाज येतांच त्यानं हळूच डोकावून पाहिलं. ती धुणं धुतां धुतां शिवऱ्याच्या बायकोबरोबर बोलत होती. थोड्या वेळानं सारजा निघून गेल्यावर इंदिरेनं हातांतला खडीसाखरेचा खडा दूरवर भिरकावून दिला; आणि धुणं पिळू लागली. पिळतां पिळतां तिच्या डोळ्यांत अश्रु आले!

त्या दृश्यावर विनायकाचा प्रथम विश्वासच बसेना. आपली पत्नी इतकी मत्सरी आहे? शिवऱ्याला नोकरी मिळाल्यामुळं त्याच्या बायकोनं भोळ्या भावानं आणून दिलेला प्रसाद फेकून द्यावा? दुसऱ्याच्या सुखदुःखाशीं समरस होण्यांतच माणुसकी नाहीं का? मग—

इंदिरेचं क्षणभरहि तोंड पाहूं नये या कल्पनेनं तो मागं फिरला. पण तिच्या चेहऱ्याची स्मृति त्याचा पाठलाग करीत होती. इतकंच नव्हे तर त्याचा कठोर निश्चय विरघळू पहात होता. उन्हानं किती लालबुंद झाला होता तिचा चेहरा ! आणि त्यावर निथळणारे ते घर्मबिंदु—

एखाद्या जुन्या कवीनं पिकलेल्या शेंदरी आंब्यांतून रसधारा वहात आहेत अशीच उत्प्रेक्षा केली असती; पण तो पिकलेला आंबा नव्हता. परिस्थितीच्या आचेनं तापलेला लोहगोल होता. कमालीच्या उष्णतेमुळें आंतून ऊनऊन रस उफाळत होता !

आईनं त्याच्यावर काटकसरीच्या धोरणाचं जलसिंचन केलं किंवा सारजेनं खडीसाखर दिली, म्हणून त्याचा दाह थोडाच शांत होणार होता ? उलट शिम्पलेल्या पाण्याची वाफ आणि सारजेच्या खडीसाखरेची राख झाली हेंच साहजिक नव्हतं का ? पाणी शिम्पणाऱ्याच्या भाबडेपणाबद्दल लोखंडानं चुर्र असा आवाज काढून निषेध दर्शविला तर त्याला भांडण म्हणतां येईल का ?

पण विनायकानं इन्दिरेतर्फे केलेली ही वकीली फारशी यशस्वी झाली नाहीं. प्रतिपक्षाकडील वकीलाच्या प्रश्नांपेक्षां कोर्टांतल्या गर्दीतच एखादा वकील घाबरून जावा, त्याप्रमाणं त्याची स्थिति झाली. ' मार्क्स ' ' भाई किडके ' ' स्त्रिया आणि आर्थिक स्वातंत्र्य ' वगैरे मण्डळी जोरजोरानं स्टँपिंग करून त्याला फजीत करायचा प्रयत्न करीत होती.

मनाच्या कोर्टांत आणि जनाच्या हायकोर्टांत एखाद्या गोष्टीचा समाधानकारक निकाल लागला नाहीं, म्हणजे माणूस आपली फिर्याद काळाच्या प्रिव्ही कौन्सीलकडे घेऊन जातो !

इन्दिरा बुभुक्षित असली तरी माणुसकीला खाण्याचं पाप तिच्या हातून घडणं शक्य नाहीं, हें कालांतरानं तरी आपणाला पटेलच पटेल, असं तो पुनः पुनः मनाशीं म्हणत होता.

' इश्श ! इतकं टक लावून पहायला मी कांहीं ताजमहाल नाहीं ! ' खांद्यावर धुण्याचे पिळे टाकतांना इन्दिरेनं हंसत म्हटल्यावर तो विचार-

तंद्रींतून जागा झाला आणि चेहऱ्यावर शक्य तितकी प्रसन्नता आणा-यचा प्रयत्न करीत म्हणाला, ' मग काय मक्केची मशीद आहेस ? '

मानेला मोहक झटका देऊन इंदिरेनं निषेध व्यक्त केला.

' मी एक चित्र पहात होतों.'

' त्या चित्राचं नांव मजुरीण—'

' अंहं ! खरी ओलेती ! '

' अगबाई ! मग रत्नाकरांतल्यापेक्षांहि मोठं वादळ होणार तर मग ! '

' हो, पण तें आम्हां सोशालिस्टांच्या अन्तःकरणांत ! '

' अन् तें वादळ नाहींसं करणारा मार्क्स म्हणजे अगस्तिच म्हणावा लागेल मग ? '

यावर दोघेहि हंसले.

' नोकरीचं काय झालं ? '

' नागपूरच्या कॉलेजांत एक जागा आहे, पण त्यांना एम. ए. माणूस नको.'

' सैबेरियाकडला एस्किमो पाहिजे वाटतं ! '

' चालेल ! कॉलेज झाडून काढायलाच इसम हवाय् ! मी एम. ए. नसतों तर......'

त्यानं इंदिरेकडे पाहिलं. वसन्ताची शोभा वर्षाऋतूच्या धारा धुऊन काढीत होत्या !

* * * *

रात्री उशीरांच तो घरीं परत आला. आकाशांत तेजाळ नक्षत्रं लुकलुकत होतीं, आणि त्याच्या मनांत सुखदायक आशा हंसत होत्या. इंदिरा गच्चीवर आपली वाट पहात असेल, आपणाला पाहतांच ती जवळ येऊन लडक्या रुसव्यानं म्हणेल, ' किती उशीर केला यायला ? '

आपण हंसत उत्तर देऊं, ' वाट चुकलों होतों ना घराची ! '

' चांदणं पडलंय येवढं चांगलं ! '

' म्हणून तर फसगत झाली. मला वाटलं तूंच गच्चीवर बसून पांढरा

रुमाल विणीत आहेस. नंतर लक्षांत आलं, तो चंद्र आपला नाहीं.आपला चंद्र जांभया देत...'

तिच्या ओठांना स्पर्श करतांच ती लाजेल.

पण गच्चीवर स्वतःचा एकच बिछाना पाहून त्याच्या मनांतल्या ज्येष्ठी पौर्णिमेची चैत्री पौर्णिमा झाली! सावित्रीच्या पतिनिष्ठेशीं स्पर्धा करणारं पुनवेचं मंद चांदणं कुठं अन् मारुतिरायाच्या ब्रह्मचर्याची आठवण करून देणारं चैत्री पुनवेचं खरखीत चांदणं कुठं!

तो गच्चीवरून माडींत आला. इंदिरा सज्जांत टाकलेल्या आपल्या बिछान्यावर पडून कुणाला तरी पत्र लिहीत होती. लिहितांना तिच्या मानेची व इतर अवयवांची होणारी हालचाल त्याला एकाद्या उच्छृंखल जलौघाप्रमाणं वाटत होती. तर पलीकडेच शांतपणें झोंपलेल्या आईची मूर्ति निश्चल, पवित्र तीर्थाची आठवण करून देत होती.

तो परत अंथरुणावर जाऊन पडला.

अकरा–बारा–एक—

रात्रीबरोबर त्याच्या मनाची अस्वस्थताहि वाढत होती. 'अविदित-गतयामा' या वचनाची दुसरी बाजू त्याला इतक्या कटुतेनें अनुभवायला कधींच मिळाली नव्हती! दीडच्या सुमाराला तो पुनः माडींत आला. इंदिरा झोपली होती. उशालगतचा दिवा मोठा करून त्यानं पत्रावरला पत्ता वाचला—'गोपाळ सखाराम आणि कंपनी'

एक उत्तम हार्मोनियम धाडून देण्याबद्दल तिनं लिहिलं होतं!

गाण्याचे जलसे करून पैसा मिळवायची कल्पना तिच्या डोक्यांत आली असेल का? पण तसं म्हणावं तर तिनं गाण्याचें सशास्त्र शिक्षण कुठंच घेतलं नव्हतं. आणि गाण्यावर पोट भरायची कल्पना आईला तरी कशी पसंत पडली असती?

इंदिरेला उठवावं असं एक वेळ त्याच्या मनांत येऊन गेलं. पण तो विचार काढून टाकून तो जड पावलांनीं गच्चीवर गेला.

निर्धन मनुष्य प्रेयसीच्या दृष्टीनें इतका उपेक्षणीय ठरावा! विवाहा-

नंतर सुरवाती सुरवातीला इंदिरेनें पत्रांतून गायिलेले गरीबीचे गोडवे...
उषःकालांतले दंवबिंदु दुपारपर्यंत टिकत नाहींत हेंच खरं !

दारिद्र्याचा राक्षस इंदिरेला बळजबरीनं आपणापासून दूरदूर नेत आहे या कल्पनेनं त्याची झोप उडत होती.

दुसरे दिवशीं तो भाई किडक्याच्या व्याख्यानाला गेला. टाळ्यांच्या गजरांत त्याचं व्याख्यान संपल्यावर विनायक टेबलापाशीं येऊन म्हणाला,

'समाजवादावर इतकं सुंदर व्याख्यान क्वचितच कुणीं दिलं असेल. तें नुसतं सुंदरच नव्हतं, सत्य आणि शिवहि होतं. समाजाला जडलेला भांडवलशाहीचा आणि ऐषआरामाचा रोग समाजवादानंच नाहींसा होणार आहे.

आजपर्यंत मी या उपयुक्त नि प्रभावशाली विचारप्रणालीकडे दुर्लक्ष केलं याचा मला खेद वाटतो. जगांत विश्वबंधुत्वाची भावना नांदायला हवी. यापुढें पत्नी, ताई, दादा हीं मर्यादित नातीं विसरून मी विश्वाच्या अफाट प्रपंचांत रंगून जायचा प्रयत्न करीन. माझी तुटपुंजी स्थावरजंगम दौलत समाजाला दान करून...'

त्याचं वाक्य पुरं होण्यापूर्वीच भाई किडक्यानं त्याला कडकडून आलिंगन देऊन शतशः धन्यवाद दिले. व्याख्यान आटोपल्यावर त्याच्याहि गळ्यांत किडक्याइतकेच पुष्पहार पडले आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यानंतर इंदिरा बोलायला उठली. ती म्हणाली, 'पाहुण्यांच्या व्याख्यानाला आमच्या घरच्यांनीं 'सत्यं शिवं सुंदरं' म्हटलं. मलाहि तीन विशेषणं सुचलीं. अर्धवट, आचरट आणि अराष्ट्रीय विचारांनीं बरबटलेली ती एक पोकळ बडबड आहे ! आर्यांच्या भरतखंडांत, श्रीकृष्णाच्या कर्मभूमींत, शिवाजीच्या मावळ मुलुखांत हें साता समुद्रापलीकडचं अजागळ तत्त्वज्ञानाचं बीं रुजणं शक्य नाहीं. हिंदुस्थान उपाशीं मरत आहे हें मला दिसतं; पण त्यानं लुटारू बनून आपली खळगी भरावी असं कुणीहि विचारवंत मनुष्य म्हणणार नाहीं. समाजवाद म्हणजे निव्वळ लुटारूपणा आहे. हिंदुसंस्कृति लुटारू बनायला शिकवीत नाहीं. ती सम्राट्पद जिंका-

यचा संदेश देते. इंद्राप्रमाणं विजेता, कुबेराप्रमाणं श्रीमान्, नि रघूप्रमाणं बलाढ्य बनायला सांगते! उपभोग घेणाऱ्यांनींच त्यागाच्या गप्पा कराव्यात. दयेच्या गोष्टी बोलाव्यात! दिङ्मूढ समाजा, वैदिक ज्ञानाची जोपासना कर, अटकेपर्यंत पोंचलेलं क्षात्रतेजाचं वलय इटली–अबेसीनिया नि इंग्लंड–जर्मनीच्या सरहद्दीभोंवतीं तळपूं दे, अमेरिकेंतल्या बाजारपेठा हिंदुस्थानांतल्या मालानं भरून टाक...'

इतक्यांत शेम, 'शेम फॉर सनातनिस्ट व्ह्यूज्' असा पुरोगामी गटानं एकच गिल्ला केला. सनातनी मंडळीहि कांहीं कमी स्पिरिटेड नव्हती. तेहि जोरानं ओरडून म्हणाले, 'इंदिराबाई की जय! समाजवाद मुर्दाबाद–!'

त्या गोंधळांतून भाई किडके केव्हांच पसार झाले. विनायकहि गळ्यांतले पुष्पहार सावरीत त्यांच्या पाठोपाठ धावत सुटला. कुणीतरी हार ओढीत आहे असं वाटून तो त्यांना हृदयाशीं घट्ट धरूं लागला; तोंच, 'इश्श! असं काय करायचं!' या शब्दांनीं तो जागा झाला. इंदिरा त्याच्या हातांतला हात सोडवून घ्यायचा प्रयत्न करीत होती. त्यानं डोळे चोळून सभोंवार पाहिलं. सभेंतल्या श्रोत्यांऐवजीं गच्चीवरलं फिकट चांदणं हळूंहळूं नाहींसं होत चाललं होतं. जणूं भूलोकाचं नाहींसं होत चाललेलं स्वप्नच! भूलोकाला जागं करणारी उषा त्याला इंदिरेइतकीच रमणीय वाटली. त्यानं पटकन् तिचा हात धरून आपल्या शेजारीं बसवलं आणि गालावर लाडिकपणें चापट मारून म्हणाला, 'रागाची रागिणी होईल असं मला वाटलं नव्हतं!'

'पण मी रागावलेंच नव्हतें मुळीं!'

'मग काय त्रिदंडी संन्यास–'

'इश्श!' म्हणून पदराआड तोंड लपवून इंदिरा हंसूं लागली. पण हंसतां हंसतां तिच्या डोळ्यांत अश्रु आले. मनांत उसळणाऱ्या भावनांचे ते तुषार आहेत अशी कांहींशी कल्पना विनायकाच्या मनांत येते न येते तोंच ती सांगूं लागली, 'माझं कालचं वर्तन पापाच्या खात्यांत घालावं

कीं पुण्याच्या, याविषयीं चित्रगुप्ताला सुद्धां पेंच पडला असेल! तुमच्या आईशीं खूप भांडलें मी...'

'आजपासून मोलकरणीला पुनः कामावर घ्यायचंय...'

'वाः म्हणजे तुमच्याशींहि भांडावं लागेल मग मला! मींच मोलकरीण काढून टाकली. अशा ओढघस्तीच्या दिवसांत कशाला हवयं मोलानं काम? धुण्यापाण्यानं खचून जाण्याइतका नाजूकपणा गृहिणीला शोभत नाहीं. पण तुमच्या आईच्या हें कुठून लक्षांत यायला? त्यांनीं एक वेळ सुखाचे दिवस पाहिले आहेत. गतवैभवाच्या स्मृतीचे लेप त्यांच्या अंतःकरणाचा दाह कदाचित् शांतवीत असतील. पण संसारांतलीं कर्तीं–सवरतीं माणसं घराण्याच्या मोठेपणाच्या कल्पनेवर जगणं शक्य नाहीं. तुमचा शेतीकडे लक्ष पुरवायचा विचार त्यांना कळतांच आपला मुलगा पूर्वजांची कीर्ति धुळीला मिळवीत आहे, अशी त्यांनीं कल्पना करून घेतली. काय अर्थ आहे या समजुतींत?

'आई लहानपणींच मुलाला अफू देते असं नाहीं. मोठेपणींसुद्धां बडेजावाच्या कल्पनेची उत्तेजक अफू देऊन त्याला भोंवतालच्या परिस्थितीचा विसर पाडायला लावते! अन् पहिल्या अफूपेक्षां ही दुसरी अफू अधिक घातुक असते.

'दुर्दैव असं, कृषिप्रधान समजल्या जाणाऱ्या हिंदुस्थानांत जो तो नोकरी, व्यापार यांच्याच मृगजलामागं धावत सुटलाय्. शिवऱ्यासारखा ऐन पंचवीशींतला उमदा तरुण, पण त्यानंसुद्धां शेती सोडून कुठल्याशा नाटककंपनींत पडदे ओढायची नोकरी पत्करलीय्. आणि या पराक्रमाचं कौतुक म्हणून भाबड्या सारजेनं खडीसाखर वाटली!

'मीं एक निश्चय केलाय. कीर्तनाचा अभ्यास थोडासा अधिक वाढवून जनतेंत कृषीचं तत्त्वज्ञान प्रसृत करायचं. देशसेवेचं पुण्य तर मिळेलच, पण संसारालाहि पैशाच्या रूपानं हातभार लावल्यासारखा होईल! आणखी एक निश्चय केलाय्...

पण ती तितक्यावरच थांबली. तिला यापुढें जें सांगावयाचं होतं

त्याविषयीं तिच्या मनांत लज्जा, अभिमान, खेद इ. परस्परविरोधी भावनांची गर्दी होऊन कंठ रुद्ध झाला. कांहीं वेळानें ती इतकंच म्हणाली, 'शेजाऱ्यांचीं लहान मुलं पाहिलीं, कीं जीव वेडावून जातो... वेडावलेल्या जीवाला काव्य करतां येईल, पण संसार करायला व्यवहारदुष्ट चातुर्यच हवं...संततिनियमनाच्या गोळ्या बोलावल्या आहेत. त्या येईपर्यंत कालच्याप्रमाणेंच...अन् पैसा मिळूं लागला कीं प्रथम कोणती वस्तु खरेदी करणार आहें समजलं!...एक सुंदर पाळणा!'

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# निवडुंगाचीं फुलें : : २

घटकेपूर्वी ओसाड दिसणारा पिंपळगाव स्टेशनचा धक्का आगगाडी येतांच कसा माणसांनीं फुलून गेला ! प्लॅटफॉर्म म्हणजे आंब्याचं झाड अन् आगगाडी म्हणजे वसंतऋतु, ही सरस्वतीच्या फडताळांत शिळी होऊन पडलेली उपमा वाचकांसमोर ठेवायला मी कांहीं त्यांचा शत्रु नाहीं. शिळें कधीं खाऊं नये, या तात्या पंतोजींच्या शिकवणीचा हिंदुस्थानच्या दारिद्र्याशीं मेळ बसत नसला तरी शारदेच्या घरीं रोज कढया चुलीवर चढण्याइतकी संपन्नता आहे !

सट्टेबाजीवर क्षणांत कंगाल आणि क्षणांत करोडोपति होणारा मुंबईचा बनिया, मातृपदासाठीं अधीर झालेली, पोराबाळांच्या पसाऱ्यांत रममाण झालेली व पुनः पुत्रवियोगाचं दुःख अनुभवणारी गोपिकाबाई या उपमांपेक्षां दीर्घकाल तुरुंगांत काढल्यावर पुनः सुटका होतांच स्त्रीपुरुषांच्या वेढ्यांत सांपडणाऱ्या देशभक्ताचीच उपमा आमच्या पिंपळगांवच्या प्लॅटफॉर्मला अधिक यथार्थतेनें लागू पडेल असा डब्यांत चढतांना माझ्या मनांत विचार आला. शिवाय देशभक्ताला कारागृहांत उपवास घडले तरी मुक्ततेनंतर फळफळावळ आणि मिठाईच्या देणग्या मिळतात, पिंपळगांवासारख्या लहानांतल्या लहान स्टेशनवर देखील गाडी आली म्हणजे बोरें आणि टेंभरें हे फळांचे व रेवड्या आणि साबऱ्या हे मिठाईचे प्रतिनिधि

दृष्टीला पडतातच. दोहोंच्याहि आयुष्यांत निशाणाला सारखंच महत्व आहे. हीं किरकोळ साम्यं दाखवीत बसलों तर गंभीर प्रकृतीच्या वाचकांवर अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं !

मला देशभक्ताची उपमा सुचली ती अगदीं सहजासहज नव्हे. सहा महिन्यांपूर्वी गांधींच्या संदेशावरून राजकोट संस्थानांत सत्याग्रह करून तुरुंगांत गेलेल्या दे. भ. अनिरुद्धाची या आठवड्यांत सुटका झाली असून ठिकठिकाणीं जनतेचें स्वागत स्वीकारीत तो आज आपल्या गांवीं येणार होता. त्याच्या स्वागतसभारंभासाठीं मी मुद्दाम जांबखेडला निघालों होतों. अनिरुद्ध हास्यमुखानं जनतेला अभिवादन करीत असलेलें गोड चित्र मनः-चक्षूसमोर उभं राहिलं ! 'तुमचं आडनांव क्षीरसागर आहे हें कांहीं कुणाला सांगावं लागत नाहीं' असं त्याच्या पांढऱ्या शुभ्र खादीच्या पोषाखास उद्देशून आपण म्हणत आहों असाहि क्षणभर सुखद भास झाला.

पुराणांत वर्णिलेल्या क्षीरसागराशीं स्पर्धा करणारं मन डब्याबाहेर तळपत होतं, त्याकडे पाहतांना वाटलं, समुद्र आणि क्षीरसागर उत्पन्न करायची कल्पना एकाच ईश्वराला सुचली खरी, पण त्या दोहोंत खूप अंतर ठेवण्याइतका तो चतुर होता. दुधांत मिठाचा खडा टाकायची निर्दयता मानवालाच तेवढी करतां येते ! या कल्पनेपाठोपाठ अनिरुद्धा-च्या संसाराचा, संसार कसला—संग्रामच तो ! चित्रपट दृष्टीपुढून धांवू लागला.

एका सरकारी नोकराच्या मुलीशीं अनिरुद्धाचा विवाह झाला. एका इतिहाससंशोधकानं अनिरुद्धाची पत्नी माझी दूरची बहीण पडते असा शोध लावला नसता तर विवाहाऐवजीं संन्यास घेतला अशी अशुभ टीकाच केली असती मीं !

कवींच्या नायकांना प्रतिभा, भावना अशीं नांवं मिळतात, देश-भक्तांच्या नायकांना कॉंग्रेस, शिस्त, वर्गणी अशा नांवांनीं संबोधायला कांहीं हरकत नाहीं, असा लग्नप्रसंगीं मित्रमंडळीन विनोद केला. पण चार महिन्यांनींच कॉंग्रेसपेक्षां वर्णाश्रम स्व. संघाशीं व सहा महिन्यांनन्तर वर्णा-

श्रम स्व. संघापेक्षा इंग्रजसरकारशीं अनिरुद्धाचं लग्न झालंय अशी मित्रांची खात्री झाली !

त्याच्या घरीं पाहुणे म्हणून आलेल्या देशभक्तांना प्रसन्न मुद्रेनं जेवूं घालण्याऐवजीं वरदेला त्यांनाच खाऊं कीं गिळूं असं वाटे ! एकदां परदेशी कापडाची होळी अनिरुद्धाच्या नेतृत्वाखालीं होणार होती. वरदेजवळ तिच्या माहेरचं जॉर्जेटचं पातळ होतं. किती झिरझिरीत होतं तें ! कोळ्याचं जाळं देखील काय कमी विरळ असतं ? पण शहाणे मासे कुठं सांपडतांत त्यांत? अनिरुद्धानं वरदेजवळ पातळ मागतांच तिच्या डोळ्यांत पाणी आलं ! परदेशी कापडाची होळी म्हणजे देशभक्तांची दिवाळी आहे, अशा मंगल प्रसंगीं रडूं नये असं अनिरुद्ध म्हणाला. त्या गांवच्या हस्तलिखित दैनिकाच्या सम्पादकानं लगेच, 'देशभक्तांची दिवाळी म्हणजे बायकांची संक्रांत आहे !' असं उत्तरादाखल वाक्य वरदेच्या तोंडीं घालून एक चुरचुरीत नाटिका खरडली.

ध्रुव–प्रल्हादाच्या गोष्टी सांगून मुलांना सत्याग्रहाचं सामर्थ्य पटवणाऱ्या एका देशभक्ताचं एकदां शाळेंत व्याख्यान झालं. पण वरदेनं आपल्या सात वर्षांच्या आनन्दाला कांहीं त्या दिवशीं शाळेंत जाऊं दिलं नाहीं ! पिंजऱ्यांतल्या पोपटानं स्वच्छंद उडणाऱ्या आपल्या जातभाईंचा कळप पाहून भुकेल्या नजरेनं त्याच्याकडे पहात रहावं, त्याप्रमाणं आनंद शाळेंत जाणाऱ्या सोबत्यांकडे सज्जांतून आशाळभूतपणानं पहात होता ! स्थानिक दैनिकांत या बातमीवर तर सम्पादकांनीं अग्रलेखच लिहून त्यांत द्राक्षापासून दारू होते या कल्पनेवरून काकडीच्या पोटींच हिंवतापाचा जन्म असतो या कल्पनेपर्यंत आपल्या प्रतिभेला भरारी मारूं दिली !

त्यानन्तर मिठाच्या कायदेभंगाची लाट देशभर उसळली. संथ पाण्यावर नौकाविहार करीत बसण्यापेक्षां खवळलेल्या दर्यांत उडी घेऊन पर्वतप्राय लाटांबरोबर झुंजत पैलतीर गांठण्यांतच यौवनाचा खरा सन्मान आहे असं व्याख्यानांतून सांगून अनिरुद्धानं शेकडों तरुणांना सत्याग्रहासाठीं उद्युक्त केलें.

रायबाच्या लग्नाचा सुखसोहळा टाकून कोंडाण्यावर जाणाऱ्या तानाजी-कडे करुणार्द्र दृष्टीनं पाहणाऱ्या त्याच्या पत्नीच्या डोळ्यांनीं पुन्हां घरोघर जन्म घेतला. पण वरदेच्या डोळ्यांतलं उदयभानूचं विकट हास्य गांधींच्या राजकारणाला शिव्याशाप देत होतं!

जांबखेडच्या स्टेशनवर अनिरुद्धाच्या स्वागतासाठीं जमलेले हजारों स्त्रीपुरुष—छेः! अनिरुद्धाच्या पूजेसाठीं कुण्यातरी भाविकानं आणलेलीं तीं फुलंच कुतूहलपूर्व दृष्टीनं पाहात होतीं. नन्दनवनांतल्या फुलांपेक्षां सहारा वाळवंटांतली पूजा कठीणच नाहीं का? पारिजातकाचं एक म्हणतां एक फूल देखील नव्हतं त्या फुलांत!

स्टेशनच्या भागांत प्लेगनं उग्र स्वरूपच धारण केल्यामुळें जांबखेडच्या स्त्रिया अन् मुलं त्या ठिकाणीं आलीं नव्हतीं. पण वरदेनंहि तेथें येऊं नये याचं नवल वाटलं मला. चटकन् सोनचांफ्याच्या फुलाची मला आठवण झाली. त्यागाच्या दृष्टीनं सोनचांफ्याचं फूल हिणकसच नाहीं का? धरित्री मातेच्या पूजनासाठीं सोनचांफ्याचं पान न् पान गळून पडतं, पण फूल मात्र फांदीच्या टोंकावर झोके घेण्यांत चूर असतं!

अनिरुद्धाच्या गाडीला अजून बराच अवकाश असल्यामुळं मीं त्याच्या घरीं जाऊन यायचं ठरवलं.

जातां जातां मनांत विचार आले, मन म्हणजे एक विचित्र लहरी मूल आहे म्हणतात तें खोटं नाहीं! कसल्या तरी बऱ्यावाईट विचारांचे दगड जमा करायचे अन् चौफेर उधळल्यावर त्यांतला एखाद्याला लागला कीं आनंद मानायचा हाच त्याचा स्वभावधर्म!

आपण वरदेबद्दल नसत्या शंकाकुशंकांचे डोलारे उभारीत आहोंत खरं म्हटलं तर! त्याचा काय नेम? आनंदच्या जन्मापासूनच वरदेच्या मागें पोटदुखीची व्यथा जडली होती. कदाचित् याही कारणानं—

पण शरीरापेक्षां मनच माणसाचा खरा शत्रु आहे! सोप्यांत आराम-खुर्चीवर वरदा पुस्तक वाचीत बसली आहे, असं स्टेशनवर जाणाऱ्या एका जांबखेडकराकडून कळतांच, गांधींना मूर्ख ठरवणाऱ्या लेखकांची

पुस्तकं वाचायचं हल्लीं वरदेला विलक्षण वेड लागलंय, असं अनिरुद्ध एकदां म्हणाला होता, त्याची आठवण झाली.

मला पाहतांच वरदेनं पुस्तक बाजूला केलं आणि ' आले कां ते ? ' असा अधीरपणें प्रश्न केला. स्त्री ही उपजत नटी असते यांत शंका नाहीं. ' थोडा अवकाश आहे अजून गाडीला. तूं गेली नाहींस ताई ? ' प्लॅटफॉर्मवर लोक जमलेले पाहून मीं म्हटलं, ' पूजेची तयारी झाली पण फुलाचाच पत्ता नाहीं ! '

वरदा एकदम हंसतांच दातांच्या पांढऱ्या शुभ्र कुंदकळ्या उघड्या पडल्या. पांढऱ्या शुभ्र पट्टीखालींच खोल जखमा लपलेल्या असतात ना पण ?

' निवडुंगाच्या फुलांनीं कुणी पूजा करतात कां देवाची ? ' हा प्रश्न विचारतांना मध्यरात्रीचं गांभीर्य तिच्या चेहेऱ्यावर पसरलं होतं !

तिचीं जीवनरहस्यं तारकांसारखींच मनोरम असतील का ? कीं उल्कांसारखीं—

वरदा सांगूं लागली,

' दादा, संसाराला भवसागर म्हटलंय पण आम्ही दोघं दोन तीरांवरच उभे आहोंत. दोघांतल समुद्राचं अंतर कधींच नाहींसं व्हायचं नाहीं ! मला अनिरुद्धांचे डोळेच जिंकतां आले, हृदय नव्हे ! त्यांचा देशसेवेचा विशिष्ट मार्ग मला न पटून मीं कधीं कधीं प्रतिकार करावा; पण रस्ता अडवणाऱ्या निवडुंगाच्या फुलांकडे कुणाचं लक्ष जात नाही, कांट्यांचंच सर्वांना भय वाटतं !

' दादा, भूमातेचे पाश सुरीनं तुटतात, चमच्यांनीं नव्हे ! अनिरुद्धांनीं रात्रंदिवस देशभक्तांचे तांडे घरीं आणावेत, शिरापुरीच्या मेजवान्या द्याव्या, दीनदुबळ्यांच्या झोपड्यांत डोकावण्याऐवजीं परिषदांच्या मंडपांतच सारं आयुष्य वेचण्यांत धन्यता मानावी, या अनिरुद्धाच्या देशभक्तीचा मला वीट येऊं लागला.

' परदेशी कापडाचे कांटे मलाहि बोचतात. पण एखाद्या दुर्दैवी-

प्राण्यानं बहीण मानून दिवाळीला ओवाळणी घातलेलं पातळ जवळ ठेवण्यांत मोठासा देशद्रोह होतो का ?

‘ आनंदला सभेला मीं धाडलं नाहीं म्हणून रागारागानं दुसरे दिवशीं त्याला परगांवच्या बोर्डिंगांत पाठवणं झालं, पण आदले दिवशींच झाडावरून पडून त्याचा पाय दुखवला होता हें सत्य कांहीं त्यांच्या दृष्टीला पडलं नाहीं !

‘ भावनेच्या भरांत कोवळे कोवळे तरुण भरल्या संसारांतून उठून डोळे मिटून तुरुंगाच्या रस्त्याला लागलेले पाहून त्यांच्या विफल त्यागाबद्दल मी बोलूं लागे तेव्हां एकाद्या देशद्रोह्याकडे पहावं त्या नजरेनं अनिरुद्ध माझ्याकडे पहात !

‘ आणि हें सारं विसरून मोकळ्या मनानं त्यांचं स्वागत करायला जायचं असं मीं ठरवलं होतं पण... ’

‘ वाचनापुढें आठवण राहिली नाहीं ना ? आवडतं पुस्तक मधाइतकंच... ’

‘ छेः ! छेः ! कसलं आवडतं आलंय ? ‘ घरगुती वैद्यक ’ हें पुस्तक आहे. रामू गवळ्याची बायको प्लेगनं लागल्याचं कळल्यावरून तिला औषध द्यायला गेलें होतें. परत येतांना माझी जीभ आंत ओढूं लागली, पायाला गोळे येऊं लागले अन् अंगाला दरदरून घाम सुटला...प्लेगच्या लक्षणांशीं माझ्या प्रकृतींतला बदल मी ताडून पहात होतें...’

पुलावरून येणाऱ्या गाडीचा धाड् धाड् खड्ड् खाड् आवाज होत होता. मला वाटलं ती म्हणत आहे, “ निवडुंगाचीं फुलं ! निवडुंगाचीं फुलं ! ”

———

# स्मशानांतला चांफा ! : : ३

जिन्यांत कुणाचीं तरी पावलें वाजलीं. ठरलेल्या वेळेशिवाय कांहीं एक कल्पना नसतां धक्क्यावर आगगाडी येतांना पाहिली म्हणजे स्टेशनमास्तरास जें आश्चर्य वाटेल, तेंच निर्मलेच्या चेहऱ्यावर प्रगट झालें होतें ! सकाळीं सहाला दूधवाल्याची व नवाला पोस्टमनची मालगाडी येऊन गेली म्हणजे सायंकाळीं कोर्टांतून पतीची पॅसेंजर आणि मित्रमैत्रिणींच्या एक्सप्रेसच यायच्या ! पण अकरा वाजतां ही कोणती गाडी...?

कसली तरी गोड कल्पना मनाला शिवली म्हणजे व्हावी तशी निर्मलेची चर्या झाली. दुधाचें फडताळ तसेंच मोकळें टाकून ती दाराकडे धांवली. एरव्हीं चोखपणाबद्दल प्रसिद्ध असणारे स्टेशनमास्तर देखील गाडींतल्या संस्थानिकाला सामोरे जातांना तिकिटाची खिडकी लावायला विसरत नसतील का ? पण निर्मला संस्थानिकाच्या 'गाडी' साठीं धांवली नव्हती खास ! कर्णकटु शिट्या फुंकीत बेगुमानपणें धांवत जाणाऱ्या गाडीऐवजीं घुंगरमाळाच्या 'रुमझुम' संगीताबरोबर संथ गतीनें चालणाऱ्या दमणीची ती अपेक्षा करीत होती. 'बाबांचींच पावलं वाजलीं असतील का ?' या शंकेबरोबर चाळिशी उलटलेली, वयाच्या मानानें अधिक गंभीर बनलेली तात्यासाहेबांची मूर्ति तिच्या मनश्चक्षूंसमोर उभी राहिली.

कमानीवरलीं निळीं फुलें पाहिलीं कीं निर्मलेला तात्यासाहेबांची आठवण होई. तिला वाटे, बाबांचें जीवनही या फुलासारखेंच नाहीं का? जाई–जुईचीं फुलें दोन दोन दिवस कशीं ताजींच राहतात अन् हीं निळीं फुलें चार घटकांतच मलूल होतात! मोगऱ्याच्या वेलीवर सदाफुलीचीं फुलें आणायचा कांहीं वनस्पतिशास्त्रज्ञ प्रयत्न करतात ना? मानवी जीवनलतेवर गुलाब आणि कोरांटीचीं फुलें फुलवायचा परमेश्वराचा नेहमीच खेळ चाललेला असतो.

जानकीबाई माहेरीं गेल्या कीं, तात्यासाहेबांना स्वतःचा संसार एका खांबावरल्या इमारतीसारखा वाटे. एक खांबी इमारत लोकांच्या कौतुकाचा विषय होऊं शकत असली, तरी जिव्हाळ्याच्या दृष्टीनें आश्रमच श्रेष्ठ नाहीं का? जानकीबाईंच्या गैरहजेरींत काणिक तिम्बणाऱ्या तात्यासाहेबांचेंहि लोकांना कौतुक वाटे. एका देशहितचिंतकानें तर तात्यासाहेबांसारखे सर्वच जमीनदार लोक काटकसर करूं लागतील तर भावी पिढ्यांचें जीवन सुखकर होईल असेंहि बोलून दाखवलें.

अशोकवनांत कमी अन्न खाणाऱ्या सीतेला आरोग्याचें महत्व माहीत होतें असें म्हणणारे कांहीं महात्मे आहेतच ना?

जानकीबाई माहेरून येत तेव्हां त्यांना कंत्राटाच्या दगदगीनें शिणलेली तात्यासाहेबांची मुद्रा अधिकच मलूल झाल्यासारखी दिसे. गहिंवरलेल्या आवाजांत त्या म्हणत, "लोकांना सावली करून द्यायची नि स्वतः उन्हातान्हांत राबायचं..."

पत्नीच्या काळ्यासावळ्या चेहऱ्याकडे पहात तात्यासाहेब म्हणत, "आतां सावली आलीय ना पण!" त्या वेळीं जानकीबाईंच्या ओठावर झर्रकन प्रकट होऊन नाहींसें होणारें हास्य पळत्या ढगाच्या सावलीसारखेंच दिसायचें!

जानकीबाईंचा सहवासच मुळीं पळत्या ढगाच्या सावलीसारखा क्षणभंगुर ठरला. होकायंत्र जवळ नसलें म्हणजे खलाशी दूरच्या ताऱ्याकडे पाहून नाव चालवतो. निर्मलेकडे पाहून तात्यासाहेब घालवीत असलेलें

आयुष्य देखील असेंच होतें. आणि लग्न होऊन निर्मला आपल्या घरीं गेली तेव्हां धुक्यांत सांपडलेल्या नावेसारखीच त्यांची स्थिति झाली.

खानावळींतलें अन्न आवडत नसूनही त्यांनीं तिचा रस्ता धरला. ‘ भातांत सुपारीचीं खांडें सांपडतात ’ या त्यांच्या तक्रारीला व्यवस्थापकांकडून ‘ तीं बाजूला काढून टाकावीं ’ हें सरळ उत्तर मिळालें. आदले दिवशींच त्यांना सांगून आलेल्या मुलीला त्यांनीं नकार दिला होता तो परत घेतला.

‘ चहानें भूक निवत नसली तरी मरते. मनाच्या भुकाही शमवण्यापेक्षां माराव्याच लागतात पुष्कळदां ’ असें तात्यासाहेबांनीं निर्मलेला एका पत्रांतून लिहिलें. दुसरी बायको दारूसारखी असते, हें एका कादंबरींत वाचलेलें वाक्य निर्मलेला त्या वेळीं आठवलें. उपभोगाच्या परिसीमेच्या दृष्टीनें कादंबरीकारानें तसें म्हटलें होतें, निर्मलेला निराळ्याच अर्थानें ती उपमा यथार्थ वाटली. मजूर दारू घेतो ती चैनीसाठीं नव्हे, दुःखांची विस्मृति व्हावी म्हणून !...संसारातल्या दुःखाबरोबर बाबा आपणालाही विसरतील का ?

तात्यासाहेबांच्या पत्राचा आकार जसजसा लहान होऊं लागला, तसतशी तिची शंका वाढूं लागली.

दिवाळीला बाबा न्यायला आले म्हणजे त्यांच्यावर खूप रागवायचं असें तिनें शंभरदां तरी मनाशीं घोकलें असेल. पण दिवाळीच्या आदले दिवशींच तिच्या हातीं पडलेल्या तात्यासाहेबांच्या पत्रांत, पोष्टाच्या नव्या इमारतीच्या कंत्राटांत किती फायदा झाला, नवपत्नीबरोबर केलेली मुंबईची सफर कशी यशस्वी झाली आणि हल्लीं रेडिओचे कार्यक्रम किती गचाळ असतात याबद्दलच लिहिलें होतें. त्या पत्रानें निर्मलेची माहेरीं जायची आशा मारून टाकली. पण आशेलाही पुनर्जन्म असतो. जिन्यांत कुणाचींहि पावलें वाजलीं कीं तिची आशा जागी होऊन विचारी, ‘ बाबा आले असतील का ? ’

किती उतावीळीनें तिनें दार उघडलें ! ‘ हिमालय ’ मासिकाच्या

सम्पादिका चन्द्रिकाबाई चिंचुके वर येत होत्या. चन्द्रिकाबाई म्हणजे जगावें कीं मरावें या हॅम्लेटच्या प्रश्नाचें मूर्तिमंत उत्तर आहे असें निर्मला कधीं कधीं मैत्रिणींत म्हणे. ठेंगूपणा म्हणजे अर्धे मरणच नाहीं का ? पण उच्च ध्येयाला धरण्याची त्यांची ती आकांक्षा...' हिमालय ' कचेरींतल्या कामगार मण्डळानें त्यांना दिलेल्या मानपत्रांतला शेवटचा उताराच देतों. " हिमालयाचें जू (!) पाठीवर घेऊन ज्या साहित्यचन्द्रिकेनें महाराष्ट्राच्या आकाशांत वाङ्मयाचा नगारा घुमवला आणि सव्वा रुपयांत घरोघर पोस्टानें अंक पोचाविण्याची व्यवस्था केली, त्या देवतेपुढें मानपत्राचा कापूर जाळण्याची इच्छा कां बरें होणार नाहीं ? "

चंद्रिकाबाईच्या आग्रहावरून त्यांना एक जुनी कविता द्यायचें निर्मलेनें आश्वासन देऊन ठेवलें होतें. त्याप्रमाणें त्या कविता घेऊन गेल्या. निर्मलेपुढें भूतकाळ उभा राहिला. मागचें वर्षी आईच्या दहनविधीसाठीं आपण स्मशानांत गेलों होतों; चितांच्या ज्वालांनीं धुरकटलेलीं करपलेलीं तीं लहान मोठीं निंबाचीं झाडें आणि दगड ! किती शून्य, विचित्र वातावरण होतं ! पण एक सोनचांफ्याचं झाड मात्र फुलांनीं बहरून गेलं होतं अगदीं ! आईच्या मृत्यूचं दुःख कांहींसं विसरल्यावर आपण त्या प्रसंगावर ' स्मशानांतला चांफा ' नांवाची कविता लिहून तींत म्हटलं होतं, समाजांतहि हाच प्रकार चालू नाहीं का ? गरीब, अस्पृश्य, पतिता यांचीं हृदयं एकीकडे होरपळत असतां सावकार, उच्चवर्णीय, पोथीनिष्ठ यांचे विलास चालूंच असतात...

रंगभूमीवर एकदम देखावा बदलावा तसं निर्मलेच्या मनांतल्या विचारांचें झालें ! ' बाबांचा आजचा संसार देखील स्मशानांतल्या चांफ्यासारखाच नाहीं का ? आईच्या समाधीवर अश्रुफुलें वहायचीं तीं...'

त्यानंतर चारपांच दिवसांनींच तात्यासाहेब आले. त्यांना दूषणं देणाऱ्या मनाचा आतां निर्मलेला राग आला. ' माणूस विकारवश झालं कीं व्यवहारही विसरतं. बाबांच्या मागं कामाचा किती व्याप असतो खरं म्हटलं तर ! ' असा तिनं विवेक केला.

मुंबईला निर्मलेसाठीं खरेदी केलेलीं नव्या तऱ्हेचीं खादीचीं पातळं, तिच्या आवडीच्या लेखकांच्या कादंबऱ्या आणि इतर जिनसा दिवाळीची भेट म्हणून तात्यासाहेबांनीं तिला दिल्या.

निर्मलेच्या दिवाळींत भाग घ्यायचा तात्यासाहेबांचा जुनाच परिपाठ होता. लहानपणीं ते तिच्याबरोबर फुलबाज्या उडवायचे, किल्ला बांधूं लागायचे...

किल्ला बांधण्याच्या हौसेचं बीज मनुष्याच्या रहस्यप्रिय मनांतच उगवत नाहीं का ? निर्मलेला बरोबर नेण्या न नेण्याबद्दल तात्यासाहेबांनीं दोन दिवस कांहींच कळूं दिलें नाहीं. पण मनाच्या किल्ल्यालाही भुयार असतेंच. तात्यासाहेबांच्या डायरींतलें शेवटचें लिखित तिनें वाचलें. " उत्तम पेरूंचा बाजारभर शोध केला, पण व्यर्थ. लेकीच्या भेटीपुढें कसली होतेय इकडली आठवण, असा टोमणा खात्रीनं मारणार ती...निर्मला बरोबर येते म्हणाली तर, तुला खेड्यांत कशाला करमतंय आतां, असं हंसत हंसत म्हणावं का ? "

निर्मलेनें डायरी मिटली. तात्यासाहेबांचें वळणदार अक्षर तिच्या डोळ्यांपुढें तरळत होतें. चांफ्याचाही गंध काय वाईट असतो ? पण तो स्मशानांत दरवळूं लागला तर ? निर्मलेला ठराविक उपमा आठवली.

तात्यासाहेबांनीं स्वतःसाठीं बसचें एक तिकिट काढून आणलेलें निर्मलेनें पाहिलें. तिकिटाचा फिकट गुलाबी रंग ! जणुं प्राणी एकटाच यायचा व जायचा हें रुक्ष तत्वज्ञान सांगणारा संन्यासीच ! पण इहलोकींचा प्रवास सोबतीनं करण्यांतच मौज नाहीं का ? बाबांनीं पृथ्वीवरल्या प्रवासांतच आपली संगत सोडली का !...

टेबलावरच्या भेटीच्या वस्तू पहायचा तिला वीट आला. तिनें खिडकी-बाहेर पाहिलें. रोजचेंच ठराविक दृश्य दिसत होतें. प्रखर तपश्चर्येनंतर मेनकेशीं प्रणयचेष्टा करणाऱ्या विश्वामित्राप्रमाणें मावळता सूर्य, अप्सरांच्या नृत्याला माना डोलावणाऱ्या राजाप्रमाणें वृक्षांचे शेंडे व उद्यानांत बागडणाऱ्या राजकन्यांप्रमाणें भुरभुरणाऱ्या चिमण्या...किती अविचल निसर्गाचं

जीवन ! मानवी आयुष्य मात्र क्षणाक्षणाला बदलतं !

तात्यासाहेब बॅग भरीत होते. मुंबईत पहावयाच्या राहून गेलेल्या गोष्टींची यादी सांगतांना ते म्हणाले, 'मेणाची हलती चित्रंहि पाहणं झालं नाहीं. पुनः केव्हां तरी पाहूं असं मीं तेव्हां मनाशीं म्हटलं होतं, पण मुंबईला न जातांच आज तें पहायला सांपडलं !' निर्मलेच्या दृष्टींत प्रश्नार्थक भाव उमटले. तात्यासाहेबांनीं बॅग बंद केली, तिच्याजवळ जाऊन तिचा हात आपल्या हातीं घेतला आणि म्हणाले, "निमा, सकाळपासून मुळींच बोलली नाहींस कीं तूं माझ्याशीं. तू रागावली आहेस, होय ना ? खरं सांगू निमा—" किंचित् अडखळून, घसा साफ करून ते म्हणाले, "निमा, तुझ्या आईबरोबरच तुझं माहेर संपलं. देवळाला किंमत असते ती त्यांतल्या मूर्तीमुळं ! कळसामुळं नव्हे !

"तुझ्या आईच्या पहिल्या हास्याची सुखद स्मृति पुरती नाहींशी होण्यापूर्वीच मीं दुसरं लग्न केलं, हिऱ्याची सर गारगोटीला येत नाहीं हें कळतं माणसाला, पण गार लागणाऱ्या गारगोटीच्या पोटींच ठिणग्या असतात हें नन्तर समजतं त्याला !

"माझं स्वदेशीचं तत्त्व तुझ्या सावत्र आईला रुचलं नाही. चहा घेतला नाहीं तर डोकं दुखतं अन् खादीचीं पातळं वापरायला मी कांहीं तुरुंगांतली गुन्हेगारीण नाहीं असं तिचं बेपर्वाईचं उत्तर ऐकलं, तेव्हां काळजाला घरं पडलीं माझ्या. तुझ्या आईच्या वेळचा एक प्रसंग आठवला, तेव्हां आठ महिन्यांची असशील तूं त्या वेळीं फारतर. गांवांत जपानी कापडविक्या आला होता. तुझ्या गोऱ्या रंगाला खुलून दिसणारं त्याच्या जवळचं कापड घ्यावंस वाटलं तिला. तिनं हळूच दबकत मला विचारलं, तेव्हां अशा चमत्कारिक मुद्रेनं तिच्याकडे पाहिलं मीं ! 'चुकलें' एवढाच शब्द तिनं उच्चारला. पुनः ती चूक जन्मभर झाली नाहीं बिचारीच्या हातून. मोठमोठ्या देशभक्तांनाही आदर्श वाटणाऱ्या त्या माउलीचं छायाचित्र मीं बैठकींत लावलं. पण त्यामुळं आपणाला एक प्रकारची भीति वाटते, अशी तुझ्या सावत्र आईची रोज तक्रार असते.

“ आपली अंगणांतली ती फुलबाग, तिच्यांत तूं लावलेलीं फुलझाडं... कुठं आहेत आतां ? ‘ झाडाला पैसे लागत नाहींत कांहीं. बागेच्या जागेवर इमारत बांधली तर भाडेकरू तरी येऊन रहातील ’ असा तिनं सल्ला दिला. एके दिवशीं परगांवाहून येऊन पाहातों तों सारीं झाडं सुकलेलीं. निमा, माझं जीवन म्हणजे...”

इतक्यांत दाराशीं मोटार आल्याचा इषारा कानावर आला. ते आपल्या जीवनाला कशाची उपमा देणार होते तें निर्मलेला समजलें नाहीं. पण त्यांना निरोप देऊन जिना चढतांना ती म्हणाली, ‘ चाफ्यासारख्या ठिसूळ अन्तःकरणाच्या बाबांबद्दल किती मनाशीं विपरीत ग्रह झाला होता आपला ! चांफ्याला कांटे नसतात हेंच खरं !

पत्नीच्या स्मृतिसमाधीवर फुलें वाहणाऱ्या तात्यासाहेबांना स्मशानांतल्या रसहीन चांफ्याचीच उपमा देणें तिला योग्य वाटलें.

———

# निर्माल्याची शेज ! : : ४

पांच मिनिटांत माझं जेवण सरत आलेलं पाहून आईला नवल वाटलं !

' चार घासांनीं उपाशीं रहा, ' ' जेवण हें औषध आहे ' हीं तत्त्वं आईला माहित नसतील असं नाहीं. पण माया ही शास्त्रापेक्षां वडीलच नाहीं का ? तिला शास्त्र खुळंच वाटायचं !

आईच्या हातचं जेवण जेवतांना, पाणी अमुक शेर प्यावं अन् दाढा मागं पुढं होऊं देऊं नयेत हे आहारशास्त्रांतले नियम माझ्या तरी कुठं लक्षांत रहात होते ? अण्णा किर्लोस्करांच्या काळांत उजेडतां उजेडतां भरत-वाक्य होत असे. तस्सं होतं माझं जेवण ! पण आजचं जेवण दीडपानी नाटकासारखं झालं तें पोस्टमनन दारांत पत्र टाकलेलं पाहून.

कुणाचं असेल तें ? बी. ई. च्या परीक्षेंत मिळविलेल्या यशाबद्दल एकहि मित्र अभिनंदनपर पत्र पाठवायला विसरला नव्हता. मोगऱ्याच्या आळ्यांत हात धुतां धुतां उडत्या फुलपांखरांकडे पाहून वाटल, वहिनींना किती गंमत वाटायची या चिमुकल्या प्राण्यांची ! हो, त्यांचंच असावं पत्र...

मनांतला अंदाज खराच ठरला. बाळाच्या तोंडावरलं पांघरुण काढतांना किती उतावीळ होते आई ? आपल्या माणसांचीं पाकिटं फोडतांना अशीच होते माझी मनःस्थिति. त्यांतून वहिनींचं सहा महिन्यांनीं आलेलं

पत्र; बोरीपेक्षां आंब्याच्याच धन्याला पहिला बहर पाहून अधिक आनंद कां होतो हें अशा वेळींच कळतं! आंब्यांतल्या माधुरीपेक्षां झाड फार दिवसांनीं बहरलं याच आनंदानं तो वेडावत नाहीं का?

सहा महिन्यांपासून वहिनींच्या पत्राची किती उत्सुकतेनं वाट पहात होतों? मित्रांचीं इतकीं पत्रं येत, पण तीं सारीं चांदण्यासारखीं दूरवर लुकलुकणारीं. खराखुरा प्रकाश जवळच्या निरंजनांतल्या फुलवातीकडूनच मिळायचा. नागपूरला कॉलेजमध्यें असतांना दर आठ दिवसांनीं येणारं वहिनींचं उपदेशपर पत्र निरंजनांतल्या फुलवातीसारखं रम्य आणि उपयुक्त वाटे मला. 'विद्यार्थ्यांनीं चैनीसाठीं शिकायचं नसतं. स्वतःची संस्कृति अन् धर्म टिकवण्याची आकांक्षा, ज्ञानप्रसाराची तळमळ आणि स्वार्थ-त्यागाची तयारी हे गुण त्याच्या ठिकाणीं निर्माण झाले नाहींत तर त्याच्या शिक्षणाचा कांहींहि उपयोग नाहीं,' अशा आशयाचीं त्यांचीं पत्रं वसति-गृहाच्या गच्चीवर बसून वाचतांना त्यांची गौर, मध्यम बांध्याची, हंसरी मूर्ति डोळ्यांपुढें उभी राही. त्यांच्या ध्येयवादी, बुद्धिमान् अन् मानी स्वभावाची साक्ष पटवणारे ते डोळे—"स्त्रियश्चरित्रं—" म्हणणारा दृष्टीनं अधू असावा अशी कल्पना मनांत येई तेव्हां! स्त्रियांच्या डोळ्यांतच त्यांचं चारित्र साठवलेलं नसतं का? बाळपणांतली धरसोड वृत्ति, तारुण्यांतली भोगलालसा, प्रौढ दशेंतली मातृपदाची भूक त्यांच्या डोळ्यांतच प्रति-बिम्बित होते ना?

दादा रुग्णशय्येवर असतांना हातांतले बिलवर मोडून माझ्या शिक्षणा-साठीं पैसे पाठवणाऱ्या, शेजारच्या दोन वर्षांच्या मुलाची आई मरण पावल्यावर त्याला अहोरात्र कडेखांद्यावर वागवणाऱ्या, घरोघर जाऊन परदेशी कापड वापरूं नका म्हणून डोळ्यांत पाणी आणून सांगणाऱ्या वहिनी सहा महिने पत्र न पाठवण्याइतक्या निष्ठुर कशा झाल्या?

पण त्यांच्या पत्राची अपेक्षा करणारं माझं मनच वेडं नव्हतं कां? निरंजनांतली ज्योत वाऱ्यानं दचकते अन् स्नेह मिळालं कीं प्रज्वलित होते. पण वहिनी निरंजनांतली ज्योत कुठं राहिल्या होत्या आतां?

दादांचा त्याच दुखण्यांत अंत झाल्यावर त्या इंदूरसारख्या दूर ठिकाणीं शिक्षकिणीची नोकरी करायला शरीरानं गेल्या असल्या तरी मनानं चांदणी इतक्या दूर गेल्या होत्या! तिथं प्रपंचांतल्या सुखदुःखाचा वारा त्यांना लागणं शक्य नव्हता.

पण पुनः वाटे क्रिकेटच्या खेळासारखं आहे संसाराचं. एका पक्षांतला म्होरका बाद झाला म्हणून कांहीं सर्वांनीं अर्ध्यांच डावांतून उठून जायला नको. आणि वहिनींना हें ठाऊक नव्हतं असं नाहीं. 'कुंकू पुसलं तरी गोंदण कायम असतं कपाळावर! कर्तव्यंहि अखेरपर्यंत चिकटलेलीं असतात माणसाच्या कपाळीं,' असं त्यांनीं निराश झालेल्या एका विधवा मैत्रिणीला लिहिलेलं मला आठवत होतं! 'उपदेश अन् आचरण यांत अंतर नसतं तर जगांतली ब्रॉंझ धातु केव्हांच नष्ट झाली असती!' या माझ्या एका विनोदी मित्राच्या टीकेचं नुसतं कौतुकच वाटे मला. हिरवळ उगवते तिथं ओलावा असल्याशिवाय कसा राहील?

वहिनींना विरक्तीपेक्षां रागच आला असावा बहुधा. आईचं सोवळं अति कडक, वहिनींच्या हातून सोवळ्याच्या बाबतींत एवढीशी चूक झाली तरी आईला तें खपत नसे. येरव्हीं मायाळू असणारी आई त्यांच्यावर तुटून पडे. तेव्हां रेशमांतच वीज असते हें अनेक अर्थांनीं खरं वाटे मला! त्या वेळीं दादा वहिनींची कड घेऊन आईला बोलत. आईच्या डोळयांत अश्रु पाहून दादा बाहेर गेले म्हणजे मी तटस्थतेचं धोरण मोडून तिच्या बाजूला येऊन मिळे. त्या वेळीं पृथ्वीसारख्या शांत दिसणाऱ्या वहिनींच्या मनांत ज्वालामुखी कढत नसतील कशावरून?

पाकीट फोडून पत्र वाचूं लागलों—

'मधुकरराव यांस—

'मी कुंकू पुसलं नाहीं हें आपणांस कुणाकडून तरी कळलं असेलच. मला आतां फुलपांखरासारखं जीवित कंठायचं आहे अन् म्हणूनच—'

माझ्या हातचं पत्र गळून पडलं. चीनमध्यें प्रवाहाची दिशा बदलणारी नदी आहे. मनुष्याचा जीवितप्रवाह असाच स्वैर आहे का?

कुठंतरी वेडी कोकिळा ऐन उन्हाच्या वेळीं साद घालीत होती. कोसळून पडलेल्या वृक्षाला नवी पालवी येत होती, आणि ओसाड हवेलीच्या भग्न कांचा चमकत होत्या !

वहिनींनी वापरलेल्या गुलाबी नोटपेपरकडे दृष्टि गेल्यावर त्यांच्या सौंदर्यपिपासू वृत्तीची आठवण झाली; पण पायांत काटा मोडला कीं निसर्गाचे गोडवे गातां येत नाहींत. वहिनींच्या सौंदर्यासक्तीचं—निर्माल्याच्या शेजेचं—मलाहि कौतुक करतां आलं नाहीं.

दादांच्या छायाचित्राकडे माझी नजर गेली. स्वातंत्र्याच्या ध्येयानं अखेरपर्यंत तळमळणारा तो जीवात्मा ! लहानपणीं सभेहून उशीरां येऊन बाबांच्या भीतीनं उपाशीं पोटीं निजावं, देशभक्तांच्या सुटकेसाठीं भोळ्या भावानं देवाला नवस करावा, खाऊचा पैसा देशकार्यासाठीं जमवल्या जाणाऱ्या फंडासाठीं द्यावा. दादांनीं सोळाव्या वर्षी केलेली संभाजीची भूमिका, अठराव्या वर्षी जालीयनवाला बागेतल्या अमानुष प्रकारानं चिडून जाऊन भर चौकांत कडक शब्दांत केलेला इंग्रजांचा निषेध आणि आवाज अनुकूल नसूनहि हृदयापर्यंत जाऊन भिडेल अशा एकताननेतें म्हटलेलं 'वन्देमातरम्' हें गीत, याबद्दल बोलतांना त्यांच्या मित्रांचं अंतःकरण भरून येतं. टिळक वारले त्या दिवशीं दादांच्या डोळ्यांत आलेले अश्रु पाहून त्यांचे शिक्षक म्हणाले होते,—'रक्ताचा एक थेंब बनायला कांहीं दिवस लागत असतात, पण मातृभूमीविषयींचे अश्रु अनेक जन्मांनंतरच सांटत असतात.'

पण बाळपणीं बांधलेलीं घरं अन् केलेले विचार पुढें कौतुकासाठींच शिल्लक राहातात नुसते. तुम्ही कार्य करा म्हणजे आम्हां तरुणांना तुमच्या मागं येतां येतं असं हंसत हंसत बापूजींना म्हणणारे दादा लग्न झाल्यावर त्यांच्या जंगल सत्याग्रहांत कांहीं सामील होऊं शकले नाहींत. त्या वेळीं ते आपल्या एका मित्राला म्हणाले, 'माझ्या प्रपंचाची लाज वाटतेय मला डॉक्टर, शिवबा, जतींद्र, सावरकर यांचेच खरे संसार. मायापाश तोडणं मोठं कठीण वाटतं !' त्या वेळीं दादांच्या डोळ्यांत जी असहा-

यता दिसत असे ..तीच त्यांच्या या छायाचित्रांत व्यक्त झाली होती.

दादा इतके उपभोगपरायण होते का ? छेः ! छेः ! बापूजींच्या सत्याग्रहाच्या होमकुण्डांत स्वार्थाची आहुति द्यायचा अगदीं निश्चय केला होता त्यांनीं. पण त्या दिवशीं कसल्याशा कारणावरून आईनं धारण केलेला तो जमदग्नीचा अवतार, वहिनींच्या डोळ्यांतून उतरणाऱ्या अश्रुधारा अन् त्यांनीं दादांजवळ म्हटलेलें 'मीहि तुमच्याबरोबर येतें,' हे करुणस्वरांतले शब्द...

दादांना अवघडल्यासारखं झालं. स्त्रियांनीं राजकारणांत पडूं नये असं त्यांना वाटत असावं. पत्नीला सोडून आपण सत्याग्रहांत गेलों तर आईच्या जाचानं हिनं भलतंच—

या कल्पनेनं त्यांच्या अंगावर शहारे आले. सैनिकांना गंभीर घोषानं रणांगणांवर बोलावणाऱ्या दुंदुभीकडे सारं लक्ष लागलं असूनहि संसाराच्या टिमकीनंच त्यांना मोह घातला !

खालीं पडलेलं पत्र उचलून वाचावयास सुरुवात केली.

'—अन् म्हणूनच कपाळावर कुंकू कायम ठेवलं मीं. 'फुलपांखरासारखं' लिहिलेलं पाहून रागावूं नका एकदम. मी फुलपांखरासारखं म्हणतें तें निराळ्या अर्थानं. 'त्यांनीं' मला फुलाची उपमा द्यावी. पण मला ती कांहीं आवडूं नये. मी त्यांना म्हणे, या जगांत निष्क्रिय फुलांसारखं नुसतं सुन्दर म्हणवून घेणं मला पसंत नाहीं. तुम्ही गरुडाप्रमाणं आकाशापर्यंत भरारी घेत असाल—तर मी फुलपांखरासारखी तुमच्या मागं मागं उडत राहीन.

'त्यांच्याबरोबर सत्याग्रहांत जायला तयार झालें, तेव्हां त्यांना वाटलं, मी घरांतल्या जाचाला कंटाळलें. मला दिवस गेल्याची गोड शंका त्यांच्या मनांत वावरत नसती तर त्यांनीं बरोबर घेतलंहि असतं. पण माझ्या सुखासाठीं तेच घरीं राहिले. दुर्दैवानं त्यांची मधुर शंका विफल ठरली, पण मला वाईट वाटलं तें त्यांना आपल्यामुळं सत्याग्रहांत जातां आलं नाहीं या गोष्टीचंच ! त्यागाचा अमृतकुंभ देऊन मातृभूमीचं स्वातंत्र्य

परत मिळविण्याची महत्वाकांक्षा बाळगणारा गरुड जागच्या जागींच फडफड करून शांत झाला. त्यांचं देशसेवेचं व्रत मी घेतलं, ' रक्ष रक्ष ईश्वरा भारता ' म्हणणाऱ्या खादी वेषांतल्या माझ्या विद्यार्थिनी...

' पण माझी कथा सांगायच्या भरांत तुमचं अभिनंदन करायचा मुख्य उद्देश बाजूलाच राहिला कीं ! किती आनन्द झाला म्हणून सांगूं तुम्ही पास झाल्याचं कळल्यावर. माझ्यामुळं ' त्यांच्यांत ' अन् सासूबाईंत अखेरपर्यंत अन्तर पडलं तसं तुमच्या बाबतींत तरी होऊं नये म्हणून मी तुम्हांला कधींच पत्र न पाठवायचा निश्चय केला होता. तुम्ही कॉलेजमध्यें असतांना मी तुम्हांला पत्र पाठवी, तेव्हां सासूबाईंना कांहीं बरं वाटू नये......'

' कुणाचं आहे रे पत्र ? ' आईच्या प्रश्नानं माझं पत्रवाचन थांबलं.

' आबा भटजीचं ! पंढरपूरला परत आलेंय् म्हणून लिहिलं यात्रा संपवून. लवकरच जाऊं आतां आपण पंढरपूरला...'

लखकन् वीज चमकावी तशी आईची चर्या झाली.

' भाव तिथं देव असतो, पण मनुष्य कांहीं नसतो मधुकर. आज सहा महिने झाले, अचलेचं पत्र नाहीं. पोरीला बरंबिरं वाटत नाहीं कीं काय कुणाला ठाऊक ? तिलाच भेटायला जाऊं म्हणते इन्दूरला—'

बोलतां बोलतां आईचे डोळे ओले झाले. म्हातारी माणसं लढाईवर कां पाठवीत नाहींत तें कळलं मला. शत्रुभाव नाहींसा झालेले म्हातारे रणांगणावर गेले तर युद्धाऐवजीं शतपावलीच करून परत येतील असा विचार मनांत येऊन तशाहि प्रसंगीं हंसूं आल्यावांचून राहिलं नाहीं.

आईच्या हृदयांत निर्माण झालेली वहिनीविषयीं सहानुभूति आज सकाळीं उजेडतां उजेडतां उगवलेल्या चन्द्रासारखी वाटली मला !

आईला पत्राचं रहस्य सांगण्यापूर्वींच राहिलेला मजकूर वाचूं लागलों, ' पुनः मात्र कधींच पाठवणार नाहीं पत्र. पण आधीं माझं कुंकू न पुसण्याचं कारण लिहितें. म्हणजे तुम्हांला फार वेळ विस्मयांत रहावं लागणार नाहीं. रोज कुंकू लावतांना डोळ्यांत पाणी येतं माझ्या, पण त्याच वेळीं 'त्यांच्या'

शब्दांची आठवण होते, 'या जगांत पोटाप्रमाणं ध्येयासाठींहि नाना सोंग घ्यावीं लागतात. या नियमाला परमेश्वरालाहि अपवाद राहतां आलं नाहीं.' पुनर्विवाह संस्थांचे चालक, शाळेचे मॅनेजर यांचा विधवांना होणारा त्रास पाहून मला हें सौभाग्याचं सोंग करावं लागलं!—'

डोळे भरून आल्यामुळं पुढचा मजकूर मला दिसेनासा झाला.

पु. ग्रं. सं. ठाणे, ...... शाखा,
दा. क्र. ९५२० नों. दि ..........
वि. ......


# काट्यांची किंमत : : ५

मध्येंच भंगलेलं कसलं तरी गोड स्वप्न पुन्हां पडावं म्हणून बळेंच डोळे मिटले मीं. पण कोणतीच सुंदर वस्तु मनुष्याला सांधतां येत नाहीं. जीवन, स्वप्न, प्रीति...

स्वप्नाची स्तुति ऐकून आयुर्वेदविशारद जागरण, अनियमित रुधिराभिसरण आणि मरण अशी स्वप्नवंशावळीच माझ्यापुढें टाकून गप्प बसवायचा प्रयत्न करतील. वास्तववादी ओरडतील, 'अहो, स्वप्नाला जीवनाच्या शेजारीं बसवून सहभोजनाच्या सुधारणेचं श्रेय पदरांत पाडून घेतलं खरं, पण शेजारीं बसून जेवणारे भोजनभाऊहि एकमेकांच्या पाठीमागें हात धुऊन लागतातच ना! जीवन आणि स्वप्न यांचंहि कधीं पटायचं नाहीं! जमीनअस्मानाचं अंतर आहे दोघांत!'

पण डोंगरावरले आवळे अन् समुद्रांतलें मीठ यांत कितीहि अंतर असलं तरी दोहोंची चटणी करणाऱ्या गृहिणीलाच व्यवहार मानपत्र देतो ना? डोंगरावरल्या आवळ्यांचंच कशाला? पेपरावरले आवळे अन् माणसाची बुद्धिमता यांचीहि अशीच फारकत केली आहे आपण! पण जग हें शून्य आहे हें अनेक वर्षांच्या अध्ययनानं तत्वज्ञांना सुचणारं सुंदर तत्त्वज्ञान विद्यार्थ्याला पेपरावरला आवळा पाहूनच उमगतं ना? जमीनअस्मानाला सांधणारं गुलाबी क्षितिज काय किंवा जीवनस्वप्नाच्या सीमेवर

तरळणारी मधुर गुंगी काय, मला तरी परस्परांनीं स्नेहभावानं केलेलीं हस्तांदोलनंच वाटतात तीं !

तसं म्हटलं तर माझं जीवन स्वप्नापेक्षांही रम्य नव्हतं कां? मग त्या स्वप्नाबद्दल वाटणाऱ्या ओढ्याचं मूळ...

जाऊं द्या. झाडाचं मूळ शोधायच्या खटपटींत पानं मात्र सुकून जायचीं !

झोप पार उडाल्यामुळं खिडकीपाशीं जाऊन उभी राहिलें. पिंजलेल्या पांढऱ्या ढगाआड चांदण्या चमचम करीत होत्या. पांढऱ्या लिफाफ्यांतून दिसणारीं प्रेमळ मैत्रिणींच्या पत्रांतलीं जणूं अक्षरंच आहेत तीं असा क्षणभर सुखद भास झाला. त्या कल्पनेपाठोपाठ तारकांच्या जागीं कांतेचीं पत्रं दिसूं लागलीं. धावत्या गाडीचा वेग एकदम कमी झाला म्हणजे माणसाला चमत्कारिक धक्का बसतो ना ! कांतेच्या पत्रांबद्दल विचार करतांना माझ्या मनाचीहि तशीच अवस्था झाली. आकाशांत गुरुशुक्रांबरोबर धुमकेतूहि कधीं कधीं उगवतो कीं ! कांतेचं आजचं पत्र......

झिमझिम पावसांत बागडणारीं मुलं वीज कडाडली कीं घराचा आश्रय घेऊन भीतीपेक्षां अनुभवलेल्या मौजेबद्दल बोलतात. कांतेचीं जुनीं पत्रं वाचून पहायचा मला मोह झाला तो याच न्यायानं !

सुधीरांचीं झोपमोड होणार नाहीं इतक्या सावधगिरीनं त्यांच्या पलंगाखालची ट्रंक ओढून त्यांतलीं कांतेचीं पत्रं बाहेर काढलीं अन् एकेक वाचूं लागलें.

'कमल, आमचं लग्न म्हणजे साऱ्या गांवाला कोडंच होऊन बसलं आहे एक ! एका आय्. सी. एस. ला नकार देऊन भिकारगांवीं दवाखाना स्थापून प्रॅक्टीस करणाऱ्या डॉ. निनादशीं मीं कां लग्न केलं याचं उत्तर अजून कुणालाच सांपडलं नाहीं. एक मानसशास्त्रज्ञ म्हणाले, 'माणूस कायद्यानं अठराव्या वर्षानंतर शहाणा होत असला तरी मानसशास्त्राच्या दृष्टीनं तेव्हांपासूनच तो वेडा होतो, आतां या कांताबाईचंच पहाना, त्यांनीं डॉक्टराशीं लग्न केलं पण कदाचित् खूनहि केला असता त्यांचा !'

एका कवीनं सुनीत रचून त्यांत म्हटलं, ' आय्. सी. एस्. म्हणजे आग अन् एम्. बी. बी. एस म्हणजे फुपाटा ! हे मुली, आगीपेक्षां फुपाट्याला तूं माळ घातलीस हें ठीक झालं ! परमेश्वर तुला पुढील जन्मीं तरी कवि-रूपीं कैलास दाखवो ! '

पत्र नं. २ '...प्रीतीला विषाचा प्याला म्हणणारा मोठा चतुर असावा कुणीतरी ! पृथ्वीवर अमृत आहेच कुठं मुळीं ? विषाचंच अमृत करून माणसानं जगायला हवं. दवाखान्यांत अर्धी औषधं तरी विषारी असतात, नाहीं ?... निनादांना संस्थानांत मोठ्या पगाराची नोकरी सांगून आली होती. पण तिची सावली टाकून ते गरीबीच्या उन्हांत उभे राहिले. वृक्षांप्रमाणं कर्तव्यहि सावलींत जगत नाहीं असं ते म्हणत. कमल, गरीबी हें विष असेल, पण त्याहि परिस्थितींत समाजसेवा करायची महत्वाकांक्षा त्याचं अमृत करते !

' दारूंत विष कालवून ती पिणाऱ्या सुधाकराबद्दल प्रेक्षक जितके हळहळतात तितके निनादांच्या प्रीतीचा स्वीकार करतांना माझे आप्त हळहळले. त्या बिचाऱ्यांना आमच्या प्रीतींत लपलेलं अमृत कुठून दिसणार ?'

तिसऱ्या पत्रांत प्रीति हा योगाचाच एक प्रकार असावा अशी कल्पना मांडली होती. चवथ्यांत, निनाद आपणासाठीं कसे वेडे झाले आहेत याचं गमतीदार वर्णन करतांना लिहिलं होतं, ' पांडुतात्यांना का बंडुनानांना बुद्धिबळाचं व्यसन जडल्यावर त्यांनीं कचेरींतहि पेपरवेट म्हणून उंट न्यावा तसं फ्लॉवरपॉट म्हणून मला नेत जा, असं एकदां मी त्यांना म्हणालें सुद्धां !'

पुष्पमालेंत दहाप्रकारचीं फुलं असलीं तरी सर्वांतून एकच सूक्ष्म धागा जावा त्याप्रमाणं कांतेच्या प्रत्येक पत्रांतून प्रेमाचं स्पष्टअस्पष्ट वर्णन आढळून येई.

प्रेमाचा रस्ता धोपट नसतो म्हणतात. माझ्या अन् कांतेच्या संसारांत तर डांबरी सडका—त्या वचनालाच चांगलं डांबर फासलं अशीं वात्रट कल्पना मनांत येऊन हंसूंहि येई ! पण हंसण्यारडण्याच्या वादीसंवादी-

शिवाय जीवनसंगीताला पूर्णताच नाहीं जणूं !

आज आलेल्या कांतेच्या पत्रांत तिनं निनादशीं घटस्फोट–घटस्फोट कसला ? संसाराची राख करणारा बॉंबचा स्फोटच तो !–केल्याचा उल्लेख होता.

रोमच्या जळत्या राजवाड्यांतून लोकांना बांसरीचे सूर ऐकूं आले. कांतेच्या उधळलेल्या संसाराबद्दल विचार करतांना मला स्वतःच्या संसाराचं गोड चित्र दिसूं लागलं !

सुधीरावरोबर मी रजिस्टर मॅरेज केलं. रजिस्टर मॅरेजचाच प्रकार कां उचलला असं मैत्रिणींनीं विचारलं कीं ' लोक पत्र कां रजिस्टर करतात ? ' असा त्यांनाच उलट प्रश्न टाकी. रजिस्टर पत्रांतून महत्वाचा मजकूर जातो. मला रजिस्टर लग्नांतून भविष्यकाळाला असाच महत्त्वाचा संदेश द्यायचा होता. पतिपत्नींच्या हृदयांत परस्परांबद्दल वास करणाऱ्या भलत्याच समजुती, कवींनीं वर्णिलेलें अव्यवहारी प्रेम, मानवी मनाला एकापेक्षां अधिक व्यक्तींच्या प्रणयपूर्ण सहवासाची असलेली भूक, इत्यादि वैवाहिक जीवनांतल्या नाजुक प्रश्नांवर संसाराच्या परीक्षेंत टीपा लिहायच्या होत्या.

सुधीर शकुंतला काळे बरोबर केव्हां केव्हां फिरायला जात. मी परागबरोबर तासन्‌तास कॅरम खेळत बसे ! पण परीस लोखंडाला सोनं करतो; आकर्षून घेत नाहीं कांहीं !

वेडी कांता ! निनाद हाताखालच्या नर्सचं गाणं ऐकतांना डोलूं लागले कीं तिला धरणीकंप होत असल्याचा भास होई ! मास्तरीण बाईच्या बॅडमिंटनच्या खेळांतलं चापल्य निनादांना हर्षित करी. पण कांतेला विजेची आठवण करून देई.

तिनं आजच्या पत्रांत लिहिलं होतं,'...निनादांशीं मीं घटस्फोट केला एवढंच आज लिहिते. सविस्तर खुलासा प्रत्यक्ष भेटींत होईलच.

' परवांच मी एक हॉलकेनची अतिसुंदर कादंबरी वाचली. अन् तिच्याबद्दलच आजच्या पत्रांत मी मुख्यतः लिहिणार आहें...' कांतेनं

नेहमींप्रमाणं आपल्या आवडत्या कादंबरीकाराच्या नव्या कादंबरीचं रस-भरित वर्णन करून पत्र संपवलं होतं.

घड्याळानं साडेतीन वाजल्याचा इषारा दिला. 'तस्यां जागर्ति संयमी' या वचनांत भगवंतांनीं प्रेमवेड्यांचा उल्लेख केला नाहीं असा पोक्त विचार करून अंथरुणावर जाऊन पडणार तोंच पत्राच्या मागच्या बाजूकडे लक्ष गेलं. कांता ताजा कलम कधींच लिहित नसल्यामुळं तिच्या पहिल्या सही-पाशींच पत्र पुरं झालं असावंसं समजून मीं दुसरी बाजू उलटली नव्हती.

ताजा कलम असा होता,...' तुझ्या भेटीला यायचं आश्वासन दिलं खरं, पण सध्यां नकोच. मैत्रिणीशीं काडीमोड करायची नवी कल्पना रूढ करायचा विचार नाहीं माझा ! बाकी तुझ्या माझ्या भेटीच्या संगमांत शुष्कवादाचे भोंवरेच अधिक निर्माण होणार आहेत. अन् धारेपेक्षांहि भोंवरे वाईट, नाहीं ? कांहीं सनातनी संपादकांच्या मुलाखतीच्या धारेंनून मला पोहून जायचं आहे...कमल, एकदां निनाद म्हणाले होते जगप्रसिद्ध नेपोलियन बोनापार्टच्या थडग्याशेजारींच कोयनेलचा शोध लावणाऱ्या डॉक्टरचं थडगं आहे. त्या डॉक्टरप्रमाणं निनादांचंहि नांव फारसं पुढें ऐकूं येणार नाहीं. पण नवऱ्याशीं, जगाशीं भांडणारी बाई म्हणून वर्त-मानपत्रांतून फोटो येतील माझे !

ऐहिक ऐश्वर्याच्या भुकेनं तडफडणारा नेपोलियन काय किंवा पोटाची खळगी भरण्यासाठीं परिस्थितीशीं झगडणारी मी काय ? दोघंहि दरिद्रीच ! अनाथांच्या दुव्यांचीं हिरेमाणकं जवळ बाळगणारे निनादच खरे कुबेर आहेत ! वेडे, अलकेचा त्याग करायला मी खुळी का होते ? निनादांचं नुसतं पोट दुखायला लागलं तरी माझ्या डोळ्यांच्या कडा ओल्या होत असत. पण दुसऱ्याच क्षणीं तें नर्सच्या हातानं शांत होतांना पाहून अश्रूंनीं माझी उशी भिजून जाई.

' बाळपणीं आग्यामोहळाचा विलक्षण राग येई मला. पण त्यांच्या काट्यांची किंमत आतां कळून चुकली. मधमाशांना काटे असतात. पण ते आपल्याच जीवांना चावण्याकरितां नव्हे. भलताच कुणी मध लुटूं लागला

कीं त्याला टोचायला काटे हवेतच जवळ. निनादशीं लघळपणाचं वर्तन करणाऱ्या मास्तरीणबाई, नर्स, प्रेमा गोडबोले यांचा मत्सर वाटून उघड उघड द्वेष करूं लागलें. निनादांनाहि उण्याअधिक शब्दांनीं दुखवलं. पण बहकलेल्या पतीपासून दूर जाण्यापेक्षां त्यावर नियंत्रण ठेवण्यांतच पत्नीचं कर्तव्य आहे हें माझं आवडतं तत्त्व माझ्या बाबतींतच डळमळूं लागलं ! निनाद तासन् तास घरींच राहूं लागले. पेशंटवर चिडूं लागले. एक बाई अपस्मारानं तडफडणाऱ्या मुलाला घेऊन घरीं आली. पण यांनीं तिला तसंच परत पाठवून फोनो लावला !!!

'एकाच दगडांत दोन पक्षी मारण्यांत कौशल्य असलं तरी पापहि असतं हें मला कळतं कमल. पण तें पुण्यासाठीं केलं तर ?

'मी घटस्फोट केल्यानं निनादांच्या हृदयाची कुचंबणा अन् माझ्या प्रीतीच्या चिंध्या व्हायच्या थांबल्या. आतां निनाद मनापासून पाहिल्याप्रमाणं दवाखान्यांत जातील, गोरगरीबांना जीवदान देतील या कल्पनेनं मला सुखाची झोंप लागते !

मध्येंच भंगलेल्या ज्या गोड स्वप्नाच्या पुनः प्रत्ययासाठीं माझं मन धडपडत होतं तें, पत्र वाचून संपवतांच स्पष्ट दिसूं लागलं !—

'सुधीर एका लताकुंजाखालीं कुण्यातरी तरुणीबरोबर हंसत बोलत होते. त्यांच्या दृष्टीला मी पडतांच ते लगबगीनं माझ्याकडे धांवत आले. मी त्यांना घट्ट धरून ठेवलं अन् त्यांच्या खांद्यावर मान टेकवली......'

स्वप्न संपलं ! कुठून तरी रातराणीचा सुगंध आला. आमच्या खोलीं-तली फुलदाणी मात्र कागदी फुलांनीं नटलेली पाहून मन व्यथित झालं !

# खारा आड : : ६

दे. भ. मोरोपन्तांना घरीं जातांना राहून राहून सभेंतल्या गोंधळाचं हंसू येत होतं. अध्यक्ष म्हणून समारोपाचं भाषण करायला ते उभे राहिल्यावर सभेच्या तेरड्याला गुलाबाची कळा आली अन् तो गुलाब सैल अंबाड्यांतला नसून आबालवृद्धांनाहि प्रिय वाटावा असा अगदीं देव्हाऱ्यांतला होता—ही गोष्ट निराळी.

एक च्यवनप्राश्यावलेह बाटलीच्या आकाराचे गृहस्थ धडपडत टेबलापाशीं येऊन म्हणाले, ‘ गांधींचं सूत हिंदुस्थानचा प्राण जातांना त्याच्या नाकाशीं लावायला मात्र उपयोगी पडेल ! ’

‘ अन् केसरीच्या अंकानं त्याला वारा घालतां येईल ! ’ तितक्याच आवेशानं एक गांधिस्ट प्रत्युत्तरले, ‘ खबरदार प्लीज ! गांधींची नालस्ती हाच आमचा मृत्यु ! ’

‘ अन् त्यांची शेळी हेंच आमचं जीवन ! ’ त्या आवाजाची नक्कल करीत कुणीतरी बसूनच ‘ प्रवचन ’ केलें.

सभेंत शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून मोरोपन्तांनीं टेबलावरली घंटा वाजवली ! पण नारोशंकराच्या घंटेलाहि न जुमानण्याइतका आवेश एकेका वक्त्याच्या अंगांत संचारला होता !

गांधीवादी बोलतच होता, ‘ आम्ही मेलों ऊर्फ तुम्हीं गांधींची नालस्ती

केली तर भूत होऊं, समंध होऊं, पिशाच्च......'

अगदीं हेच शब्द पन्तांना पुनः पुनः आठवून हंसूं येत होतं! 'गांधीं-वर टीका कराल तर आम्ही तुमचा मुडदा पाडूं—निःशस्त्र अन् सविनय मुडदा पाडूं.' असेहि प्रलाप काढायला गांधींभक्तानं कमी केलं नव्हतं!

मोरोपन्तांना वाटलं, 'कुठं टिळक, गांधीसारख्या लोकोत्तर विभूति अन् कुठं त्यांच्या नांवाखालीं लढणारे क्षुद्र पक्ष......पक्ष कसले? भर सभेंत माणुसकीला नागवूं पाहणारे दुर्योधन, दुःशासनच हे! साऱ्या गांवाला पितृस्थानीं असणारे आपण मात्र धृतराष्ट्राप्रमाणं आंधळे नसून कर्मयोगाची शिकवण देणारे समाजसेवक...'

त्या कल्पनेचा सुगन्ध पन्तांच्या मनांत कांहीं वेळ दरवळत राहिला. आत्मस्तुतीच्या निषेधाचा ठराव पास करणाऱ्या रामदास स्वामींच्या मनाला देखील मराठेशाहीचा स्वातंत्र्यसूर्य तळपतांना पाहून शिवबाच्या डोक्यावर प्रथम वरदहस्त ठेवला त्या दिवसाची आठवण होऊन गुद-गुल्या झाल्याशिवाय राहिल्या असतील का?

फ्रेम करून भिंतीवर टांगावीं इतकीं सुन्दर वाक्यें आज तूं बोलून गेलास, असा पन्तांच्या मनांत मंजुळ गुंजारव झाला. 'राजकारण म्हणजे नाट्य आहे, फार्स नाहीं' 'आंधळा पक्षाभिमान म्हणजे पक्षवायुच' 'राजकारणांत भावना आली कीं क्षयहि आलाच,' हीं वाक्यें गोंडस बालकाप्रमाणं त्यांच्या मनाभोंवतीं खेळत होतीं!

आत्मचिंतनानं मनाला येणाऱ्या एक प्रकारच्या कैफांत म्हणा किंवा पत्नीच्या हातचा गोड सुधारस चाखायची इच्छा अनावर झाल्यामुळं म्हणा पंत झपाझप पावलं उचलूं लागले. भर्रकन् पांखरांचा एक थवा घरट्याकडे गेलेला त्यांनीं पाहिला.

'याहि बेट्यांचा लग्नस्मृतिदिन आहे वाटतं आज!' पन्त मनाशींच म्हणाले. आज आपला लग्नदिन आहे याची त्यांना आतांपर्यंत आठवण सुद्धां नव्हती.

बंगल्याच्या आवारांत शिरतांच घमकन् आलेला मोगऱ्याचा सुगन्ध,

पडद्याआड जाणाऱ्या नर्तिकेप्रमाणं हळूंहळूं काळोखांत अदृश्य होत चाललेल्या गुलाबाच्या कळ्या आणि मालतीबाईंच्या मंजुळ कण्ठांतून येणाऱ्या स्वरमाला यांपैकीं अधिक मोहिनी कशांत आहे हें त्यांना खात्रीपूर्वक सांगतां आलं नसतं !

गोड भावगीत, बहुधा मधुघटच, ऐकायला सांपडेल या आशेनं ते पायऱ्याशींच थबकले, पण त्यांना ऐकूं आलं तें गीत ' रुद्रास आवाहन ' या गीताच्या तोंडावळ्यावर होतं.

' मारूं अथवा मरूं आमुची मायभूमि जगवूं...'

पन्त सर्दच झाले. 'विळीवरून तरवारीवर' या मथळ्याखालीं आपल्या बायकोचं स्फूर्तिदायक चरित्र कुठल्यातरी मासिकांत प्रसिद्ध होणार अशी त्यांना आशा वाटूं लागली. दुसऱ्याच क्षणीं ते विषण्ण चित्तानं विचार करूं लागले, ' स्वातंत्र्याच्या मार्गाविषयीं किती विचित्र कल्पना असतात या कवींच्या! एकमेकांचे जीव घ्यायचे, रक्ताच्या नद्या व्हायच्या, इशी !–'

मधली एक पायरी सोडून ते चटकन् दुसरीवर चढले. जणूं मधल्या पायरीच्या रूपानें ती भयंकर कल्पनाच टाळली त्यांनीं !

मालतीबाईबरोबर एक लिफाफाहि त्यांची वाट पहात होता. अवघ्या दोनच ओळी होत्या त्यांत. पण जणूं नागिणीच्या दोन जिव्हाच आपल्या दृष्टीस पडल्या आहेत अशा कल्पनेनं त्यांचं अंग थरारलं !

चिठ्ठीचे तुकडे तुकडे केल्यावर त्यांनीं पायावर दोन तांब्े घेतले, गांधींच्या फोटोजवळ उदबत्ती लावली आणि भक्तिपूर्वक वंदन करून स्वयंपाक घरांत प्रवेश केला.

मालतीबाई रांगोळींत गुलाल भरीत होत्या. पंतांना पाहून त्या म्हणाल्या, ' खादी अन् पगडी एका ठिकाणीं आली तर हिंदुस्थानचं राजकारणहि असंच......'

पण पंत त्या वेळीं श्रोत्याच्या भूमिकेवर कुठून असायला ? दुष्यंत, मज्नू, रोमिओ इ. मंडळींनीं त्यांच्या हृदयांत गर्दी करून सोडली होती. मालतीबाईचे दोन्ही हात चटकन् आपल्या हातीं घेऊन ते म्हणाले,

‘ भविष्यकालाइतकाच वर्तमानहि सुन्दर असतो कीं पण ! तुझ्या रांगोळीचं प्रतीक...’

त्यांच्या टिचकीसरशीं मालतीबाईंच्या गोऱ्यापान गालावर उठलेली लाली पुरती विरण्यापूर्वीच त्या ‘ इश्श ’ म्हणून दूर झाल्या, अन् हंसत म्हणाल्या, ‘ कुणी आडून पाहिलं तर या तीन रंगी झेंड्यांत हिरवा रंगच अधिक आहे, अशी तुमच्यावर टीका करील कीं !’

‘ अन् त्या झेंड्याची काठी देखील चांगली मजबूत आहे हें देखील प्रत्ययाला आल्याशिवाय रहायचं नाहीं मग बच्चंजीच्या ! हाः! हाः ! हाः !’

सात मजली हास्याच्या गच्चीवरून पंतांना जग अगदीं लहान दिसूं लागलं, ‘ प्रत्येकाचं जीवनवस्त्र मर्यादित आशा--आकांक्षाभोंवतीं गुरफटलं जाण्यापेक्षां असं उन्हावाऱ्यांत, उंच फडफडूं लागलं तर...’

‘ चिन्तोपन्त चीफसाहेबांकडून लिफाफा आलाय, बघितलांत ना ? काय आहे ? ’

‘ खाऱ्या आडांत काय असणार ? मोती राहोतच, मीठ सुद्धां मिळा-यची मारामार ! पकडवॉरंटाचा खेकडा...’

‘ अगबाई ! ’

‘ तसं नाहीं कांहीं ! जेवण झाल्याबरोबर स्वारीनं तावडतोब भेटीला बोलावलंय. पोलीसखात्याचं कारलं ! स्नेहाच्या तुपांत तळलं अन् दयेच्या साखरेंत घोळलं तरी कडू तें कडूच रहायचं ! किती उर्मटपणानें लिहिलंय, ‘ आज ठीक नऊ वाजतां ऑफिसांत हजर व्हावें. सक्त जरूरी आहे. ’

जेवतांना त्यांनीं लहानपणीं चिन्तूला परीक्षेंत कोणतीशी कविता अड-ल्यावर फ्रीशिप बुडायच्या भीतीनें त्याच्या डोळ्यांत अश्रु कसे आले होते, आपल्या मनांत त्या वेळीं नीतिअनीतीच्या भूतांपेक्षां अनुकंपेच्या पांख-रांचा किलबिलाट होऊन आपण एका कागदावर त्या कवितेचा अर्थ अन् दुसऱ्या दोन प्रश्नांचीं उत्तरं लिहून तो कुणाला नकळत त्याच्याकडे कसा फेकला आणि परीक्षेंत त्याचा नंबर वर कसा आला हें सविस्तर वर्णन करून सांगितल्यावर म्हणाले,

'पण मडकं उंच गेलं कीं, ताडीनं मात्र भरतं, हें त्यालाच उद्देशून एकदां आमचे शिक्षक म्हणाले होते तें खरंच ठरलं. पास झाल्याच्या दिवशींच त्यानं सिनेमा पाहिला, सिगारेटस् ओढल्या, तमाशाला सुद्धां आश्रय दिला. त्या दिवशीं त्याच्या तोंडाचा धुरकट वास येतांच तिरस्कारानं तोंड वळवून मला टाळतां आला, पण आज त्याची चिठ्ठी फाडूनहि तिच्यांतला दर्प असह्य होत आहे!"

'आत्तां कळलं सारं कांहीं!'

'काय कळलं?' असं विचारण्याऐवजीं गुप्त पोलिसाच्या चातुर्यावर अजून नाटक कसं कुणी लिहित नाहीं असाच पंतांना प्रश्न पडावा, इतका मालतीबाईनीं सुरेख अभिनय केला!

"काल राममंदिरांत चिंतामणरावांची आई आली होती. एक नूर म्हातारी अन् दसनूर शेंदरी असं म्हटलं तर वाया जायचं नाहीं कांहीं! जितका पगार मुलाला त्याच्या दुप्पट ठिगळं तिच्या लुगड्याला असं एकंदरींत व्यस्त गणित होतं तें!"

"बुवांनीं परशुरामाचं आख्यान लावलं होतं. रेणुकेवर परशुरामानं तरवार उगारल्याचं वर्णन चाललं असतां श्रोते गहिंवरून आले. बायका मंडळींत तर काय? त्यांचे डोळे म्हणजे चालू महिन्याची कॅलेंडरंच वाटूं लागलीं. मीं यशोदाबाईकडे पाहिलें. अकोल्याचा रखरखीत उन्हाळाच दिसला तिथं! पण लगेच त्याचा उलगडाहि झाला.

"बिचारीला दोन वर्षांत चिंतामणरावांनीं एकदांहि 'आई' अशी हांक मारली नव्हती! 'दिसणाऱ्यापेक्षां अशा न दिसणाऱ्या तरवारीच मातृहृदयाला अधिक जखमी करतात.' असं म्हणतांना मात्र त्यांचे डोळे भरून आले होते."

× × × ×

पंत स्वतःच्या बंगल्याबाहेर पडले, त्या वेळीं सृष्टीला सिनेमाथिएटरची कळा येऊन थोड्याच अवकाशांत आकाशाच्या पडद्यावर पावसाचा चित्रपट सुरूं होणार असा रंग दिसत होता. विजेच्या पंख्याशिवायच

तुफान वारें सुटलें होतें. बालिश वृत्तीचे वृक्ष चित्रपट लवकर सुरू व्हावा म्हणून टाळ्या पिटून शीळहि घालीत होते तर गंभीरवृत्तीच्या टेकड्या आणि इमारती स्तब्धपणें वाट पहात होत्या.

पंतांच्या अंतःकरणांत मात्र चांदणं टिपूर पडलं होतं. त्यांना वाटलं, 'त्या चांदण्यांत आपण अन् मालू लग्नदिनानिमित्त प्रीतीच्या गोष्टी करीत बसलों आहोंत. खट्याळ मनाचा चिंतू विश्वामित्राच्या रूपानं आपणावर सत्तेचा धोंडा टाकण्यासाठीं टपून बसला आहे, पण आतां थोड्याच वेळांत, आपल्या हृदयांतली त्याचं चारित्र्य सुधारण्याची तळमळ त्याच्या दृष्टीस पडेल, अन्...'

धोंड्याचीं फुलं झाल्याचं स्वप्न अनुभवीतच पंत चिंतामणरावांच्या घरीं जाऊन पोंहोचले.

पण फुलांऐवजीं आणखी एक लिफाफाच त्यांच्या हातीं पडला.

कुठल्याशा खेडेगांवीं चिंतामणराव तांतडीनं निघून गेल्याचं त्यांच्या पत्नीकडून पंतांना कळलं,

घरीं जाऊन पंत वाचूं लागले.

"प्रिय सुहृद्–तुझ्या गांवीं बदली होऊन आठ दिवस झाले, पण एक दिवस कांहीं तुझ्याशीं निवांतपणें बोलायला फुरसत मिळत नाहीं. एकच गुन्हा घडलेल्या रामकाळांत पोलिस खुशाल वशिष्ठाचं पुराण ऐकत बसले असतील नाहीं? पण आज मी लगबगीनं दुसऱ्या गांवीं निघून जात आहे तें एखाद्या गुन्ह्याचा तपास लावण्यासाठीं नव्हे––त्याची पूजा करण्यासाठीं!

"खाऱ्या आडांतल्या पाण्याला वाळ्याचा वास कुठून लागला?" असा तुला प्रश्न पडला असेल. खरंच. शाळेंतल्या एका बालकवीनं मला खाऱ्या आडाची उपमा दिली होती, ती किती सार्थ आहे? त्यावेळीं मला हॉटेलांतली खारी बुंदी फार आवडायची म्हणून ती उपमा दिली असेल. पण आज किती निराळ्या अर्थानं मनाला पटते!

"मोरू, पाळण्यांत मुलांचे पाय दिसत असतील, डोकं नाहीं! पाणी ज्या भांड्यांत ठेवावं त्याचा आकार त्याला मिळाल्यासारखा दिसतो

खरा, पण तेथून देखील तें वाफेच्या रूपानं निरनिराळे आकार धारण करूं पाहतं! जीवनाचं तरी असंच नाहीं कां? उनाड मुलांच्या संगतीचा पुढें लवकरच मला वीट आला. दुसऱ्याचं दळण करून आईनं जमवलेल्या आठ आण्यांत मी एकदां सिनेमा पाहून आलों! त्या दिवशीं गवळ्यानं दूध द्यायच नाकारल्यामुळं आईला दशमी करतां आली नाहीं. उपाशीं पोटीं निजलेल्या तिच्या मूर्तीवर मी रात्रभर अश्रूंचा अभिषेक केला. निवळलेला माझा जीवनप्रवाह पहायला पुढें तूं राहिला नाहींस. मीं भराभर परीक्षा दिल्या, बक्षिसं मिळविलीं—

"विकास! विकास! याच समाधानासाठीं वी उलतं, ज्योत जळते अन् स्त्री ओकाऱ्या देते!

"शाळेच्या जगांतून बाहेर पडतांच कांहींतरी अलौकिक कार्य करून दाखवावं असा मनानं ध्यास घेतला, लहानमोठ्या प्रत्येक चळवळीच्या यादींत मीं आपलं नांव दाखल करावं अन् तें आईच्या अश्रूंनीं पुसलं जावं असाच क्रम घडूं लागला. माझ्या एका पेन्शनर मामांनीं आपलं वजन खर्च करून ही नोकरी लावून दिली. पण जीवनाच्या वाक्याला पुरता अर्थ येण्यापूर्वीच चुकून पडलेल्या पूर्णविरामासारखी वाटू लागली ती मला!

'नोकरीच्या खळग्यांत पडलेलं माझं जीवन हळूं हळू खारं बनूं लागलं. पाणपोईत शिरून तहानेल्या वाटसराला आराम द्यायचं भाग्य त्याला आतां कुठून मिळायला? एकवेळ दारिद्र्यानं गांजलेल्या अन् माझ्याकडून दुखवल्या गेलेल्या आईच्या मनाविरुद्ध कांहींहि करायचं नाहीं हा एकच निश्चय मीं बाळगला आहे.

'बाकी मनाची कशी गंमत आहे बघ. आई समोर नसली म्हणजे तिच्या फोटोला वंदन करतों मी, पण एरव्ही मोकळ्या मनानं कांहीं 'आई' म्हणून हांक मारावीशी वाटत नाहीं!

'आईनें माझ्या लहानपणीं वापरलेली शेंदरी अजूनहि जपून ठेवली आहे. गरीबींत प्रामाणिकपणानं कंठलेल्या आयुष्याची साक्ष अजूनहि कधीं कधीं नेसण्यांत तिला समाधान वाटतं!

‘ माणसाच्या विचित्र स्वभावाचा हा दुसरा नमुना !

‘ अशाच सुखदुःखाच्या गोष्टी तुझ्याजवळ बोलाव्या म्हणून घरीं बोलावलं होतं. पण तुला तो लिफाफा मिळाला असेल नसेल तोंच एक निनांवीं पत्र हातीं पडलं, ‘ उंबरगांवीं वसंत कुलकर्णी नांवाचा तरुण इसम क्रांतिकारकांच्या कटांत सामील आहे, सावध असावें, ’ असा त्यांत इषारा होता.

‘ मोरू, क्रांति म्हणजे वीज ! जग चंद्राला सोडून विजेला दशा वहात बसत नाहीं, हें खरं आहे; पण धरणीमाता हिरव्यागार धनधान्यानं नट-वायची असेल तर आधीं विजेचा कडकडाटच नको कां होऊं द्यायला ? आज टिळकजयंती ना ? अशा पुण्य दिवशीं कुलकर्णीसारख्या महा-भागाचं दर्शन घडावं म्हणून उंबरगांवीं जात आहे. पत्रांतलं अक्षर मात्र तुझ्या अक्षरासारखंच होतं, हा चमत्कार नाहीं का ? पण चमत्कार तरी कसला ? तुम्ही गांधीभक्त आपला विशिष्ट पंथ जगवण्यासाठीं स्वातंत्र्याला देखील तिलांजालि द्यायला मागंपुढं पाहणार नाहीं. !

‘ राग येऊं देऊं नको अं ! सहज थट्टा केली तुझी. जगांत चेहऱ्या-सारखे चेहरे असतात, अक्षरांची कुठं कथा आली !——चिंतू ’

‘ ता. क. अरे खरंच ! तुला मुद्दाम हुकुमी शब्दांत यायला कां लिहिलं होतं कळलं कां ? येरव्हीं माझ्याकडे यायला तुला अनमान वाटेल अन् मग तुझ्या आवडीची शेंगदाण्याची खिचडी चुकेल, म्हणून आपली गंमत करून पाहिली. बाकी, टिळकजयंतीचा उपवास तुला कुठून असणार म्हणा !

× × × ×

पंतांनीं पत्राची घडी करतांना खिडकीबाहेर दृष्टि टाकली.

निसर्गांतला पावसाचा चित्रपट संपून तारकांचे दिवे लुकलुकत होते. दूर कुठं तरी एक ढग गडगडला. खेळ संपल्यावर, बाहेर पडतांना प्रेक्ष-कांत होणारी धांदलच जणूं ! पण पंतांना वाटलं, जगाची तहान शमव-ण्याच्या बुद्धीनं तळमळणाऱ्या समुद्राचं हृदयच बोललं तें !

आतां आपल्या मनांत वादळ सुरू होणार अशी त्यांची खात्री झाली.

# श्रावणांतल्या विजा : : ७

‘ प्रेम तूं दावी न दावी, तें तुझ्या स्वाधीनचें ऽऽ ’

निशा या गजलेच्या—छे ! सौंदर्योपासनेच्या प्रसंगीं शोभण्यासारखं स्तोत्रच तें—सुरावटींतून आपला गोड गळा अन् लांबसडक, मऊ केसांतून पांढरा कंगवा सारख्याच सफाईनं फिरवीत होती.

मध्येंच खिडकीबाहेर लक्ष गेल्यावर तिला वाटलं, आरशापेक्षां निसर्गांतच आपलं प्रतिबिंब अधिक खुलून उठलंय !

ढगाळलेल्या आभाळांत चमकन् वीज चमकून जाई. काळाभोर विपुल केशसंभार विंचरतांना निशेची सोन्याची बांगडीहि तशीच चमके.

अंबाड्यांत सदाफुलीचं फूल खोवतांना सूर्याची धूसर, मलूल आकृति पाहून तिच्या मनांत विचार आला, मेघमालेला देखील चांगलं फूल मिळालं नाहीं म्हणायचं आज ! नाहीं तर, तारकेची जुई, चंद्राचा बटमोगरा किंवा उषेची गुलाबी कळी यांपैकीं कशानं तरी तिच्या शृंगाराचं पूजन व्हायचं !

सज्जांतल्या पामच्या पानावर टपकन् पावसाचे दोन थेंब पडले. तिच्याहि डोळ्यांतून अश्रु ठिबकायचा रंग दिसत होता.

गड-गड-गड !

जणूं आकाश म्हणालं, ‘ मेघमालेच्या रूपानं पृथ्वीवरलं शाकुंतलच

स्वर्गांत आलं ! शृंगार–करुणाचा किती मनोहर समन्वय !'

स्वतःच्या टीकाकाराच्या गर्जनाहि तिच्या हृदयांत प्रतिध्वनित झाल्याशिवाय राहिल्या नाहींत. पण पृथ्वीवरल्या टीकाकारांचीं तोंडें ! तोंडं कसलीं ? चालतीं बोलतीं दारूचीं पिंपंच तीं !

आपण सतीशवर मनोभावानं प्रेम केलं. पण मोहरलेली प्रत्येक फांदी अन् उजळलेली प्रत्येक चंद्रकला यांना जीवनसाफल्याचा साक्षात्कार कुठून घडायला ? फुलोराचा चौथा हिस्साच सुफलित होत असेल अन् चतुर्थीच्याच चंद्राला काय तें जग भक्तिपूर्वक वंदन करतं !

विरहाच्या अग्निकुंडांत जळणाऱ्या आपल्या जीवनावरून उत्तर रामचरिताची आठवण व्हावी इतकी करुणगंभीर घटना. पण जगानं 'अलल डुर्र्' पाहतांना जो थिल्लरपणा दाखवावा त्याच बालिशवृत्तीनं आपल्या प्रेमभंगाची हुर्यो उडवली !

परवां फिरायला जातांना एक पेन्शनर तिच्याकडे पाहून आपल्या सोबत्याला म्हणाले, 'हल्लीं प्रेम म्हणजे नांवाला उरलंय नुसतं, जर्मन सिल्व्हरप्रमाणं ! धड हिटलरचा पराक्रमहि नाहीं कीं चांदीची चमकहि नाहीं !'

तिची एक मैत्रीण म्हणाली, 'तुझा नुसता प्रेमभंगच झालाय तर इतकं वाईट वाटून घेतेस; माझ्या बाबतींत तर आचारी अन् वाजंत्रीवाल्यांना सुपारी दिल्यावर लग्न मोडलं !'

एक होतकरू कवि म्हणाले, 'लग्नापूर्वीचं प्रेम म्हणजे जन्मापूर्वीचं बारसं !'

'मृत्यूपूर्वीचं श्राद्ध' ही त्या वचनाची दुसरी बाजू कवीनं बोलून दाखवली नाहीं याबद्दल त्याचे आभारच मानले निशेनं !

लघुकथावाचनाच्या ध्येयावर जगणारे, कोटाच्या आंतल्या खिशांत सिनेमानटींचीं चित्रं आणि बाहेरच्या खिशांत 'Independent India'चे अंक ठेवणारे एक प्रौढ ब्रह्मचारी तिच्या फॅशनला उद्देशून म्हणाले, 'प्रणय म्हणजे फेसपावडर अन् प्रीति म्हणजे बोरिक पावडर ! जीवनाच्या

लढाईंत झालेल्या जखमा भरून निघायला बोरिक पावडर हवी !'

'अन् मुलीकडे पाहून विचकलेल्या दातांचं सौंदर्य वाढायला माकड-छाप टुथपावडर हवी ' हें उत्तर निशेच्या अगदीं जिभेवर आलं होतं.

तिला वाटे, 'मूकं करोति वाचालं' या उक्तींत परमेश्वराच्या स्तुती-पेक्षां अपमानच नाहीं कां ? वाचाळांना मुकं करण्यांतच जगाचं खरं कल्याण आहे, हें ओळखण्याइतका देव खचित चतुर आहे !

'देवच कशाला ? साऱ्या वाग्वीरांचीं तोंडं बंद करायला हीं कुलुपंच समर्थ आहेत.' असं म्हणतांना निशेनं टेबलाच्या खणांतून सतीशचीं चालू सालचीं पत्रं काढून वाचावयास सुरवात केली.

'प्रिय निशा–

'गेल्या आठवड्यांत शंकराचार्यांनीं आमच्या कॉलेजला भेट दिली. विद्यार्थ्यांना उपदेश करतांना ते म्हणाले, 'विद्यार्थी मित्रहो, तुमचं कॉलेज हा एक औदुंबर वृक्ष आहे. तुम्ही त्यांतले बालदत्त आहांत. दत्तानं चोवीस गुरु केले. त्याप्रमाणं तुम्हीं दिवसांच्या चोवीस तासांना गुरू करून अध्ययन...' वगैरे वगैरे.

'आणखी चारच दिवसांनीं कॉलेजच्या उंबराला फूल लागणार होतं, ही बिचाऱ्या शंकराचार्यांना कल्पनाहि नव्हती ! इंदु बल्लाळ ही पहिलीच मुलगी आमच्या वर्गांत येऊन दाखल झाली. तिच्या सौंदर्यचिंतनांत तल्लीन झालेले हे बालदत्त आतां शंकराचार्यांच्या दृष्टीस पडले तर 'उंब-रांत दत्ताबरोबर किडेहि असतात,' असं कांहींसं रागानं पुटपुटून चालते होतील नाहीं ?

'निशा, शंकराचार्य कांहींहि म्हणोत. तारुण्य पारिजाताच्या वृक्षा-प्रमाणें असतं. कांहीं ठराविक क्षणींच त्याला बहर येतो, उत्कट जीवना-नंदाची अनुभूति मिळते, आयुष्याबद्दल आपुलकी वाटू लागतं ! ते क्षण-तरुणीच्या सहवासाचे !'

'कॉलेजांत इंदूचा प्रवेश होतांच गणिताचे विद्यार्थीहि कालिदास नि-भवभूतीवर व्याख्यानं झोडूं लागले ! चांदण्यांत खडकालाहि रमणीयता

येतेच कीं. अशा वेळीं मी मनांत म्हणे!

‘ इंदूच्या रूपाची चर्चा चालतांना मी मात्र विद्यार्थ्यांत मोकळेपणानं मिसळत नाहीं असा एकानं शोध लावून मल्लिनाथी केली, ‘ चहांत बिस्किट अन् कॉलेजांत वैराग्य फार वेळ टिकत नसतं म्हणावं!’

‘ चहापेक्षांहि मधुरतर अशा सुधेकडे माझे पंचप्राण लागले आहेत याची त्याला कुठून जाणीव असणार?... ’

पत्र दुसरं—

‘ निशा,–परवां वर्गात आपल्या जागेवर घाईघाईनं जातांना इंदूचा मला पाय लागला.

‘ I am sorry, क्षमा करा– ’ असं ती म्हणते आहे तोंच मी म्हटलं, ‘ त्यांत काय आहे असं क्षमा मागण्यासारखं? चुका ह्या प्रत्येका-कडून होतात. ’

‘ इंदू निघून गेल्यावर जवळचा विद्यार्थी मला चिडवून म्हणाला, ‘ अगदीं शंकरराव देवांच्या तोंडी शोभण्यासारखं भाष्य केलंस कीं रे लेका! तिचा पाय पडतांच ‘ थँक्स ’ म्हणायला हवं होतस तूं!’

‘ मनांतल्या मनांत त्याच्या काव्यदृष्टीला हंसतांना मला त्या प्रसंगाची आठवण झाली. तुला आठवतं का? एकदां असाच तुझा मला पाय लागला. पण तूं दिलगिरी व्यक्त करण्यापूर्वीच मीं म्हटलं, ‘ अहा बहरला क्षणांतच अशोक.... ’

‘ त्या वेळीं ‘ इश्श ’ म्हणून पदराआड लपलेला तुझा चेहरा अजूनहि डोळ्यांपुढें स्पष्ट आहे!’

‘ काव्य स्फुरायला देखील तसलीच स्फूर्तिदेवता समोर हवी असते नाहीं का?’

पत्र तिसरं—

‘ निशा,–कावळ्यापेक्षां पराचा क्रौंच करणाऱ्या माणसाच्या डोक्यांत अधिक काव्य असलं पाहिजे नाहीं? एकदां इंदू माझ्याशीं बोलत असतां वर्गांत प्रोफेसर आले. आम्ही बोलणं थांबवून आपापल्या जागा घेतल्या.

पण महाकाव्याच्या निर्मितीसाठीं आतुर असलेले वाल्मीकि हा प्रसंग थोडाच वाया जाऊं द्यायला ?

‘ एकीकडे प्रोफेसरांना व्याध कल्पून त्यांना शाप देतांना हे आधुनिक वाल्मीकि आमच्या (!) प्रेमावर हां हां म्हणतां रामायण रचूं लागले !

‘ कुणी ‘ रम्याणि वीक्ष्य...’ या श्लोकाच्या आधारानं माझ्या अन् इंदूच्या गेल्या जन्माच्या डायऱ्यांत प्रेमाची नोंद असली पाहिजे, त्याशिवाय इतक्या लवकर परस्परांची मैत्री जमणं शक्य नाहीं, असा निर्वाळा दिला, तर कुणी “ संस्कृत, अधिक वक्तृत्व, अधिक क्रिकेटपटुता, बरोबर एका मुलीचं प्रेम ” असं समीकरण मांडलं. एकानं तर—

‘ जाऊं दे. कोळसा कितीहि उगाळला तरी तीट लावायला कांहीं उपयोगी पडत नाहीं. खरंच, आपल्या प्रेमाच्या शोभेला कसली तीट आहे लक्षांत आलं कां ? इकडे कॉलेजांत मी येतांना पाण्यानं ओल्या होणाऱ्या तुझ्या काळ्याभोर पापण्या अन् काळवंडणारा माझा चेहरा...’

पत्र चौथं—

‘......विंटरची सुट्टी इथंच घालवायचा माझा विचार आहे. इंदूही बुलढाण्यास जाणार नाहीं. कॉलेजांत उशीरां आल्यामुळं मागं राहिलेला संस्कृतचा अभ्यास माझ्या साहाय्यानं करणार आहे ती. आम्ही दोघंहि तिकडेच आलों असतों. इंदूच्याही मनांत आपला गांव पाहण्याची फार इच्छा आहे. पण सध्यां इथं राजपालचीं व्याख्यानं चालूं आहेत. मोठा तडफदार अन् प्रभावशाली वक्ता आहे. मोठमोठ्या वक्त्यांचीं भाषणं ऐकून वक्तृत्वशैली कमवायचा माझा किती दिवसांपासूनचा मानस आहे, हें माहितच आहे तुला.

‘ मी अन् इंदू मिळून दौलत कादम्बरी वाचीत आहोंत, असा कॉलेजमधल्या सी. आय. डी. खात्याला सुगावा लागला मात्र, मित्रांनीं प्रश्नाच्या जोडगोळ्या झाडून अगदीं हैराण करून सोडलं. वैशाख कीं मार्गशीर्ष ? रजिस्टर कीं वैदिक ? हजार कीं पांचशें ? ..

‘ त्या सर्वांना मी एकच प्रश्न करी, तुमच्या अकलेला हंसूं कीं रडूं ?...’

वाचलेल्या पत्राच्या घड्या करतांना निशा मनाशीं म्हणाली, ‘ इतके स्पष्ट ठसे असलेलं आपल्या प्रेमाचं नाणं जगानं खोटं ठरवावं ? पण यांत जगाचा तरी काय दोष ? चिंध्यांचा चेंडू करून उडवायचा त्याचा स्वभावधर्मच आहे. पण ज्याला आपलं मानून प्रीतीचे पोहे दिले त्यानं ते उधळून द्यावेत अन् मनाच्या चिंध्या कराव्या–’

भिंतीवरल्या आरशांत आपलं कृश प्रतिबिंब पाहतांना सुदाम्याचं साधर्म्य लक्षांत घेऊन निशेच्या ओठावर हंसू आणि डोळ्यांत अश्रु एकदमच प्रकट झाले !

त्या ऊन पावसांतून गतकालचं सुन्दर इन्द्रधनुष्य तिच्या स्मृतिपटावर तरंगू लागलं—

सतीश एका कोटानिशीं शिकायला जायला निघाला. आपण आपली नवी छत्री विकून त्याला दुसरा कोट घेऊन दिला.

पुढें, तो आजारी असल्याचं समजल्यावर त्याच्या पत्रासाठीं रोज पोस्टांत भिजत जावं...

एके दिवशीं आपल्याच आंगांत ताप भरून आला.

मृच्छकटिकाचा शेवट भलताच होणार कीं काय असा करुण विनोद रुग्णशय्येवर पडल्या पडल्या आपल्या मनानं केला.

आणि एके दिवशीं प्रकृति बरी असल्याचं सतीशचं पत्र हातीं पडतांच आपण हृदयाशीं घट्ट धरून किती तरी वेळ त्याच्यावर आनन्दाश्रु ढाळले. त्या वेळीं आपल्या कानांत कुणीतरी गुणगुणत असल्याचा भास झाला, ‘ अंगें भिजलीं जलधारांनीं...’

सतीशचीं पत्रं टेबलाच्या खणांत टाकतांना निशेनं सहज अंबाडा चांचपला. सदाफुलीच्या फुलाचा स्पर्श होतांच तिला सकाळचे सखू मोलकरणीचे शब्द आठवले—

‘ गुलाबाचीं फुलं मिळायचीं न्हाईत बाईसाहेब आजपासून. म्हादबा काल रातचाच कुनालाबी न सांगतां न सवरतां कुनिकडं निघून गेलाय ! त्याचे दोस्त सांगत्यात कीं, त्यो कोलापुरास्नी–’ पुढें तिचा कण्ठ भरून

आल्यामुळं बोलतां आलं नाहीं.

निरनिराळ्या फुलांच्या रूपानं प्रीतीचीं नवीं नवीं स्वरूपं सखूजवळ व्यक्त करून दाखवणारा म्हादबा, एका शब्दानंहि तिला न कळवतां कोल्हापूरला गेला !

त्याच्या एका दोस्तानं कोल्हापुराहून नुकतीच एक नखरेल मुलगी पळवून आणली होती म्हणे !

त्या आठवणीपाठोपाठ बुलढाण्याहून आलेल्या सतीशच्या पत्रांतलीं तीं निष्ठुर वाक्यं तिला आठवलीं.

'प्रिय निशा,—दैवलीला मोठी चमत्कारिक असते. तुझं पाणिग्रहण करणारा कुणीतरी निराळाच भाग्यवान् प्राणी या जगांत आहे...तुला सुखी करण्याचं सामर्थ्य माझ्यांत नाहीं...मला विसरून जा...'

म्हादबा ! सतीश ! नुसती शरीरांचीं नांवं ! पुरुषांच्या आत्म्यांना एकच नांव द्यायला हवं—शायलॉक ! हृदयापेक्षां हृदयाजवळच्या मांसाचीच त्याला अधिक किंमत वाटायची !

खोलीभर शून्य दृष्टि फिरवतांना मदनलाल धिंग्राच्या फोटोकडे तिचं लक्ष गेलं. फासाच्या खुर्चीवरून तो पाशवी शक्तीला अखेरचं बाणेदारपणाचं वक्तव्य ऐकवीत आहे अशी त्यांत कल्पना होती.

त्याच पोलादी अंतःकरणानं आजच्या शेवटच्या पत्रांतून आपण आपली निर्दोष भूमिका सतीशपुढें मांडणार आहोंत अशी कांहींशी कल्पना लढवतांना निशेनं पत्रवही उघडून लिहावयास आरंभ केला—

'सतीश,—परवाच्या पत्रांत तुम्हीं मला प्रिय म्हटलं, नाहीं ? जगांत माणसाला एकच गोष्ट प्रिय असते. त्याचा तोच !

'अन् विसरून जायला सांगतां ? तुम्हांलाच काय ? पूर्वीच्या निष्क्रिय नि आशाळभूत निशेलाहि पण विसरत चालले आहें मी आतांशा'

'त्या निशेला जग म्हणजे मेजवानीचा सुंदर दिवाणखाना वाटायचा. एकानं तोंडांत घास घेतल्याशिवाय दुसऱ्यानं तोंड उष्टवायचं नसतं त्या ठिकाणीं ! पण जग ही खाणावळ आहे अशी नव्या निशेची खात्री होत

चाललीय. इथं कुणी कुणाच्या सुखासाठीं अडून बसायचं नसतं. भूक लागेल तेव्हां दाम द्यावेत नि पानावर बसावं—

तुम्हांला कॉलेजचं शिक्षण घेतलेल्या मुलीशीं लग्न करावंसं वाटतांच मला चार ओळीची ( आपल्या प्रेमाचं कलेवर वाहणारे चार पुरुषच म्हणूं का ? ) चिठ्ठी पाठवून मोकळे झालांत——

'मी फॅशन करतें म्हणून दादाला वहिनींना हार्मोनियम घेऊन द्यायला होत नाहीं...

'माझ्यासाठीं त्याच्या संसारांतला प्रकाश अंधुक व्हायला नको.

'मी स्त्री असलें तरी मलाहि सुखाची भूक आहेच. आजपर्यंत ती काव्यमय होती, आतां व्यवहारी झाली आहे, इतकाच फरक !

'बाजारांत नेहमीं मनाजोगतीं कांकणं मिळतात असं कुठं आहे ? कधीं लहान, कधीं मोठीं——जगाच्या बाजारांतहि हाच प्रकार चालायचा ! हें व्यवहारी तत्त्वज्ञानाचं नाणं बरोबर घेऊन मी आजच घरांतून—छेः स्वप्नाळू जगांतून—सत्यसृष्टींत पाऊल टाकणार आहें.

'पदवी अन् पैसा मिळवून मीहि तुमच्याप्रमाणें जगाच्या बाजारांत एक माणूस विकत घेईन, अन्...

इतक्यांत पोस्टमन् तिच्या नांवचं पत्र घेऊन आला.

बुलढाण्याहून इंदूनें लिहिलं होतं——

'प्रिय निशाताई—

'श्रावणांत भूभागाला मेघमालेपासून कसली अपेक्षा असते ? क्षणभर दिपवून टाकणाऱ्या विद्युन्नृत्याची ? छेः ! मेघमालेच्या नाटकी सौंदर्यावर मोहित होऊन धुळीच्या गुलालाची उधळपट्टी करणाऱ्या भूप्रदेशाचा मृगांतला उन्माद श्रावणांत नाहींसा होऊन थंडगार जलवृष्टीसाठीं त्याचं हृदय आसुसतं...'

'सतीशच्या डायरींतला उतारा आहे बरं का हा ! नाहींतर म्हणाल, अगदीं पहिल्याच पत्रांत ही काय म्हणून उपमाउत्प्रेक्षांच्या माऱ्याखालीं माझा जीव दडपून टाकते ?

‘ तुमचा कोंडमारा करण्यासाठीं नव्हे, तर सतीशनं तुम्हांला पाठवलेल्या त्या विक्षिप्त पत्रामुळं आधींच गुदमरून गेलेल्या तुमच्या हृदयाला मोकळी हवा मिळावी म्हणून हें पत्र लिहीत आहें.

‘ अलीकडे सतीशच्या वागणुकींत विलक्षण फरक पडत चालल्याचं स्पष्ट दिसूं लागलं. पूर्वीचा त्याचा तो खेळकरपणा, उत्साह, कोट्या करायची हौस—सार्‍या गोष्टी, लुप्तप्राय झाल्या. खरं म्हटलं तर चार दिवस सहज बुलढाण्याची हवा पाहण्यासाठीं त्याला मी इथं घेऊन आलें, पण जपानी सुंदर खेळणं मध्येंच कुठं तरी बिघडून लहान मुलांचा विरस करून टाकतं ना ? सतीशच्या वर्तनानंहि माझी तीच अवस्था केली !

‘ पहिल्या पहिल्यानं वाटलं, हे प्रेमी लोक म्हणजे मुलखाचे नाजूक. एखादे वेळीं मूनस्ट्रोक देखील व्हायचा यांच्या हृदयाला ! निशाताईचं प्रेमछत्र मजबूत आहे म्हणून बरं आहे...

‘ एकदां मीं त्याला म्हटलंच, ‘इथली हवा मानवत नाहींशी दिसतेय. कशाला मानवेल बाई ! एक माणूस आपल्या आवडत्या माणसाबरोबर दर उन्हाळ्याच्या सुट्टींत मारे आकाशांत विमानांतून घिरट्या घालीत फिरतं, पांच हजार फूट उंचीवरल्या हवेच्या मानानं आमच्या बुलढाण्याची हवा गरमच म्हणायला पाहिजे, नाहीं का ?’

‘ पण बॅटरीचा प्रकाश टाकून का कळ्या फुलवितां येतात, निशाताई ? एकदां डोळ्यांत पाणी आणून मीं त्याला विचारलं, तेव्हां स्वारीनं आपल्या डायरींतला विशिष्ट भाग मला वाचायला दिला. त्याची सुरवात वर दिलीच आहे. पुढं तो लिहितो,

‘...त्या आसूसलेल्या हृदयावर जलवृष्टि झाली नाहीं, नुसत्या विजाच तळपत राहिल्या, तर—तर जग अन्नपाण्यावांचून तडफडून मरेल !

‘ आपण अन् निशा आयुष्यभर प्रणयचेष्टाच करीत बसलों तर आपणांतलं मानव्यहि असंच नष्ट होईल.

‘राजपालच्या व्याख्यानांतलीं तीं स्फूर्तिदायक वाक्यं—‘अय नवजवानो, दुनियामें क्या आप एकहि प्रेम जानते हो ? क्या आप शिवाजी, प्रताप,

लक्ष्मीबाई आदि वीरोंके प्रेमविषय को भूलहि गये? अपने मातृभूमीके लिये जिन्होंनें आत्मबलिदान करके—' त्या दाहक व्रताचीं फुलं घेऊन स्वातंत्र्यदेवीच्या मंदिराच्या पायऱ्या चढतांना निशेचा कोमल हात आपणाला आधार देऊं शकेल का?

'अष्टौप्रहर आरशापुढून न हलणाऱ्या निशेला यज्ञकुंडांतल्या ज्वालांचं सौंदर्य आकर्षित करूं शकेल का?

'दौलत कादंबरींतल्या मधुरेचा करुणरम्य जीवनवृत्तान्त टाळून कमलच्या सुखासीन जीवनाचेच गोडवे गाणाऱ्या निशेला जीवन हें हवन आहे हें ऐकतांना किती कष्ट होतील? कोटापेक्षांहि मला हृदयाचं रक्षण करणाऱ्या वस्त्राची अधिक गरज आहे असं म्हटलं तर नाटकांतलं भाषण दिसतयं एखाद्या, असं म्हणून हंसत सुटेल ती एकसारखी!...

'आपणापेक्षां म्हादबांचीच देशाविषयींची तळमळ अधिक दिव्य म्हणावी लागेल मग! एकदम सारे मायापाश तोडून आपण कोल्हापूरच्या किसानांच्या सत्याग्रहांत भाग घेणार असं एकदां तो म्हणाला होता.

'बस्, आपणहि एकट्यानंच जीवनाची लढाई जिंकायला हवी...'

'सतीशची डायरी परत करतांना मीं त्याला म्हटलं, 'युद्धशास्त्र अगदींच कच्चं दिसतंय तुझं! शत्रूच्या तुकडीऐवजीं स्वतःचंच सैन्य दुर्बिणींतून पहात बसायची खोड आहे तुला. सतीश, तुला स्त्रीहृदय कळलं नाहीं. पानाफुलांच्या साजानं नटणाऱ्या हिरव्या लुसलुशीत झाडांत वणव्याची दाहकता असते—

'पण नाटकाचा शेवट आतांच तुम्हांला सांगितला तर तंत्रदृष्ट्या बरोबर व्हायचं नाहीं तें निशाताई! तेव्हां इथंच गुडबाय!

तुमची, इंदू'

* * * *

त्या दिवशीं संध्याकाळीं निशा गच्चीवर इंदूचं पत्र पुनः पुनः वाचीत होती. पत्रावर ओघळणाऱ्या आपल्या अश्रूंत दुःख, आनंद, पश्चात्ताप अशा अनेक संवेदना संमीलित झाल्या आहेत असा तिला भास झाला.

त्या भासाची सुखद मोहिनी तिच्या मनावर तशीच किती वेळ तरळत राहिली असती कुणास ठाऊक ? पण अनपेक्षितपणें त्या ठिकाणीं आलेल्या सतीशच्या ' हें काय ? ' या प्रश्नानं ती भानावर आली.

डोळ्यांतले अश्रु पुसतांना तिनं उत्तर दिलं. ' विजांनंतरची वृष्टि. '

'अतिवृष्टि दिसतेय !' निशेच्या खांद्यावर हात ठेवीत सतीश म्हणाला, तें पाहिलंस का ? '

' काय ? ' म्हणून निशेनं कुठं तरी दृष्टि लावली. तेवढ्यांत सतीशनं पटकन तिचं चुंबन घेतलं.

' इश्श ! कुणी पाहिलं तर म्हणतील . '

' वृष्टीनंतरचं इन्द्रधनुष्य ! '

निशेला अगदीं जवळ ओढून आणखी दोनतीन चुंबनें घेतांना तिच्या गालावर उठलेल्या मनोहर रक्तिमेकडे पहात पहात सतीशनं उत्तर दिलं.

# रेशमी गांठ : : ८

" मास्तरसाहेब, ताम्पीच्या गोळ्या द्या हो–"

पत्रांचं सॉर्टिंग करतांना शून्य मनःस्थितींतहि भार्गवला हंसूं आलं. खरं म्हटलं तर औषधाची याचना म्हणजे सूचक करुणिकाच ! त्याला वाटलं, खेड्यांत शाळा चालवायचं आपलं आवडतं ध्येय आचरणांत आणलं असतं तर गांवकऱ्यांनीं आपणाला ' अनुस्वार–शुद्धि–शार्दूल ' अशी पदवी बहाल करून, आजवर थैलीसमर्पणाचा देखील समारम्भ घडवून आणला असता !

गिऱ्हाइकाबरोबर त्याच्या तोंडावरलं हसूंही मावळलं. सॉर्टिंग संपवून, खुर्चीत बसून आळस देतांना त्याला कल्पना सुचली, माणसाचं मन हें सुद्धां एक पोस्ट ऑफिसच आहे. पोस्टांत नुसती ठेवच नसते, कडु क्विनाईन देखील–

–कालचं करुणेचं तें विचित्र वाक्य !...

खिडकीपाशीं आणखी एक गिऱ्हाईक आल्यामुळं त्याची विचार-मालिका तुटली. ' युद्धाच्या मदतीसाठीं सरकार जोडपत्रेंहि फाडून घेईल का ? ' या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर मिळाल्यावर गिऱ्हाईक निघून गेलं.

पलीकडल्या टेबलावर ' कड्ड–कडकड्ड ' शब्द निघत होते. भार्गवला

वाटलं, “ ती डमी–छेः; जीवन्मुक्ताच–‘ सर्वं खल्विदं ब्रह्म ’ या तत्व-ज्ञानाची शिकवण जगाला देत आहे. परीक्षेंत पास झाल्याचं अभिनन्दन असो कीं जीवनांतून पसार झाल्याची शोकवार्ता असो, त्यांच्या आघा-तांचा तिच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. आपणहि त्याच कोटीला पोंचलों तर......”

वाऱ्याची झुळुक येऊन कॅलेंडराच्या पानांचा फर्र-फर्र आवाज–आवाज कसला ? कॅलेंडरांतल्या तरुणीनें जणुं हास्य करून म्हटलं, ‘ कशाला वेदां-तांत शिरतोस, बाबा ? सुखदु:खाच्या वसंतशिशिराचंच पहाना, हें कॅलें-डर कसं शोभिवंत झालं आहे ! ’

घरीं जातांना भार्गवनं तारमास्तरकडून एक कादम्बरी नेली खरी. पण तिसऱ्या कीं चौथ्या पानावरच खूण ठेवून ती मिटावी लागली. बांसरीवर आवडत्या नीलांबरीचे सूर काढून पाहिले. त्यांतहि त्याचं लक्ष लागेना. शेवटीं सकाळीं स्टेशनवर विकत घेतलेला साप्ताहिकाचा अंक त्यानं उघ-डला. देव्हाऱ्यांतले देव रुसल्यावर माळावरल्या म्हसोबाकडे आशेनं धाव घेतोंच कीं नाहीं आपण ?

वास्तविक पाहतां, स्त्री आणि साप्ताहिक हे मनुष्याच्या कर्तृत्वाचा संहार करणारे भस्मासुर–बकासूर आहेत, हें भार्गवचं कॉलेजांतलं अगदीं आवडतं सुभाषित. त्याची फोड करतांना तो म्हणायचा, ‘ स्त्रियांना वेणीच्या अन् साप्ताहिकांना भविष्याच्या शेपट्यामुळं शोभा आली आहे खरी. पण दोहोंच्याही नादानं माणूस कर्तव्यशून्य बनतो. दोघांचींहि मुख-पृष्ठं सौंदर्यसाधनांच्या जाहिरातींनीं भरलेलीं असतात. स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंतकालची माता म्हणून नाटककारानं नि साप्ताहिक हें क्षणाचं साहित्य अन् जन्माची रद्दी म्हणून वाण्यानं कितीहि गोडवे गाइले तरी संततिनियमनाच्या काळांत मातृपदाला महत्व नाहीं; रद्दींतूनहि धीरो-दात्त महाकाव्याची प्रचीति येणं शक्य नाहीं ! तस्मात् संसारांत स्त्रीचीहि किंमत एक आणाच असावी...’ वगैरे वगैरे.

पण विद्यालयाच्या व्यासपीठावरून निषेधिलेलीं तीं वांगीं !

व्यवहाराची आंच लागतांच त्यांचं खमंग भरीत तयार झालं !

आईच्या आग्रहाखातर कां होईना, ध्येयाऐवजीं करुणेच्या गळ्यांत माळ घालतांना लग्नमंडपांतून पळ काढायचा धीर होत नाहीं म्हणून भार्गवनं मनांतल्या मनांत रामदासस्वामी, रायबा आणि मंडळींची क्षमा मागितली.

आणि साप्ताहिकांतलीं भविष्यं करुणेला चिडवायला उपयोगी पडतात म्हणून तो कधीं कधीं त्यांचे अंक विकत घेऊं लागला.

पण आज त्यानं आपलीच रास पाहिली. अगदीं पहिल्याच वाक्याचं त्याला हंसूं आलं; ' या आठवड्यांत तुमचे मित्र शत्रु होतील. '

त्याला वाटलं, ग्रहांच्या उंटावर बसून श्रद्धाळू मनाच्या शेळ्या हाकायची संवयच असते या ज्योतिष्यांना ! उद्यां–परवांच आपला एक स्नेही चार दिवस हवापालट करण्यासाठीं आपल्या इथं येणार आहे. बिचाऱ्याला सार्वजनिक कार्याच्या व्यापामुळं आजवर भेटीला राहोच, पत्र पाठवायलाहि सवड झाली नव्हती. चार वर्षांनीं होणारी त्याची–आपली भेट म्हणजे लीप इयरच ! एकमेकांच्या निःसीम प्रेमाच्या वर्षावानं आयुष्य वाढायचं ! '

बाकी मार्क्स अन् फ्रॉईडवाद्यांचं समाधान करणं भार्गवला कठीणच गेलं असतं. मार्क्सवादी म्हणाले असते, 'रावण रामाचा विरोधी भक्त होता. तसा कुठलाहि पाहुणा हा मनुष्याचा अविरोधी शत्रु असतो. त्यांतून उद्यां येणारा अरविंद आहे कट्टर देशभक्त ! एक वेळ संस्थानिक पाहुणा पुरवला, पण व्हाइसरॉय ? देशभक्त हे तरी हिन्दुस्थानचे भावी व्हाइसरॉयच नाहींत का ? त्यांना महागाईची वर्तकी साखर, बिनचरबीचा गोद्रेज साबू नं. १, हात पुसायला कॉंग्रेसमान्य खादीचा टॉवेल वगैरे वगैरे पुरवतांना नाकीं नऊ आले नाहींत तरच नवल ! '

तर फ्रॉइडवादी पुढें सरसावून बोलले असते, ' अर्थ हेंच कांहीं जगांतल्या क्रांतीचं मूळ नाहीं. उद्यां, दे. भ. अरविन्दाबरोबर मिस् वनिता नांवाची जी सुंदर सिनेमानटीहि येणार आहे, तिच्याबद्दल तुझ्याहि

मनांत अभिलाषा उत्पन्न होणार नाहीं म्हणून काय शाश्वती आहे? सुंदोपसुंदांचं सुद्धां एकमेकांवर काय कमी प्रेम होतं? पण मध्यें तिलोत्तमा येतांच—'

भिन्तीवरला करुणेचा हंसरा फोटो पाहतांच फ्रॉइडवाद्यांनीं जीभ चावली असती ही गोष्ट निराळी!

भार्गव भाविष्याचं सदर उलटून पुढचीं पानं चाळूं लागला. 'चिमणीचा खोपा' असा एका लघुतम सत्यकथेचा मथळा दृष्टीस पडतांच ज्योतिष्यांपेक्षांहि कथांना विचित्र नांव देणाऱ्या आधुनिक लेखकांचा त्याला राग आला. त्या रागाच्या भरांतच साप्ताहिकाचा अंक कोपऱ्यांत भिरकावून देऊन तो खिडकीपाशीं जाऊन उभा राहिला.

मनाच्या चंचल संवेदनाकुल अवस्थेंतच काव्याचा जन्म होत असावा. मावळतीची शोभा पाहतांना त्याला किती तरी कल्पना सुचल्या.

सूर्यबिंबाला छेदून गेलेला तो मेघांचा काळा पट्टा, छे—स्वातंत्र्याच्या ईर्षेनं तळपणाऱ्या बंडखोराला जखडून टाकणारा साखळदंडच जणुं! किंवा गुरुगोविंदसिंहाच्या छाव्याला चिणून टाकणाऱ्या भिंतीचा दगड, किंवा संध्येचं उन्नत वक्षःस्थल झांकून टाकणारी कंचुकी...

रसचमत्कृतीची मुळांतच आवड असलेल्या मानवी मनाचं त्याला नवल वाटलं. राखुंडी खातांना गरोदर स्त्रीच्या गालाला लागलेल्या फरकाड्यांची देखील उपमा द्यायचा मोह त्याला आवरतां आला नाहीं. कांकणांचा आवाज ऐकतांच करुणा दिवा घेऊन आली असावी या कल्पनेनं त्यानं मागं पाहिलं. पण खोलींतला अन्धार कायमच होता. हळूंच पाठीशीं येऊन तिला आपले डोळे झांकण्याची लहर आली असावी असं वाटून त्यानं मनाशीं गमतीचं उत्तर योजून ठेवलं, 'प्रीति आंधळी असली तरी नाक कान असतात, बाईसाहेब, तिला. अंबाड्यांतला फुलांचा सुगंध अन् कांकणांचं संगीत आपल्या आगमनाची वर्दी आधींच—'

तोंच वाऱ्यानं हलणारा दारावरला मण्यांचा पडदा जणुं त्याला चिडवूं लागला, 'प्रेमवेडा रे प्रेमवेडा! एका माणसाची कशी पण गंमत

केली मीं !'

दगडांतून चैतन्य प्रकट व्हायचा चमत्कार पुराणांतच दृष्टीला पडतो असं नाहीं. आजच माहेरीं गेलेल्या करुणेच्या विरहानं जड झालेल्या भार्गवच्या मनांतूनहि सुन्दर आभासाची अहिल्या निर्माण झाली होती.

कंदील लावतां लावतां त्याला वाटलं, ' आभास हा सुद्धां एक लहानसा दिवाच आहे. त्याच्या मधुर प्रकाशानंच मनाच्या खोलींतलीं सत्यं शोधतां येतात. आपल्या आताच्या आभासानं करुणेवरील प्रीतीची अभंगताच पटवली नाहीं का ? असं असतां तिनं ती विचित्र शंका प्रकट करावी !– प्रीतीचे महावृक्ष उन्मळून पडायला दुसरीकडून झंझावात यावे लागतात असं नाहीं, मनांतून सुद्धां...'

लघुकथा अन् कादम्बऱ्यांच्या वाचनानं आजकालच्या तरुण पिढीला कांहीं तरी असंबद्ध बडबडायचा दुर्गुणच जडलाय, असा त्या वेळीं भार्गवनं पोक्त विचार केला होता. आठ वेळां तुरुंगवास भोगून आलेल्या एका क्रांतिकारक डॉक्टरांनीं त्याचं या बाबतींत समाधान करायचा प्रयत्न केला होता. ते म्हणाले होते, ' स्त्रियांची संशयवृत्ति डोळ्यांनीं अधु असते. बाहिर्जी नाइकाच्या गोटांत एखादी स्त्री हेर असती तर तिनं रामदासांना अफझुलखान समजून शिवाजीपुढं उभं करायला कमी केलं नसतं. '

•

आणि ' जीवन म्हणजे परमेश्वरानं काढलेला कूटप्रश्नांचा खास अंक ' हें भार्गवच्या एका विनोदी मित्राचं वचन त्याला पटविण्यासाठींच कीं काय, परिस्थितीनं अरविन्द आणि वनिता यांच्या जोडगोळीच्या आगमनाची योजना करून ठेवली होती.

' कॉंग्रेसवाल्यांना मशिनगन्स नकोत, फटाकड्या हव्यात ' अशा अर्थाच्या श्लेषात्मक पण कुत्सित टीका आजवर त्याच्या कानांवरून गेल्या नव्हत्या असं नाहीं. इतकंच नाहीं, तर अशा टीका प्रसृत व्हायला बव्हंशीं नीतिशिथिल पुढारीच जबाबदार असतात असंच त्याला वाटे. पण कांहीं झालं तरी मनुष्याचीं मूल्यं त्यांच्या पक्षापेक्षां चारित्र्यावरूनच

ठरविणं इष्ट नाहीं का ! अरविंदचीं तीं उच्च ध्येयें, देशाकरतां सर्वस्व अर्पण करायची तयारी, लैंगिक स्वातंत्र्याच्या गोंडस नांवाखालीं स्वैराचाराला प्रवृत्त झालेल्या विलासी जीवांचे केलेले निषेध, 'पुढारी दुराचारी असेल तर देशहि दुराचारी झाल्याविना राहणार नाहीं ' हें कॉलेजांत अनेक वेळां बोलून दाखविलेलें मत...

हें सारं आठवतांच त्याला वाटलं, ' अरविंदचा इतका उज्ज्वल ध्येयवाद सिनेमा नटीच्या डोळयांतल्या सुरम्यानं का काळवंडून जाणार आहे ! छेः छेः, स्वतः काढलेल्या अनाथ विद्यार्थिगृहासाठीं वनितेच्या गायनाचे जलसे करून पैसा मिळवायचा बेत असावा त्याचा बहुधा. '

तो तर्क मनाशीं निश्चित करीतच भार्गव पाहुण्यांचं स्वागत करायला स्टेशनवर गेला. डब्यांतून अरविंद उतरतांच त्याला भार्गवनं केलेला नमस्कार एका अर्थानं काळालाच होता ! किती नखाशिखांत बदल झाला होता अरविंदाच्या राहणींत ? पूर्वीचा खादीचा वेष जाऊन अस्सल विलायती सुटांत स्वारी वनितेच्या हातांत हात घालून खालीं उतरली. त्याच्या कोटाच्या कॉलरीवर ऐटीनें हंसणारी ती गुलाबाची कळी—

भार्गवला कुठं तरी वाचल्याचं आठवलं, ' कळयांचीं फुलं होतात, पण मानवी आयुष्याच्या कळयांचे कांटेहि होतात !'

बोलण्याच्या ओघांत अरविन्दच्या जीवनरहस्याच्या उलगडा होईल अशी त्याची अपेक्षा होती. पण भार्गवच्या गांवचं सृष्टिसौंदर्यच इतकं विलक्षण होतं कीं, पाहुण्यांना त्याशिवाय दुसऱ्या विषयावर बोलणं सुचतच नव्हतं, याला कोण काय करणार !

त्या दिवशीं करुणेची एकाएकी आठवण होऊन मन अस्वस्थ झाल्यामुळं भार्गव पोस्टांतून लवकरच घरीं आला. जिन्याच्या पहिल्या पायरीवर पाय ठेवतांच त्याच्या कानावर स्वरलहरी आदळल्या, ' मोहवितां का जादुगारा ऽ ऽ '

मनांतलं कुतुहल जागं होऊन तो चोरपावलांनीं दारापर्यंत गेला. ब्रह्मचारींतल्या एका प्रसंगाची नक्कल चालली होती. अरविन्द वनितेच्या

ओठांना स्पर्श करून म्हणत होता, ' थां ऽ ऽ बिव हा ऽ ऽ नजरे ऽ ऽ चा ऽ मारा ऽ ऽ '

भार्गवचं विचारचक्र सुरूं झालं, ' कुणीसं म्हटलं तें खरं आहे. जगांत निःशस्त्र पण प्रभावी युद्ध महात्मा गांधी आणि स्त्रिया यांनाच खेळतां येतं ! नाहीं तर एके काळीं ' फाँसी पै झूल जाना ' म्हणणारा अरविन्द सिनेगानटीच्या दृष्टिक्षेपांनीं कसा घायाळ झाला असता ? आपण पोस्टां-तलं काम टाकून करुणेचा हंसरा फोटो पाहण्यासाठीं कसे आलों असतों ? कलालानं मद्याचा प्याला ब्रह्मदेवापुढं धरून विचारलं असावं, ' इतकी सुंदर दुसरी चीज तुला निर्माण करतां येते का ? ' तेव्हां ब्रह्मदेवानं स्त्री जात उत्पन्न करून, कलालाचं समाधान केलं असावं !

त्या रात्रीं भार्गवनं कादंबरी उघडली. खुणेसाठीं ठेवलेल्या कागदाच्या फाटक्या तुकड्यावरल्या करुणेच्या अक्षरांनीं त्याचं लक्ष वेधून घेतलं, '...र्गवांची प्रीति सुद्धां क्षणजीविच आहे ! हल्लीं किती उशिरां येतात ते डॉक्टरकडून. तुझ्याच प्रकृतीबद्दल बोलत बसलों होतों म्हणून सांगतात. पण मनाला कांहीं केल्या खरं वाटत नाहीं तें. त्यांच्याकडं बसायचं खरं कारण...'

पुढचे शब्द हाताशीं नव्हते, पण त्याला सहज ताडतां आले. डॉक्ट-रांच्या विदुलेच्या सौंदर्याची त्यानं करुणेजवळ एकदोनदां स्तुति केली होती, पण तिचं असं विष होईल याची त्याला कुठून कल्पना येणार ?

भूत काय किंवा भूतकाळ काय दोघांचींहि पावलं उलटीं असतात; मनुष्याकडे त्यांची पाठ असली तरी परतायलाहि उशीर लागत नाहीं ! करुणेवरील प्रगाढ प्रीतीची ग्वाही देणाऱ्या शेंकडों स्मृति त्याच्या डोक्यांत थैमान घालूं लागल्या.

—एका राष्ट्रीय शाळेंत काम करण्याची संधि मिळतांच आपण पोस्टां-तल्या नोकरीचा राजीनामा लिहून तो अभिमानानं करुणेला दाखविला. पण आत्महत्येचा बेत ऐकून व्हावी तशी तिची चर्या झाली ! दुसरे दिवशीं हंसत हंसत राजीनामा फाडून आपण पोस्टांत गेलों.

—करुणेला वर ओकं ओकं वाटूं नये म्हणून वाचनालय, सभा टाळल्या, मित्रांनीं अनुपस्थितीचं कारण विचारलं म्हणजे गमतीनं म्हणावं 'जगांत असा सुद्धां एक चंद्र आहे कीं ज्याच्या दर्शनानं इतर गोष्टींच्या उत्साहाला ओहोटी लागते.....'

—सावलींत बसून कुणीहि कुंडींत फुलझाडं लावील. पण, आपण तीं वाळवंटांत वाढवून दाखविलीं. मुळांतच नाजूक प्रकृति असलेल्या करुणेला काकडी खाल्ली तरी अंथरूण धरावं लागे. अशा वेळीं सारीं घरकामं आपण उरकावीं. स्वयंपाक सुद्धां करावा. करुणा चुलीजवळून उठतांना आढेवेढे घेऊं लागली म्हणजे आपण हंसत हंसत म्हणावं, 'तुझं काय जातं? स्वयंपाकाबरोबर निरानिराळे चित्रपटसुद्धां पाहावयाला सांपडतील तुला! अग्निकंकण, ज्वाला, लंकादहन...'

—गेल्या सहा महिन्यात तर उत्तर ध्रुवावर फुलं फुलवायची कठीण कामगिरी केली आपण. स्त्रियांचं गरोदरपण म्हणजे संसारांतला उत्तर ध्रुवच. करुणेच्या पोटांत कळा उठूं लागतांच आपल्या अंगावर येणारा काटा, हिमवर्षावानं निष्पर्ण झालेल्या वृक्षांत जीवनरस दिसावा त्याप्रमाणं तिला धीर देण्यासाठीं ओठांवर आणलेलं उसनं हास्य, आगामी संकटाच्या भयानं जागून काढलेल्या नीरव रात्री—सहा महिन्यांचा दिवसच तो!...

—या साऱ्या फुलांच्या अमरतेविषयीं तिनं साशंक व्हावं!

भार्गवनं डबडबलेल्या डोळ्यांनीं स्वर्गस्थ आईच्या फोटोकडे पाहिलं आणि हळूंच 'आई!' अशी करुण विफल हांक मारली. 'न मातुः परदैवतम्' या वचनांत बाहेरच्या अंधाऱ्या रात्रीइतकीच विशालता सामावली आहे असं त्याला वाटलं. झोंपण्यापूर्वी तो नित्याच्या संवयीप्रमाणं दैनंदिनी लिहायला बसला.

"करुणा!...गेल्या वर्षी मीं हौसेनें तुझ्या फोटोचं एन्लार्जमेंट करवून घेतलं. तितकंच तुझ्या मनोविकासाकडं लक्ष पुरवलं असतं तर! तर! शाळेंत एका मुलानं 'हा शब्द विशेषण आहे' असं सांगतांच आम्ही सर्व विद्यार्थी त्याला हंसलों होतों. पण आतां वाटायला लागलं, त्याचंच

उत्तर बरोबर आहे. 'तर' हें पृथ्वीचं विशेषणच नाहीं का? मानवी जीवनाचा दुबळेपणा या शब्दानंच समजतो ना?

"कवितेप्रमाणं प्रीतीची सुद्धां अरसिकाबरोबर गांठ पडली कीं तिचं दुर्दैव उभं राहतं. कॉलेजमध्यें प्रीति म्हणजे दस्त्या, चहा, इश्श, रिबन वगैरे गोष्टींचा रस्सा असं म्हणून नवप्रेमिकांना मी चिडवायचा. आपल्या संसारांत प्रीतीचं स्पष्टीकरण रक्त, त्याग, सहानुभूति या पर्यायांनीं करून दाखवायचा मीं प्रयत्न केला. पण त्याला सुद्धां तूं हंसलीस. विदुलेसंबंधींचा तुझ्या मनांतला तो संशय म्हणजे हास्यच !–विकट हास्य असेल तें !

" असं वाटतं, आत्तांच्या आत्तां स्पेशल मोटार करून विदुलेच्या वडिलांना घेऊन तुझ्याकडं यावं अन् 'वकिलीसाठीं डॉक्टर आणलाय' असं म्हणून खुदकन् तुला हंसवावं. डॉक्टरकडे तासतास बसून तुझ्या प्रकृतीसंबंधीं केलेली चर्चा, अशक्त स्त्रियांच्या गरोदरपणीं पाळावयाच्या सूचना लिहून घेतांना थरथरणारा माझा हात, या पुराव्यांच्या साहाय्यानं डॉक्टर तुझ्या मनांतला गैरसमज सहज दूर करूं शकतील. त्या वेळीं पश्चात्तापानं अवनत होणारं तुझं मस्तक आपल्या छातीवर विसावूं द्यावं अन् रेशमासारख्या तुळतुळीत केंसावरून हात फिरवितांना—

" जाऊं दे. रेशमी धाग्यांचा गोफ लवकर उकलतां येत नाहीं हेंच खरं! आपली प्रीति विसरून जातांना मनाला किती यातना होताहेत म्हणून सांगूं! त्यांतून उद्यां आपल्या संसारांत प्रवेश करणारा चिमुकला जीव...गोफापेक्षांहि गांठ उकलणं कठीण असतं नाहीं? करुणा, रेशमी गांठ सुटत नसते, ती तोडावी लागते. बाळाच्या बारशाच्या दिवशीं तुझ्या खोलींत येऊन खूपखूप थट्टा करायचा माझा बेत होता. पण त्या दिवशीं मी कुठं राहणार आहें याची तुला कल्पनाहि नसेल.

"नागपूरचा संप पुनः भडकला आहे. भांडवलशाहीचा राक्षस मजुरांच्या पोटाला भाकरीचा तुकडा देण्याऐवजीं त्यांच्या छातीवर बंदुकीच्या गोळ्या चालवणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. अनभिषिक्त राजानं आरंभिलेल्या राजसूय यज्ञांत जीवनाचा भाग देण्यासाठीं मीहि जायचा निश्चय केलाय्......"

दैनंदिनी मिटून त्यानं अंथरुणावर अंग टाकलं. देवळांत भजनकरी तुकारामाचा अभंग गात होते, 'आजवरी होतों संसाराचे हातीं...'

त्यागभूमीवर पावलं टाकतांना अंगांत वीरश्री संचारविणारं तें पार्श्व-संगीत आहे अशी कल्पना करीत करीतच त्यानं डोळे मिटले. पण झोंप येत नाहींशी पाहून त्यानं दिवा मोठा केला आणि साप्ताहिकांतली लघुतम सत्यकथा वाचायला सुरुवात केली—

## चिमणीचा खोपा

अरविंद एक ध्येयवादी तरुण होता.

देशांत कर्तबगार पिढी निर्माण करण्यासाठीं त्यानं अनाथविद्यार्थिगृह काढलं.

'आम्हांस एक ठावें । देशास प्राण द्यावे' असं विद्यार्थी एकमुखानं राष्ट्रगीत म्हणतांना पाहून विद्यार्थिगृहाला भेट द्यायला आलेल्या पुढाऱ्यांनीं उद्गार काढावेत, 'यांच्यांतूनच रानडे, आगरकर, गोखले उदयाला येणार आहेत!'

संस्थेच्या प्रपंचासाठीं अरविंदला कर्ज काढावं लागलं. एके दिवशीं सावकाराचे पठाण दाराशीं येतांच अरविंद आशेनं आपल्या माजी शिष्याकडं गेला.

कुणीं जोशांच्या भावगीतांच्या रेकॉर्डस् ऐकविल्या, कुणी आपल्या नव्या बंगल्याला चुन्यापेक्षां सिमेंट वापरणंच कसं फायदेशीर पडलं तें विस्तारानं सांगितलं, तर कुणीं कर्जाऊ दिलेली रक्कम अवघ्या एक वर्षांतच दामदुपटीनं कशी वसूल करून घेतली हें अभिमानानं कथन केलं!

रिकाम्या हातानं अन् जड मनानं परतलेल्या अरविंदला चिमणीच्या खोप्याची गोष्ट आठवली. बिचारी चिमणी! पावसांत कुडकुडणाऱ्या कावळ्यांना आपल्या मेणाच्या घरांत आश्रय देते. पण ते दुष्ट प्राणी आपला स्वार्थ साधतांच चिमणीचं घर नासधूस करून निघून जातात......

हुंड्याच्या नैवेद्यावांचून नवरदेवाच्या मंदिराबाहेरच तिष्ठत उभ्या अस-लेल्या बहिणी, पैशाच्या अभावीं कॉलेजच्या दाराशीं चुळबुळणारे धाकटे

भाऊ आणि कृतघ्न जगाचा विसर पडावा म्हणून जाणूनबुजून जवळ केलेली वनिता यांना तो कधीं कधीं चिमणीच्या खोप्याची गोष्ट सांगतो आणि ते बावरलेल्या मुद्रेनें त्याच्याकडे पाहूं लागले म्हणजे तो नुसता हंसत सुटतो!!

*　　*　　*

जीवनाचा महामंत्र ज्ञात असणाऱ्या लहानशा ऋषिकुमाराच्या दर्शनाप्रमाणें भार्गवाला ती कथा प्रेरक वाटली. करुणेवर रागावून आपण भलतंच धाडस करायला प्रवृत्त झालों होतों, या गोष्टीचा त्याला रात्रभर अनुताप होत होता!

दुसरे दिवशीं त्याला करुणेचं पत्र आलं—

'प्रिय भार्गव!

'वाचनलेखनाचे मीं मुळींच श्रम घेऊं नयेत असं आजच डॉक्टर सांगून गेले. पण संत सखूनं विस्तवांत हात घालून पांडुरंगाची मूर्ति बाहेर काढलीच कीं नाहीं? तिला हिस्टेरिया झाला असला पाहिजे असं डॉक्टर खुशाल म्हणोत पाहिजे तर! पण शरीरधर्म उल्लंघिल्याशिवाय मनाचं सुख मिळूंच नये अशी परिस्थिति जेव्हां निर्माण होते, तेव्हां माणूस काय हवं तें साहस करायला सिद्ध होतं, हेंच त्यांतलं खरं रहस्य नाहीं का? रुग्णशय्येवर पडल्या पडल्या तुम्हांला पत्र लिहिण्यापलीकडे माझा आनंद तरी दुसऱ्या कशांत उरला आहे? तसं पाहिलं तर आजपर्यंत शरीरावर प्रेम करण्यांतच मी सुख मानलं ना? जरीचीं पातळं नेसायला मिळावींत, उन्हाळ्यांत चिखलदऱ्याला टुमदार बंगल्यांत रहायला मिळावं, रोज नवे नवे पदार्थ करून, मैत्रिणींना चकित करावं यासाठींच माझी सदैव धडपड चालू होती ना? पण हें समाधान मिळवितांना मला केवढी जबर किंमत द्यावी लागली? किम्मत कसली? विलासदेवतेला प्रसन्न करण्यासाठीं तुमच्या व्यक्तित्वाचा बळी—

'तुमच्या मनांत उदित झालेल्या अलौकिक स्वार्थत्यागाच्या भावनेचा मी झंजावात म्हणून उपहास केला. किती पापी आहे मी! अन् म्हणूनच कीं काय......

' हो, भीष्मद्रोणाप्रमाणं हल्लींच्या स्त्रियांना देखील आपला मृत्यु कशांत आहे हें आधींच ओळखतां येऊं लागलं ! माझ्या माहितींतल्या तीन मुली पाहतां पाहतां या आठवड्यांत बाळंतपणानं दगावल्या. आज इंजक्शन देतांना " भ्यायचं कारण नाहीं " म्हणून डॉक्टर मला म्हणाले खरे, पण त्यांनीं लपविलेलं सत्य त्यांच्या चर्येवर प्रकट झाल्याशिवाय राहिलं नाहीं. आपल्या शब्दावर रोग्यांचा विश्वास बसावा असं डॉक्टरांना वाटत असेल तर त्यांनीं आधीं अभिनयाची कला हस्तगत करायला हवी असा विचार सुचून हंसूहि आलं. उधामसिंगाला फांशीं दिलं त्या दिवशीं तोंडांत पाण्याचा थेंबही न घेणाऱ्या तेजस्वी पुरुषाच्या पत्नीला मरणाच्या दारांत बसून विनोद न सुचला तरच नवल !

' एकाच गोष्टीचा खेद वाटतो. तुम्ही स्वातंत्र्य मिळवून परत आलांत म्हणजे हंसत मुखानं तुमच्यावरून पंचारती ओवाळायला दारांत कोण उभं राहील ? खरंच, डॉक्टरांच्या सहवासानं नि उपदेशानं तुम्ही स्वीकारलेल्या क्रांतिमार्गानंच लवकर स्वराज्य मिळणं शक्य आहे नाहीं ? अन् त्याच थोर मनाच्या डॉक्टरविषयीं एक वेळ किती रोप होता माझ्या मनांत. वाटे, ' हा भयंकर माणूस इकडल्यांच्या मनांत क्रांतीचं तत्वज्ञान ठसवून एक दिवस भरल्या संसारांतून तर उठवून लावणार नाहीं ?... बाकी, तुम्ही मात्र अखेरपर्यंत डॉक्टरांच्या मैत्रीचं रहस्य कळूं दिलं नाहीं अं !...अगबाई ! अंगणांतल्या पपईवर कावळा ओरडत आहे. भेटीला यायच्या तयारींत आहांत वाटतं ? किती छान प्राणी आहे कावळा म्हणजे......Thanks, Oh crow ! ...'

* * *

समोर पडलेल्या पार्सलांकडे अर्थाअर्थी कांहीं संबंध नसतां भार्गवनं जिज्ञासेनं कां पाहात रहावं हें तारमास्तरांना कळणं शक्य नव्हतं. अगम्य भवितव्यतेचं प्रतीकच पहात नव्हता का तो !

---

## पांढरे ढग : : १

मॅजिक लॅन्टर्नच्या साहाय्यानें पडद्यावर दाखवला जाणारा चित्रपट पाहून राधाकाकूंच्या मनांत विचार आला, आपण म्हातारीं माणसं म्हणजे ही अशीं, मॅजिक लॅन्टर्नच्या चित्रासासारखीं ! शोभेला कमी पण उपयुक्ततेच्या दृष्टीनं शंभरटक्के बोलपटालाहि मागें टाकूं इतक्या किंमतीचीं.

चित्रांच्या साहाय्यानें डॉक्टर क्षयरोगाविषयीं माहिती सांगत होते. वास्तविक राधाकाकूंना त्या ठिकाणीं यायचें कांहींच प्रयोजन नव्हतें. म्हातारें माणूस हें आरोग्याचें खरें खुरें व्यंगचित्र आहे, हें राधाकाकूसारखीं माणसें पाहिल्यावर पटल्यावाचून राहात नसे.

राधाकाकू देखील घरून निघतांना मनाशीं हेंच म्हणाल्या होत्या, मी मॅजिक लॅन्टर्नचा चित्रपट पाहायला जातें खरी, पण तें समुद्रांत बुडी मारण्यांत सारा जन्म घालवणाऱ्या कोळ्यानं दोन पैसे देऊन दुर्बिणीच्या डब्यांतला समुद्र पाहावा इतकें हास्यास्पद आहे. वास्तविक माझ्यापेक्षां निशिकांत किंवा पुष्पा यांनीं फार तर अशा प्रसंगीं जावं...तोंच त्या दचकल्या. मनुष्याच्या विचित्र मनाच्या तार्किकतेला दोष देतांना त्यांनीं एकदां गच्चीवर चांदण्यांत ग्रामोफोनच्या रेकॉर्डस ऐकणाऱ्या निशिकांतकडे व नंतर पुष्पेकडे पाहिलें आणि त्या घराबाहेर पडल्या.

एरव्हीं खरोखरच त्या घराबाहेर पडल्या नसत्या.

निशिकान्तानें आज आलेल्या पगारांतून कांहीं नव्या रेकॉर्डस आणल्या होत्या; त्यांतली एक तर राधाकाकूंच्या सांगण्यावरूनच आणली होती. ' शंका शुभ होई विफल कां ! ' ही ती रेकॉर्ड. अपत्यासाठीं अधीर झालेल्या वत्सल स्त्रीचें तें गाणें त्यांनीं कुठेसें ऐकलें होतें. त्याबरोबर त्यांना तीस वर्षांपूर्वीचा इतिहास आठवला. पाळण्यावाचून भयाण दिसणाऱ्या ओसरीवर आयुष्य कंठायचा आपणाला कंटाळा आला होता. चिलया, ध्रुवाच्या कथा–गोष्टी ऐकतांना आपले डबडबलेले डोळे कुणाच्या दृष्टीस पडूं नयेत म्हणून आपण डोळे खुपत असल्याचं निमित्त करून तोंडा-वरचा पदर दूर करूं नये...आणि एके दिवशीं एक गोडशी शंका आपल्या मनांत आली !...' शंका शुभ होई विफल कां ' या गाण्यानें त्यांच्या स्मृतिसंपुटांत अंधुकपणें वावरणाऱ्या त्या गोड शंकेवर प्रकाश टाकला. त्यांनीं निशिकान्ताला ती रेकॉर्ड विकत आणायला सांगितलें.

त्या रेकॉर्डबरोबर निशिकान्तानें आणखी एक गोष्ट घरांत आणली नसती तर राधाकाकू आजच्या चांदण्यांतल्या रेकॉर्डसच्या प्रोग्रॅमला खचित हजर राहिल्या असत्या.

जेवतांना निशिकांत पुष्पेला म्हणाला होता, ' महाबळेश्वरला जायचंय आपणांला. पांच वर्षांपासून आपण करीत आलेला हा बेत या वर्षी सिद्धीस जाणार म्हणायचा...'

राधाकाकू त्या वेळीं हलक्या आवाजांत देवाचें गाणें गात होत्या. त्या एकदम थांबल्या. जेवण झाल्यावर त्या निशिकान्ताला म्हणाल्या, ' निशी यंदा तरी मला द्वारकेला जाऊन येऊं दे ना. तुला दिखील आलं पाहिजे. तुझ्यासाठीं केलेला हा नवस एकदां—' पण निशिकांत मध्येंच म्हणाला, ' पण आई, द्वारकेसारखं शहर म्हाताऱ्या माणसांपेक्षां म्युनिसिपालि-टीच्या मेंबरांनीं एकदां अवश्य पाहून यावं. म्हणजे तरी त्यांना आपलं गांव सोन्याचं नसलं तरी सोन्यासारखं स्वच्छ ठेवायची विद्या कळेल. '

एरव्हीं निशिकान्ताच्या बोलण्यावर हासणाऱ्या राधाकाकू या वेळीं स्तब्ध राहिल्या. त्यांचा चेहरा गंभीर झाला. त्यावर विषण्णतेची छाया पस-रली. समुद्राच्या मंद लहरींचीच गंमत वाटते माणसाला, लाटांची नाहीं !

गच्चीवर रेकॉर्डस ऐकत न बसतां त्या चित्रपट पहायला गेल्या. डॉक्टर आकर्षक भाषेंत आपलं व्याख्यान समजावून द्यायचा प्रयत्न करूं लागले. ' नदीच्या मुळाप्रमाणं रोगाचं मूळहि फार क्षुद्र असतं. पण नदीचं मूळ पाहूं नये अन् रोगाचं मूळ मात्र अवश्य पाहायला पाहिजे...शेक्सपिअर आज हयात असतां तर त्यानं जगाला रंगभूमीपेक्षां इस्पितळाचीच उपमा दिली असती. मी थोडयाफार कादंबऱ्या व नाटकं वाचलीं—गडकऱ्यांचा ' पुण्यप्रवाह,' (!) खांडेकरांची ' हृदयाची आग,' (!) ' दक्षिण ध्रुव,'(!) किंवा ' ऊन पाणी ' (!) अथवा अऱ्यांचं ' दाराच्या बाहेर ' (!) या सुंदर कृतींतून अशा उपयुक्त विषयावर थोडंसं लिहिलं गेलं असतं तरी पुष्कळच छान झालं असतं !...क्षयरोगाचे जंतु शरीरांत मुख्यतः प्रवेश करतात ते दुधाच्या रूपानें...

राधाकाकूंचें कल्पनातारू इथूनच भडकलें. त्या विचार करूं लागल्या. चिपळूणकरांनीं इंग्रजी भाषेला वाघिणीचें दूध म्हटलें आहे. त्यांना त्या दुधांतले क्षयाचे जंतु दिसले नाहींत. पण त्याचा परिणाम हल्लींच्या पिढीला भोगावा लागत आहे. आपण निशिकान्ताला इंग्रजी शिकवलं, सूनहि इंग्रजी शिकलेली आणली, पण—पण महाबळेश्वराची हवा शरीरप्रकृतीला चांगली असते तशी मनाला जडलेला क्षयरोग नाहींसा करायला कुठल्या हवेची ख्याती आहे ?

* * *

त्या दिवशीं निशिकांत आणि पुष्पा महाबळेश्वरास जायची तयारी करीत होते. राधाकाकू जुन्या पुस्तकांच्या कपाटांत 'अमृतानुभव' शोधीत होत्या. इतक्यांत एक इंग्रजी पुस्तक त्यांच्या हातास लागलें. इतस्ततः विखुरलेल्या लोहकणांजवळ लोहचुंबकाचा खिळा आणतांच साऱ्या लोहकणांस चेतना प्राप्त होऊन ते एका विशिष्ट प्रकारच्या रचनेंत बद्ध व्हावेत तसें त्या पुस्तकाच्या स्पर्शानें राधाकाकूंच्या मनांतल्या विचारांचें झालें.

श्रीधरपंतांनीं मृत्यूच्या आधीं आठच दिवस तें मानसशास्त्रावरील पुस्तक घरीं आणलें होतें. अंगणांत खुर्ची टाकून वाचतांना त्यांनीं आपणाला हांक मारून म्हटलें, " पाहिलंस का हें ? हा टर्नर म्हणतो कीं,

' प्रेम प्रेम म्हणून ज्याचा कवि इतका उदोउदो करतात ती सारी कल्पनाच आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत तें प्रेम कोणाच्याहि अनुभवास येणें शक्य नाहीं. उच्चत्तम समजलं जाणार मातृप्रेम पण तें देखील एक काव्यच आहे. माणूस प्रत्येक व्यक्तीपासूनच थोड्याफार प्रमाणानें सुखाची अपेक्षा करतें. सर्वांत अधिक सुख स्वतःच्या अपत्यापासून होऊं शकेल अशी त्याला वेडी आशा असते. पण तिच्या विफलतेचा अनुभव ज्या मानानें त्याच्या बुद्धीला पटत जातो त्या मानानें त्याच्या वात्सल्याचा पारा कमी अधिक अंशावर स्थिर होतो. " तें आठवतांच राधाकाकूंना हंसूं आलं. त्या हास्यांत बालकाची निर्व्याजता नव्हती. कारागृहाकडे जाणाऱ्या गुन्हेगारानें जगाकडे पाहून अकारणच हास्य करावें तसें तें होतें.

आपणाला आपल्या आशेच्या विफलतेचाच प्रत्यय आला काय? आजारांत आपल्या उशाशीं रात्री जागून काढणारी निशिकान्त–पुष्पेची जोडी त्यांच्या दृष्टीपुढें उभी राहिली. ' पुत्रवती हो बाळ ' आपण त्या वेळीं दिलेला आशीर्वाद ऐकून लाजेंत चूर झालेली पुष्पा! बिचारीच्या आयुष्यांत अजूनहि तो दिवस उगवला नव्हता! निशिकान्ताला निरोप न देतां भाव्यांच्या घरीं जाऊन बसायचा विचार त्यांनीं मनांतून काढून टाकला.

सामान टांग्यांत ठेवलें गेलें. पुष्पेनें राधाकाकूंना नमस्कार केला, तेव्हां त्यांनीं आशीर्वाद दिला, ' पुत्रवती हो बाळ. '

निशिकान्ताच्या डोळ्यांतून खळकन् दोन अश्रु निखळले. राधाकाकूंना एकीकडे गाठून निशिकान्त म्हणाला, 'रागावूं नकोस आई, पुढच्या वर्षी अवश्य जा तूं द्वारकेला. पुष्पेला क्षय झाल्याचं डॉक्टरनं सांगितलं, पण तिला ही गोष्ट कळतां कामा नये म्हणून मुद्दाम तुझ्याजवळ देखील या गोष्टीचा उल्लेख केला नाहीं. '

राधाकाकूंनीं खिडकीबाहेर दृष्टि टाकली, आकाशांत पांढरे शुभ्र ढग भुरभुर करीत वाऱ्यावर धावत होते. किती सुंदर होते ते! ' पुत्रवती हो बाळ ' या आशीर्वादाइतकेच! पण हाय! पांढरे ढग वाऱ्यांत कुठें तरी विलीन होत होते.

## यंत्र : : १०

'अरे विद्याधर, जरा टेकडीवर जाऊन येऊं, कसं मजेदार चांदणं पडलंय.' निळुकाकाचे ते शब्द माडीखालून--माडीखालून कसले ! आकाशवाणीच म्हणायची ती—कानावर आले. चांदण्यांत फिरायला जाण्याच्या गोष्टी बोलणारा म्हातारा पृथ्वीवर सांपडेल ही कल्पना 'बहुरत्ना वसुंधरा' हें वचन कबूल करूनही मनाला पटत नव्हती ! निळुकाकांत येवढें स्थित्यंतर कुणीं घडवून आणलें ? आरोग्यशास्त्र, काव्य आणि शास्त्रीय शोध यांपैकीं कोणताही महात्मा निळुकाकांना चन्द्राचें सामर्थ्य सिद्ध करून द्यायला धजला नव्हता. 'पंचांगांतलीं चन्द्राचीं चित्रें पाहून त्यांना चांदण्यांत फिरायची लहर लागली असावी' असा कांहींसा विचार करीत मी माडीच्या पायऱ्या उतरूं लागलों.

इवल्याशा खेड्यांत पसरलेली स्तब्धता, गांवाभोंवतालच्या झाडींत होणारा रातकिड्यांचा आवाज आणि तशा वेळीं एक म्हातारा आणि तरुण गांवाबाहेर पडतात !—सुरस ग्रंथमालेच्या कोणत्याही कादंबरींत शोभण्यासारखा रहस्यमय प्रसंग !

टेकडीवरून चांदण्याची शोभा खरोखरच अपूर्व दिसत होती. आकाशांत लुकलुकणारीं हजारों नक्षत्रें, तेजाळ चंद्र आणि त्याच्यापासून थोड्या अंतरावर असलेली चांदणी हें दृश्य पाहून हजारों प्रेक्षकांसमोर धिटाईनें

टेनीसचा चेंडू उडवणारी कुमूद माझ्या दृष्टीसमोर उभी राहिली. पण काकांच्या अस्तित्वाची जाणीव होतांच मी म्हणालों,

' सुरेख पडलंय चांदणं ! जसं कांहीं—पीठ म्हणत नाहीं—काव्याची हानी व्हायची कदाचित्....'

यावर काका म्हणाले,

' छेः ! छेः ! उलट सत्याचीच होणार आहे हानी. पीठ हजारों गोरगरीबांचं पोट भरतं, चांदणं कवितांचा विषय होऊन मासिकांचीं पानं भरून काढलं नुसतं ! '

' पिठाचा उपयोग नाटक मंडळींतल्या लोकांना खळी करून जाहिराती चिकटाविण्याकडे होतो तर चांदण्याचा उपयोग त्या जाहिराती धड वाचण्याकडे देखील होत नाहीं. '

यावर मी हंसलों, काकाहि हंसले. त्यांचें हास्य ओसरल्यावर ते म्हणाले,

' बाकी कांहीं म्हण विद्याधर, या यंत्रयुगांत चांदण्याला पिठाची उपमा कांहीं जमायची नाहीं. गरीबांच्या पोटावर पाय देऊन यंत्रांतून निघालेलं हें ऊन ऊन पीठ कुठं, अन् कुठं हें गार अन् पवित्र चांदणं ! सांगायचं काय—'

कुठल्याहि म्हाताऱ्याला तंबाखू, तपकीर आणि तात्पर्य यांपैकीं एकाचें तरी जबरदस्त व्यसन जडलेलें असतें असें परवांच कुणीसें म्हटलें होतें. याला अपवाद म्हणून मी निळुकाकांकडे मोठ्या अभिमानानें पाही. पण आज तोहि नाहींसा होणार अशी भीति वाटूं लागली, ते सांगूं लागले,

'—कीं यंत्रांनीं आमच्या संस्कृतीचंच नव्हे तर भाषेतल्या सांप्रदायाचंही पीठ करायला सुरवात केली. '

' खरं आहे काका, जात्यावर बसलं कीं ओवी सुचायची म्हणे पूर्वींच्या काळीं. अन् आज बसायला सांगा एखाद्या स्त्रीला जात्यावर. शिवी सुचेल एखादी लहानशी ! '

' असंच कां म्हणेनास, आपला एक जुना इतिहास आठवला विद्याधर.

सुलतानांनीं मिळविलेल्या रत्नांच्या राशींचीं वर्णनं वाचलीं म्हणजे त्यांच्या कल्पनेनं डोळे दिपतात, पण असे घरगुती इतिहास आठवले म्हणजे डोळे भरून येतात बरं भरून–' असें म्हणतांच ते एकदां अडखळले आणि घसा साफ करून सांगूं लागले,

'लहान होतों तेव्हांचा प्रसंग. माझे वडील वारल्याला नुकतेच पंधरा दिवसही झाले नव्हते. आईवर कोसळलेल्या दुःखाचा भागीदार होण्याइतकें सामर्थ्य माझ्यांत आलें नव्हतें. त्या दिवशीं सातूचं पीठ खायची कुठूनशी लहर लागली मला. गरीबांची लहर ! समुद्रावरच्या चिमुकल्या लहरींचीच बहीण. समुद्राच्या तळापासून मोत्यें आणायची लाटांची हाव त्यांना नसते पण किनाऱ्यावरल्या शिंपल्याशीं खेळायची इच्छा असतेच असते त्यांच्या ठिकाणीं ! मी हट्ट सोडत नाहींसें पाहून आईनं जातं घातलं अन् माझं डोकं मांडीवर घेऊन दळायला सुरुवात केली ! दळतांना गायचा आग्रह केला मीं. तो देखील पुरवला बरं माउलीनं. विद्याधर, आजच्या युगांत येईल कधीं असा अनुभव ! माणसं देखील यंत्र झालीं आहेत आज–'

'अशाच एका यंत्राची गोष्ट आठवलीय मला काका,' म्हणून मीं सांगावयास सुरुवात केली, 'दोन वर्षांपूर्वीचा प्रसंग. बँकेंत नोकरी लागून दोन महिने झाले होते. एके दिवशीं बँकेच्या इमारतीच्या पायरीवर पाय ठेवतांच हेडक्लार्कचे शब्द कानावर पडले, 'तुम्हाला नोकरीवरून दूर केलं. ही दुसऱ्यांदा चूक होते आहे तुमच्या हातून.' मीं त्याला दया दाखवण्याविषयीं पुष्कळ विनवून पाहिलं. त्याचं आपलं एकच म्हणणं, 'कायदा म्हणजे यंत्र ! तिथं दयामाया कांहीं नाहीं.' विषण्ण मनानं घरीं आलों अन् पत्नीला सांगितलं. 'असं निराश होऊन कसं चालेल ! देवाला सगळ्यांची काळजी आहे.' तिनं धीर दिला. शाळाकॉलेजांतून देवाविरुद्ध भांडणारी कुमुद संसारांत पडतांच देवाच्या गोष्टी बोलूं लागते ! मानवी जीवनांत यंत्रानं घडवून आणली नाहीं इतकी क्रांति कुमुदच्या मतांत संसारानं घडवून आणली होती.

आयुष्यांत जेव्हां जेव्हां दुःखाचे क्षण अनुभवायचा प्रसंग येई तेव्हां कुमुदच्या सान्निध्यानें–तिच्या टेनिसच्या खेळानें अर्ध्या दुःखाचा विसर पडे मनाला. त्या दिवशीं मी अन् कुमुद टेनिस कोर्टवर गेलों. मला शक्य तों आनंदांत ठेवायचा प्रयत्न करणाऱ्या कुमुदनं त्या दिवशीं आपल्या कौशल्याची शिकस्त केली. खेळ संपल्यावर मीं तिला प्रेमभरानं जवळ ओढून शाबासकी दिली अन् म्हटलं, कुमुद, तूं माणूस आहेस कीं यंत्र ग? किती सफाईनें होतो तुझा खेळ!' असें म्हणतांच तिला एकाएकी हुंदका आला अन् तिनें आपली मान माझ्या खांद्यावर टेकवली. मला त्या प्रकाराचा अर्थ समजेना. कुमुद सांगूं लागली, 'खरंच, यंत्र म्हणजे? माणुसकींतून हृदय वजा केलं म्हणजे बाकी राहणारं तें यंत्र, हें खरं ना?' तरी तिचा अभिप्राय माझ्या ध्यानांत येईना. त्या दिवशीं तिला मिळालेली तार तिनं आपल्या पोलक्याच्या खिशांतून काढून माझ्या हातीं दिली. ती तिच्या आईच्या मृत्यूची बातमी होती! मीं आश्चर्यानें तिला म्हटलं, 'कुमुद, अन् सकाळपासून ही बातमी माझ्यापासून लपवून ठेवलीस, काय म्हणावं तुला?'

'यंत्र!' ती कुठं तरी पहात म्हणाली!

१७२०

IRBK-0101720